



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, मंगळवार १४ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# ज्येष्ठ गायिका आशा भोसले अनंतात विलीन

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## फिरुनी नवी जन्मेन मी!



**मुंबई/प्रतिनिधी-** संपूर्ण देशानं साश्रु नयनांनी सूरसम्राज्ञी आशा भोसले यांना अखेरचा निरोप दिला. दशकानुदशके भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या दिग्गज गायिका आशाताईंच्या पार्थिवावर आज (१३ एप्रिल २०२६) रोजी दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तब्बल सहा दशकं रसिकप्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारा आवाज अनंतात विलिन झाला. आशाताईंच्या जाण्यानं सूरही गहिवरलेत. तर, शब्दही हिरमुसलेत. फक्त सिनेसृष्टीच नाहीतर, अख्खा देश शोकसागरात बुडालाय. आशा भोसलेयांचं जाणं हा संपूर्ण देशासाठी धक्का आहे.

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी १२ एप्रिलला वयाच्या ९३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर आज (१३ एप्रिल २०२६) सकाळी अकरा वाजता आशा भोसले यांच्या लोअर परेल इथल्या निवासस्थानी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलेलं. आशाताईंना अखेरचा निरोप देण्यासाठी दिग्गजांनी उपस्थिती लावलेली. सिनेसृष्टीपासून राजकीय नेत्यांपर्यंत अनेकांनी आशाताईंच्या पार्थिवाचं दर्शन घेतलं. अभिनेत्री तब्बू, अभिनेत्री आशा पारेख, अभिनेता रितेश देशमुख, गायक सुदेश भोसले, अभिनेते राकेश रोशन, अभिनेत्री नीना गुप्ता, मंगलप्रभात लोढा आणि भय्याजी जोशी, सुप्रिया सुळे, आशिष शेलार, राज्यपाल जिष्णू देव शर्मा, उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे तसंच विश्वास नांगरे-पाटील यांनी त्यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. यावेळी मुंबई पोलिसांकडून मानवंदना देण्यात आली. अंत्यसंस्काराला मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह इतर महत्वाचे नेतेही उपस्थित होते. भारतरत्न आणि 'गानसम्राज्ञी' लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखल जायचं. तब्बल सहा दशकं त्यांनी इंडस्ट्रीत आपल्या गाण्यांना आवाज दिलाय. त्यांनी केवळ हिंदीतच नाहीतर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह अनेक भाषांमध्ये गाणी गायलीत. हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज संगीतकार आरडी बर्मन, ओपी नैय्यर, सचिन देव बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासोबत त्यांनी अनेक अजरामर ⇨(पान २ वर)





## आशा भोसले यांच्या नावाने मुंबईत संगीत अकॅडमी

### राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी-** राज्य सरकारच्या आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्य सरकारनेह्या आशा भोसले संगीत अकॅडमी उभारण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी स्वतः आशाताईंनी वांद्रे-अंधेरी परिसरात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या नावाने स्मारक उभारण्याचा मुद्दा मांडला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आशाताईंनी ⇨(पान २ वर)

## आशाताईंच्या जाण्याने पाकिस्तानही शोकाकूल

गायिका आशा भोसलेंच्या निधनानंतर सिनेसृष्टीत शोककळा पसरली आहे. त्यांच्या सुमधूर आवाजानं प्रेक्षकांच्या मनात घर तयार केलं. लहानमुलांपासून, तरुणाई आणि ज्येष्ठ व्यक्ती आशा ताईंची गाणी आवडीने ऐकतात. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सर्व वयोगटातील लोकांच्या मनावर आणि हृदयावर राज्य केलं आहे. आशा ताई केवळ भारतीयांच्याच लाडक्या नव्हत्या तर, संपूर्ण जगात त्यांचे चाहते आहेत.विशेष म्हणजे, सीमेपलीकडील ⇨(पान२ वर)

## नाशिक येथील धर्मांतर प्रकरणामागे महिला 'मास्टरमाईंड'

**नाशिक/ प्रतिनिधी-**नाशिकमधील बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील हिंदू महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषण आणि जबरधस्तीने धर्मांतर प्रकरणात एक महिला मास्टरमाइंड असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. कंपनी अत्याचार प्रकरणात गुन्हा दाखल होताच सावध झाल्याने ती फरार झाली असून, तिचा मोबाईल बंद असल्याने पोलिसांना तपासात अडचण येत आहे. निदा खान असे संशयित फरार ⇨(पान २ वर)









## खरातला 1 हजार 825 बड्या असामींचे कॉल

**मुंबई/प्रतिनिधी-** भोंदूबाबा अशोककुमार खरात याच्या लैंगिक अत्याचार व फसवणुकीचे धक्कादायक कारनामे समोर आले आहेत. अनेक बड्या असामी, अधिकारी व राजकारणी त्याच्या संपर्कात होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी १,८२५ लोकांची नावे उघड करण्याचा दावा केला आहे, ज्यात आयएजी,




तहसीलदार, राजकारण्यांचा समावेश आहे. बुधवारी मोठा खुलासा होणार असून, सध्या ईडी आणि पोलिस तपास करत आहेत.भोंदूबाबा लिंगपिसाट अशोककुमार खरात याचे अनेक कारनामे समोर आल्याने महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देश हादरून गेला आहे. असंख्य महिलांवर लैंगिक ⇨(पान २ वर)

## वराह पालन योजनेला मंजुरी

### 50 ते 75 टक्क्यांपर्यंत अनुदान मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्य सरकारकडून वराह पालनाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वराह पालनासंदर्भात भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि मंत्री नितेश राणे यांनी पाठपुरावा केला होता. अखेर राज्य सरकारनं वराह पालन योजनेला मंजुरी दिली आहे. या संदर्भातील शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागानं १३ एप्रिल म्हणजे आजच शासन निर्णय जारी केला आहे. महाराष्ट्र सरकारनं मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत आता वराह पालनाचा समावेश केला आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी





यासंदर्भातील मागणी केली होती. तर, मंत्री नितेश राणेंनी वराह पालनास प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले होते. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार वराह खरेदीसाठी शासन ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान देणार आहे. तर, कुक्कुटपालन व मेंढी पालनाप्रमाणे वराह पालनासाठी ही ४ टक्के व्याज सवलत मिळणार आहे. वराह पालन गट वाटप योजना प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास उपयोजनेचा समावेश करण्यात येत असून त्याचा तपशील ⇨(पान २ वर)

## खरातला 7 दिवसांची न्यायालयीन कोठडी!

**नाशिक/प्रतिनिधी :** अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या कथित भोंदू बाबा अशोक खरात याच्या



अडचणीत वाढ झाली आहे. आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने खरातला सात दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्याच्यावर दाखल असलेल्या तिसऱ्या गुन्ह्याच्या संदर्भात ही कारवाई करण्यात आली असून, आता विशेष तपास पथक (SIT) त्याला चौथ्या गुन्ह्यात ताब्यात घेण्याच्या तयारीत आहे. अशोक खरात याच्यावर गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. तिसऱ्या गुन्ह्यातील पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याला आज न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला सात दिवसांसाठी कारागृहात पाठवण्याचे आदेश दिले. ⇨(पान २ वर)

## यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाउस

### भारतीय हवामान विभागाकडून पहिला अंदाज जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी-**भारतीय हवामान विभागाकडून आज नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पर्जन्य अंदाज जाहीर करण्यात आला आहे. सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम रविचंद्रन यांनी यावर्षीच्या मान्सूनचा पहिला अंदाज जाहीर केला आहे. आज पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या उपस्थित नवी दिल्लीत आज पत्रकार परिषद पार पडली. यामध्ये नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यामध्ये सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जेव्हा पावसाचे प्रमाण ९० टक्के ते ९५ टक्के असते त्यावेळी सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात येतो. दरम्यान, संपूर्ण देशभरात दीर्घावधी सरासरी ८७ सेंटीमीटर राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

जून जुलै ऑगस्ट पर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहणार

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ एम. मोहापात्रा



यांच्या माहितीनुसार, जून जुलै ऑगस्ट पर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहणार आहे. जुलै ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात एल निनो परिस्थिती असणार आहे. तर जुलै ऑगस्ट सप्टेंबर मध्ये भारतीय समुद्रात सकारात्मक परिस्थिती असल्याची माहिती डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली आहे. त्यामुळं एल निनो च्या नकारात्मक परिणामाला भारतीय समुद्रातील सकारात्मक परिस्थिती अनुकूल करेल. ⇨(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर उपविभागीय कार्यालयात आ.प्रवीण तायडे यांचा ३ तास ठिय्या

## त्या अश्लील व्हिडीओ प्रकरणी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात तरुणी व काही महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. १३ एप्रिल रोजी या प्रकरणी त्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्याच्या मागणीसाठी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्यासह भाजपा चे पदाधिकारी ,कार्यकर्ते, असंख्य नागरिक ,महिला मंडळीच्या उपस्थितीत ३ तास अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले .त्यानंतर त्या आरोपी विरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची माहिती आ.प्रवीण तायडे यांनी दिली.



यावेळी अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार, अचलपूर पोलिस स्टेशन चे ठाणेदार गजानन मेहत्रे,परतवाडा पोलीस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के, सरमसपुरा पोलिस स्टेशन चे ठाणेदार गोपाल चावडीकर प्रामुख्यानं उपस्थितीत होते.आ.प्रवीण तायडे यांच्या फिर्यादी नंतर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

प्राप्त माहितीनुसार,परतवाडा येथील एका युवकाने हे व्हिडिओ इंस्टाग्राम व टेलिग्रामवर प्रसारित केल्याचा आरोप असून, यामुळे शहरात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर व्हिडिओमध्ये परतवाडा शहरातील एक युवक तरुणी व महिलांसोबत अश्लील कृत्य करताना दिसत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच या प्रकरणात एकटाच नव्हे तर इतर काही युवकही सहभागी असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारामुळे पीडित मुली व घटनेविरोधात त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे जुळ्या शहरातील विविध राजकीय पक्ष ,सामाजिक संघटनांच्या महिलांनी एकत्र येत अचलपूर उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. शुभम कुमार यांना निवेदन देत तत्काळ कारवाईची मागणी केली. आरोपींना अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या दरम्यान, अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी थेट अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांच्या कार्यालयात धडक देत पोलिसांना जाब विचारला. आणि तीन तास ठिय्या मांडला .त्यानंतर या प्रकरणी आरोपी विरुद्ध पोस्को अंतर्गत बी.एन.एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे . पुढील तपास सुरू असून आता आरोपीला अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी सुद्धा आ.प्रवीण तायडे यांनी केली आहे.त्या आरोपीच्या शोधात पोलिस पथक रवाना झाल्याची माहिती समोर आली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रवादीच्या सुरेखाताई ठाकरे,भाजपा पक्षाचे नगरसेवीका पदमिणी बेडे, अपर्णा जितेंद्र रोडे, वैशाली पोटे,जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शहराध्यक्ष कुंदन यादव,प्रफुल बर्वे,तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,नगरसेवक सुरेंद्र तांबे,रुपेश ढेपे,व्यापारी अजय अग्रवाल,गोपाल झंवर ,दिलीप आस्वानी,प्रफुल कुऱ्हेकर,अक्षय जनवारे,शंकर भाषांनी,गौरव रघुवंशी, सागर यावले,कौस्तुभ मुंदे, मयंक शर्मा,ललित ठाकूर,सचिन कडू ,शिला साखरे, जिजाऊ बिग्रेड, भाजपा महिला पदाधिकारी, सर्व पक्षीय महिलांनी या प्रकरणी संताप व्यक्त केला. सध्या या प्रकरणामुळे अचलपूर-परतवाडा शहरात संतापजनक वातावरण झाले आहे .

### घरगुती वादातून टोकाची पावले
# मुलानेच घेतला वडिलांचा जीव

**अमरावती/प्रतिनिधी-** कौटुंबिक वाद आणि सततच्या छळामुळे संतप्त झालेल्या मुलाने स्वतःच्या वडिलांचाच जीव घेतल्याची धक्कादायक घटना वलगाव पोलीस स्टेशन हद्दीतील रेवसा येथे उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, शहर गुन्हे शाखा आणि वलगाव पोलिसांनी अवघ्या चार तासांत



या खुनाचा उलगडा करून आरोपीला अटक केली. १३ एप्रिल रोजी पहाटे रेवसा गावात खुनाची माहिती नियंत्रण कक्षाला मिळताच पोलीस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली. मृत व्यक्तीची ओळख जनार्दन श्रीरामजी केवदे (वय ५२) अशी पटली. प्राथमिक चौकशीत पोलिसांनी मृतकाची पत्नी रेखा केवदे आणि मुलगा धीरज केवदे यांची विचारपूस केली. यावेळी धीरजच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.धीरजने दिलेल्या माहितीनुसार, त्याचे वडील जनार्दन केवदे हे दारू आणि गांजाचे व्यसनाधीन होते. नशेत घरी येऊन ते पत्नी व मुलाला वारंवार शिवीगाळ व मारहाण करीत असत. या सततच्या त्रासाला कंटाळून १३ एप्रिलच्या पहाटे सुमारे १.३० वाजता रागाच्या भरात धीरजने घरासमोरील जोत्यावर लाकडी टेम्प्याने वडिलांच्या डोक्यावर वार केला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी धीरज जनार्दन केवदे (वय १९) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास वलगाव पोलीस करत आहेत.

# जगातील सर्वोच्च शिखराच्या पायथ्यापर्यंत बच्चू कडूंची ऐतिहासिक मजल

## प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीचा पराक्रम

**अमरावती/प्रतिनिधी-** १३ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील प्रख्यात सामाजिक व राजकीय व्यक्तिमत्त्व बच्चू कडू यांनी जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्टच्या पायथ्यापर्यंत यशस्वी मजल मारत एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ५३६४ मीटर उंचीवर असलेल्या या ठिकाणापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी सलग आठ दिवसांचा अत्यंत खडतर पायी प्रवास पूर्ण केला.

या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही प्रकारच्या विशेष सोयीसुविधा न घेता, अत्यंत प्रतिकूल हवामानात हा प्रवास पार पाडण्यात आला. उणे १५ अंश सेल्सियस तापमान, हाडे गोठवणारी थंडी आणि उंची वाढत जाईल तसे कमी होत जाणारे प्राणवायूचे प्रमाण, या सर्व आव्हानांना सामोरे जात बच्चू कडू यांनी आपल्या मुलासह हा प्रवास पूर्ण केला. पायथ्याच्या ठिकाणी प्राणवायूचे प्रमाण केवळ ४५ टक्क्यांपर्यंत मर्यादित असल्याने श्वसनास मोठा त्रास सहन करावा लागतो, हे विशेष नमूद करण्यासारखे आहे. ही मोहीम 'द अल्पायनिस्ट' संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आली होती. एव्हरेस्टवीर भगवान चवले यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जणांच्या पथकाने हा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. या पथकात देवा कडू (मुलगा), महेश बडे (अभियान प्रमुख) आणि केतन हिवंज यांचाही समावेश होता. दररोज सरासरी १२ ते १४ किलोमीटर अंतर कमी प्राणवायूमध्ये पार करत या पथकाने शेवटच्या दिवशी तब्बल १७ किलोमीटरचा कठीण टप्पा पूर्ण केला. उंच प्रदेशातील हवामानातील बदल, शारीरिक थकवा आणि मानसिक ताण यांचा सामना करत त्यांनी दाखवलेली जिद्द विशेष प्रेरणादायी ठरते.

या मोहिमेची एक महत्त्वाची सामाजिक बाजूही अधोरेखित झाली. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला ही मोहीम भारताचे संविधान आणि भगवदगिता




यांना समर्पित करण्यात आली. हातात भगवदगिता, संविधान आणि तिरंगा घेऊन हा प्रवास पूर्ण करत त्यांनी राष्ट्रीय अभिमान, संविधानिक मूल्ये आणि आध्यात्मिक विचार यांचा संगम अधोरेखित केला.

तसेच, नेपाळमध्ये अशा प्रकारच्या पायी प्रवासासाठी उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांचा उल्लेख करत, महाराष्ट्रातही अशा सुविधा निर्माण व्हाव्यात, जेणेकरून युवकांना साहसी उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा कडू यांनी व्यक्त केली. एकूणच, सर्वोच्च शिखराच्या पायथ्यापर्यंतचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यश नसून जिद्द, चिकाटी आणि सामाजिक संदेश यांचा संगम ठरला आहे. महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातील व्यक्तीने अशा प्रकारची कामगिरी केल्यामुळे ही मोहीम विशेष लक्षवेधी ठरली आहे.

पान १ व १० वरून

## फिरुनी नवी जन्मेन मी!

गाणी गायली. **सुदेश भोसले, शान आणि अनुप जलोटांनी गाण्यातून वाहिली श्रद्धांजली** पूर्ण देशाला आपल्या सुरांनी मोहिनी घालणा-या सूरसम्राज्ञी आशा भोसले यांना आज साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. संगीत, चित्रपट आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीत हा अंत्यविधी सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित असलेल्या गायक कलाकारांनी आपल्या लाडक्या 'आशा ताईं'ना त्यांच्याच गाण्यांच्या सुरांनी श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यविधीच्या वेळी वातावरण अत्यंत शोकाकुल होते. अशा वेळी शब्दांपेक्षा सुरांनीच भावनांना वाट करू न दिली. ज्येष्ठ गायक सुदेश भोसले यांनी आशा ताईंसोबत अनेक दशके काम केले आहे. आपल्या भावना व्यक्त करताना त्यांनी आशा ताईंच्या आठवणीत 'यहा कल क्या हो किसने जाना' हे अजरामर गाणे गायले. हे गाणे गाताना त्यांचा आवाजही गहिवरला होता, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले. भजन सम्राट अनुप जलोटा यांनी देखील आपल्या खास शैलीत गाणे सादर करत आशा ताईंच्या सांगीतिक वारशाला वंदन केले. लोकप्रिय गायक शान यानेही आपल्या भावना सुरांच्या माध्यमातून मांडल्या.

यावेळी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सिनेसृष्टीतील कलाकार, राजकीय नेते, क्रीडा विश्वातील खेडाळू आले होते. त्यानंतर त्यांच्या निवासस्थानापासून दादरच्या शिवाजी पार्कपर्यंत अंत्ययात्रा काढण्यात आली. आशा भोसलेंच्या पार्थिवाला तिरंग्याने मानवंदना देण्यात आली. शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, भाजप नेते आशिष शेलार, मुंबईच्या महापौर रितू तावडे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे पत्नी रश्मी ठाकरे आणि मुलगा आदित्य ठाकरे यांच्यासोबत आशा भोसले यांना अखेरचा निरोप देण्यासाठी शिवाजी पार्क येथे आले होते. तसेच, सिनेसृष्टीतील कलाकार रितेश देशमुख, तब्बू, विकी कौशल, राकेश रोशन, अनुराधा पौडवाल, नितीन मुकेश, निल नितीन मुकेश, जॅकी श्रॉफ, हेलन, रणवीर सिंह, आमिर खान, सचिन पिळगावकर, सुशांत शेलार यांच्यासह अनेक कलाकारांनी आशा भोसले यांच्या पार्थिवाचे अन्त्यदर्शन घेतले. तर, क्रीडा विश्वातून देखील अनेक दिग्गज आशा भोसलेंना अखेरचा निरोप देण्याठी आले होते. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर पत्नी अंजलीसोबत आला होता. क्रिकेटर मोहम्मद सिराजने देखील आशा भोसले यांचे अन्त्यदर्शन घेत त्याना श्रद्धांजली वाहिली.

## आशा भोसले यांच्या नावाने

दिलेल्या प्रस्तावालाच पुढे नेण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. यानुसार, मुंबईतील वांद्रे-अंधेरी दरम्यान आशा भोसले संगीत अकॅडमी उभारली जाणार आहे. या अकॅडमीसाठी योग्य जागा निश्चित करण्याचे आदेश म्हाडाला देण्यात आले आहेत. त्यामुळे आशाताईंनी व्यक्त केलेली इच्छा त्यांच्या निधनानंतर पूर्ण होत असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामुळे संगीत क्षेत्राला नवी दिशा मिळण्याबरोबरच नवोदित कलाकारांसाठीही मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत सोमवारी अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. विकसित महाराष्ट्र २०४७ या व्हिजनला अनुसरू न विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेषतः शासन सेवेतील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यावर भर देण्यात आला असून, यामुळे भविष्यातील प्रशासन अधिक कार्यक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शासन सेवेतील पदभरती प्रक्रियेत मोठे बदल करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या विविध सेवांच्या संवर्गांची संख्या ५३ वरू न थेट १५३ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संयुक्त परीक्षा योजनेतही काही नव्या सेवांचा समावेश करण्यात येणार असून, त्यामुळे उमेदवारांसाठी संधी वाढणार आहे. याशिवाय, केंद्रातील यूपीएससीच्या धर्तीवर महाजाब्स पोर्टलच्या माध्यमातून निपुण सेतू हा उपक्रम राबविण्यात येणार आहे, ज्यामुळे भरती प्रक्रिया अधिक सुलभ आणि आधुनिक होईल.

**नगरविकास विभाग-** कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडीयमच्या आरक्षणात बदल करू न वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा प?वर कंपनीस हस्तांतरीत करण्याचा निर्णय.

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी. कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेमुळे कुशल मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार

**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करू न देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रु पयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी.

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

राज्यातील वैद्यकीय शिक्षण प्रणाली, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार. सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्य उपलब्ध होणार.

**नियोजन विभाग-** नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्हयांचा समावेश. त्यामुळे सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये संतुलित, सर्वांगिण व गतिमान विकासाच्या योजना राबविणार.

**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग-** वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणा-या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार प्रशासन व संस्थात्मक रचनेत बदल होणार. परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीच्या ऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने होणार.

## आशाताईच्या जाण्याने पाकिस्तानही

पाकिस्तानातही त्यांच्या गायनाचे अनेक चाहते आहेत. म्हणूनच आशा भोसले यांच्या निधनाने केवळ भारतावरच नाही तर, पाकिस्तानावरही शोककळा पसरली आहे. आशा भोसले यांच्या निधनानंतर पाकिस्तानी लोकांनीही दुःख व्यक्त केलंय. अनेक प्रमुख पाकिस्तानी सिनेसृष्टीतील कलाकारांनी सोशल मीडियावर एकत्र येउन आपले दुःख व्यक्त केले आहे. तसेच आशाताईंना श्रध्दांजली वाहिली आहे. गायक अभिनेता अली जफरने आपल्या सोशल मीडिया हँडलवर आशा भोसले यांचा फोटो शेअर करु न दुःख व्यक्त केलं आहे. अभिनेता आपल्या पोस्टमध्ये म्हणाला, 'आशा भोसले यांचं कार्य येणा-या पिढ्यांना कायम प्रेरणा देत राहिल. असे आवाज काळाबरोबर पुसले जात नाहीत, उलट ते काळाचाच एक भाग बनतात', असं अली जफर म्हणाला. अलि जफर व्यतिरिक्त अदनान सिद्दीकी, ॲक्टर यासिर हुसैन, अहमद अली बट यांसारख्या दिग्गज पाकिस्तानी कलाकारांनी आशा ताईंच्या निधनावर दुःख व्यक्त केलं आहे. ' एका युगाचा अंत झाला' असं म्हणत त्यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अहमद अली बटने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर, 'तुमच्या अजरामर गाण्यांसाठी धन्यवाद', असं म्हणत आदरांजली वाहिली आहे. तसेच अदनान सिद्दीकीनेही आशा भोसलेंच्या निधनानंतर पोस्ट शेअर केली आहे. 'आशा भोसलेंना श्रध्दांजली. रात अकेली है.. तुमच्या आवाजात अशी जादू होती की, अगदी एकाकी क्षणांनाही भरु न टाकायचे. आज तीच शांतता जड वाटत आहे. तुम्ही आम्हाला दिलेल्या भावनांबद्दल धन्यवाद. तुम्ही स्वतः एक सुंदर आठवण बनला आहात आणि तुम्ही मागे सोडलेली जादू कायम राहिल', असं अदनानने म्हटलं आहे.

गायक शुजा हैदरने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, 'त्यांचा आवाज संपूर्ण जगापर्यंत पोहोचला आहे. त्यांनी आपल्या आवाजातून लाखो चाहत्यांना प्रेरणा दिली आहे. जगातील महान संगीतकारांमध्ये त्यांची आठवण कायम ठेवली जाईल', असं गायक म्हणाला.

## नाशिक येथील धर्मांतर प्रकरणामागे

महिलेचे नाव आहे. तीच या अत्याचार व धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयितांपैकी एक असून तीच खरी मास्टरमाईंड असल्याचे सांगितले जात आहे. सध्या संशयित महिला राज्यातील एका दाट लोकवस्तीच्या भागात लपल्याचा एसआयटीला संशय असून, पोलिसांची पथके तिच्या मागावर आहेत. याप्रकरणात पीडित आठ महिला व एक पुरु ष यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार एकुण ९ गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार संशयित आरोपी दानिश शेख, आसिफ अन्सारी, शफी शेख, रझा मेमन, तौसिफ अत्तार, शाहरु ख कुरेशी हे सहाजण नाशिक सेंट्रल जेलमध्ये असून आज त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. सरकारी पक्षाकडून त्यांच्या पोलिस कोठडीची मागणी केली जाणार आहे. तर कंपनीची महिला एचआर हेड अश्विनी चैनानी ही पोलिस कोठडीत आहे.

**संशयित निदा खान पसार आहे.**

संशयित निदा खान हिनेच कंपनीतील हिंदू तरु णींसोबत ओळख करु न त्यांचे ब्रेनवाश केल्याचा पोलिसांना संशय आहे. तिच्या मदतीनेच संशयितांनी कंपनीत काम करणा-या हिंदू युवतींना टार्गेट केलं. निदा खान ही आपल्या धर्मातील चालीरीतींची माहिती हिंदू तरु णींना देत होती. मूळ नाशिकची असलेली निदा खान हिने काही महिन्यांपूर्वी मुंबईत बदली करू न घेतली होती. संशयितांचा वाढता अतिरेक पाहाता तीने सावध भूमिका घेउन नाशिकमधून काढता पाय घेतल्याचे समजते. तीचा मोबाईल बंदू असून तीने आपले इन्स्टाग्राम अकाउंट देखील डिलीट केले आहे. तीला अटक केल्यानंतर या प्रकरणाची व्याप्ती अधिक स्पष्ट होउ शकेल.

## खरातला 1 हजार 825 बड्या

अत्याचार केल्याची माहिती उघड होताच देशात धरणीकंप आला आहे. अशोक खरात दैवी शक्ती असल्याचं कारण दाखवून अनेकांना गंडवत होता. त्यात अनेक बड्या असामी आहेत. राजकारण्यांपासून अधिका-यांपर्यंत ते पोलिसांपर्यंत अनेकजण त्याच्या भक्तप्रपंचात होते. तब्बल १८२५ लोक त्याच्या संपर्कात होते. त्यात बड्या असामी आहेत. ही नावे समोर आल्यावर देशात एकच खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तसा दावा केला असून त्या येत्या बुधवारी या सर्वांचा भांडाफोड करणार आहे.

अंजली दमानिया यांनी मीडियाशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे. येत्या बुधवारी मी पत्रकार परिषद घेणार आहे. त्यात अशोक खरातचे सर्व कारनामे सांगणार आहे. ज्यांनी अशोक खरातला काल केले आणि अशोक खरातने ज्यांना फोन केले अशा लोकांचे हे नंबर आहेत. या सगळ्या नंबर्समध्ये धक्कादायक बाब म्हणजे त्याच्यात आयजी लेव्हलचे अधिकारी, पीआय, सीनियर पीआय, तहसीलदार, डेप्युटी कलेक्टर आणि इतकंच नाही तर राजकारण्यांचाही समावेश आहे. नावे ऐकून तुम्हाला धक्का बसेल असे राजकारणी त्याच्यात आहे, असा दावा अंजली दमानिया यांनी केला.

**बुधवारी खुलासा करणार-** या व्यक्तीची ख्याती किती मोठी आहे हे खरच कळत नाही. कारण यात ट्रॅफिक हवालदारापासून पोलीस ठाण्यातील असंख्य अधिकारी सामील आहेत. ही संपूर्ण माहिती मी आता पोलीस अधिका-यांना पाठवली आहे. पण बुधवारी याचा खुलासा मी नक्की करणार आहे, असं दमानिया यांनी सांगितलं.

**सर्व व्यवहार एसएमएसवर-** पोलिसांकडून आज प्रतिभा चाकणकरांची चौकशी होत आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. असंख्य खुलासे होतील आणि स्पेशली आज प्रतिभा चाकणकर या देखील शिर्डी पोलीस स्टेशनला चौकशीला गेल्या आहेत. त्यांची जी माहिती होती की आफाट आहे. त्यांचे क?ल्स कमी होते, पण त्याचे एसएमएस प्रचंड प्रमाणावर होते. म्हणजे हे सगळे व्यवहाराचे मेसेजेस होते. काही महत्त्वाच्या डिटेल्स मी शिर्डी पोलीस स्टेशनला माझ्याकडून पाठवल्या आहेत, असंही त्यांनी म्हणाल्या.

## वराह पालन योजनेला मंजुरी

पुढीलप्रमाणे आहेत.

**लाभार्थी :** सर्व प्रवर्गातील दारिद्र्य रेषेखालील, भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, सुशिक्षीत बेरोजगार, महिला बचत गट

**लाभार्थी निवडीची निकष :** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन
ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)
क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)
ड) वनहक्क धारक
इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता :** पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करतांना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील)

सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्याला ५० टक्क्यांपर्यंत तर अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान मिळेल. वराह पालन गट ५ अ१ असा निश्चित करण्यात आला असून प्रकल्प खर्च २०८१८७ रु पये इतका निश्चित करण्यात आला आहे.

**पात्रतेच्या अटी :** १.पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करतांना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.) किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिका-याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

२.दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३.शेडसाठी जागा उपलब्ध असल्याचे तसेच वराह मोकाट सोडले जाणार नाही याबाबतचे स्वयंघोषणा पत्र.

या संदर्भातील अधिक माहिती महाराष्ट्र सरकारनं जारी केलेल्या शासन निर्णयात उपलब्ध आहे.

## खरातला 7 दिवसांची न्यायालयीन

खरातने केलेल्या कृत्यांची व्याप्ती मोठी असल्याने त्याला जामीन न देता न्यायालयीन कोठडीत ठेवणे आवश्यक असल्याचे निरीक्षण यावेळी नोंदवण्यात आले. -तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, अशोक खरात हा आध्यात्मिक शक्तीचे प्रलोभन दाखवून महिलांना आपल्या जाळ्यात ओढत असे. त्यांच्या असहायतेचा फायदा घेउन त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे आणि त्यांच्याकडून मोठी रोख रक्कम उकळल्याचे उघड झाले आहे. या भोंदूगिरीचे बळी ठरलेल्या अनेक पीडिता आता हळूहळू समोर येत असून, त्यामुळे खरातविरु द्धच्या पुराव्यांचे पारडे जड होत चालले आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाचे आणि आर्थिक लुटीचे गंभीर आरोप असलेल्या अशोक खरात याच्या विरोधात कायद्याचा फास आता अधिक घट्ट झाला आहे. आज त्याची पोलीस कोठडी संपत असल्याने, त्याला व्हिडिओ क?न्फरन्सिंगच्या माध्यमातून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी झालेल्या सुनावणीत खरातच्या विरोधात दाखल असलेल्या गुन्ह्यांची भीषण व्याप्ती समोर आली असून, विशेष तपास पथकाने (SIT) आपला तपासाचा वेग वाढवला आहे.

**गुन्ह्यांची भीषण मालिकाः १६ गुन्हे दाखल-** अशोक खरात याच्यावर केवळ एक-दोन नव्हे, तर तब्बल १६ गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, १६ पैकी ८ गुन्हे हे थेट महिलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आहेत. आध्यात्मिक उपचारांच्या आणि दैवी शक्तीच्या नावाखाली त्याने अनेक महिलांची फसवणूक करू न त्यांचे शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याशिवाय, उर्वरित गुन्हे हे भाविकांची दिशाभूल करू न त्यांच्याकडून लाखो रु पये उकळल्याच्या आर्थिक फसवणुकीशी निगडित आहेत.

**न्यायालयीन सुनावणी आणि खरातची कबुली-** आजच्या सुनावणीला सुरु वात होताच, सन्माननीय न्यायाधीशांनी सर्वप्रथम अशोक खरातला त्याचे नाव विचारू न त्याची ओळख पटवून घेतली. यानंतर, कोठडीत असताना पोलिसांनी तुला मारहाण केली का किंवा तुझ्या विरोधात काही अन्यायकारक कृत्य घडले का, अशी विचारणा न्यायाधीशांनी केली. यावर आरोपी खरातने अत्यंत विनयशीलतेचा आव आणत, दोन्ही हात जोडून पोलिसांविरोधात कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. मारहाणीचा आरोप त्याने स्पष्टपणे नाकारल्याने पुढील कायदेशीर प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. चौथ्या गुन्ह्यात वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू, वैद्यकीय चाचणीनंतर होणार हजेरी-

महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणूक अशा गंभीर आरोपांखाली अटकेत असलेल्या अशोक खरात याच्या न्यायालयीन कोठडीत वाढ झाली असून, आता त्याला नव्या गुन्ह्यात वर्ग करण्याची प्रशासकीय प्रक्रिया गतिमान झाली आहे. आज पार पडलेल्या संक्षिप्त सुनावणीनंतर न्यायालयाने खरातला तिस-या गुन्ह्यात सात दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. मात्र, त्याच्या गुन्ह्यांची मालिका मोठी असल्याने तपास यंत्रणा त्याला सवलत देण्याच्या मनस्थितीत नाहीत.

पोलीस कोठडीचा हक्क अबाधित; चौथ्या गुन्ह्याची तयारी

आजच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने अत्यंत महत्त्वाची भूमिका मांडली. तिस-या गुन्ह्यातील तपासासाठी भविष्यात लागणारी पोलीस कोठडीचा हक्क सुरक्षित ठेवून, खरातला आता चौथ्या गुन्ह्यात वर्ग (वर्ग करण्याची परवानगी) करण्याची विनंती सरकारी वकिलांनी न्यायालयाला केली. एका गुन्ह्यातून दुस-या गुन्ह्यात आरोपीचा ताबा घेण्याची ही कायदेशीर प्रक्रिया असून, यामुळे विशेष तपास पथकाला (SIT) नव्या तक्रारींच्या आधारे खरातची अधिक सखोल चौकशी करता येणार आहे.

**त्रिकोणी छापेमारीः नाशिक, पुणे आणि शिर्डी रडारवर-** ईडीच्या पथकाने अत्यंत गोपनीयतेने ही मोहीम राबवली. खरातशी संबंधित नाशिकमधील ५, पुण्यातील ३ आणि शिर्डी परिसरातील ३ अशा एकूण ११ ठिकाणांवर एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. नाशिक येथील त्याच्या तृप्ताबाला या निवासस्थानी अधिका-यांनी तासनतास झाडाझडती घेतली. यावेळी स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्रीशी संबंधित अनेक संशयास्पद कागदपत्रे आणि करारांच्या प्रती जप्त करण्यात आल्या असून, त्यांची सध्या सूक्ष्मपणे पडताळणी केली जात आहे.

**पतसंस्थेतील व्यवहारांनी यंत्रणा चक्रावली-** या कारवाईचा सर्वात धक्कादायक दुवा शिर्डी परिसरातील राहता येथे समोर आला आहे. येथील समता पतसंस्थेच्या शाखेत ईडीच्या अधिका-यांनी धाड टाकून महत्त्वाची माहिती हस्तगत केली. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, या पतसंस्थेत तब्बल १०० अशी खाती आहेत, ज्यामध्ये अशोक खरात हा नामिनी (वारसदार) म्हणून नोंदवलेला आहे. या शंभर खात्यांमधून आतापर्यंत ६० कोटी रु पयांहून अधिक रकमेचे संशयास्पद व्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

## यावर्षी सरासरीपेक्षा कमी

त्यामुळं एल निनोचा परिणाम जाणवणार नाही असे डॉ. एम. मोहापात्रा यांनी सांगितले आहे.

**पाउस कसा मोजतात?** -भारतीय हवामान विभागाने पाउस मोजण्याच्या पाच श्रेणी ठरवल्या आहेत. सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाउस म्हणजे अपुरा पाउस समजला जातो. दुस-या श्रेणीत ९० ते ९५ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाउस, तर तिस-या श्रेणीत ९६ ते १०४ टक्के म्हणजे सामान्य सरासरी इतका पाउस समजला जातो. पुढील दोन श्रेणी सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०५ ते ११० टक्के आणि ११० टक्क्यांच्या पुढे अधिक पाउस म्हणजे सर्वाधिक पाउस समजला जातो.

**शेतक-यांची चिंता वाढणार-** काही खाजगी वेधशाळांनी यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहण्याची शक्यता वर्तवली होती. या पार्श्वभूमीवर, अधिकृत सरकारी यंत्रणा म्हणजे भारतीय हवामान विभाग काय अंदाज मांडणार याकडे देशातील बळीराजा आणि सर्वसामान्यांचे डोळे लागले होते. अखेर आज भारतीय हवामान विभागानं मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाउस राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळं शेतक-यांची चिंता वाढणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा अंदाज अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.



# ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

## मंगरूळ दस्तगीर सोलर प्लांट जवळ अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकी स्वार ठार झाल्याची घटना आज सोमवार १३ एप्रिलच्या सकाळी ११ वाजताच्या सुमारास धामणगाव मंगरूळ दस्तगीर मार्गावर सोलर प्लांट जवळ समोर आली आहे. शेख मुस्ताक शेख तुराक (वय ५५, मंगरूळ दस्तगीर) असे अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. माहिती नुसार शेख मुस्ताक शेख तुराक नेहमी प्रमाणे सोमवारी सकाळी आपल्या दुचाकी एमएच २७ डीवाय ३७७७ ने घरून कामासाठी निघाले होते. धामणगाव - मंगरूळ दस्तगीर मार्गावर सोलर प्लांट जवळ समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये शेख मुस्ताक यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती तिथून जाणाऱ्या नागरिकांनी पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी धामणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. घटनेनंतर वाहतूक विस्कळीत झाली होती. दोन्ही कडे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी घटना स्थळावर पोहोचून वाहतूक व्यवस्था सुचारू केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १४ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# घरभेटींतून जनगणना २०२७ ची रंगीत तालीम

## डिजिटल प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज ; लाखाळा व सोनखास येथे प्रात्यक्षिक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात प्रशासनाने जोरदार तयारी सुरू केली असून, क्षेत्रीय प्रशिक्षकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांना सुरुवात करण्यात आली आहे. वाशिम शहरातील लाखाळा व तालुक्यातील सोनखास परिसरात दि. ११ एप्रिल रोजी घरभेटींच्या माध्यमातून जनगणना नोंदणीची रंगीत तालीम उत्साहात पार पडली.

या प्रात्यक्षिकावेळी मास्टर ट्रेनर डॉ. राजेश गवई, कार्तिक गडलिंग तसेच जनगणना जिल्हा समन्वयक शशांक रूखने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी प्रगणकांना प्रत्यक्ष घरभेटी कशा घ्यायच्या, नागरिकांशी संवाद साधून अचूक माहिती कशी संकलित करायची आणि ती डिजिटल प्रणालीत कशी नोंदवायची याबाबत मार्गदर्शन केले. जनगणना २०२७ ही पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होणार असून, तिची अंमलबजावणी दोन टप्प्यांत केली



जाणार आहे. पहिला टप्पा 'घरयादी व घरगणना' असा असून तो १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. या दरम्यान प्रगणक संबंधित भागात जाऊन घरातील प्रमुख किंवा उपलब्ध सदस्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या ३४ प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करतील. ही माहिती एचएलओ ॲपद्वारे थेट जनगणना पोर्टलवर अपलोड केली जाणार आहे.

दुसरा टप्पा 'प्रत्यक्ष जनगणना'चा असून तो १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत नागरिकांच्या माहितीची गोपनीयता राखण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जनगणना या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. या प्रात्यक्षिकावेळी सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# १७ एप्रिल रोजी भीम जयंतीनिमित्त रिना खंडारेचा बुद्ध भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■


तालुक्यातील ब्रम्हा येथे भीम जयंतीनिमित्त सुप्रसिद्ध गायीका रिना खंडारे व संच यांचा दि १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६:०० वाजता जगदंबा माता सभागृह ब्रम्हा येथे तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, फुले शाहू आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रबोधनात्मक बहारदार गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच मनिषाताई मुसळे, उद्घाटक म्हणून हृदय रोग तज्ञ तथा जिल्हा समन्वयक शिवसेना उबाठा डॉ.सिद्धार्थ देवळे, विशेष निमंत्रित विनोद पट्टेबहादूर संचालक कृ.उ.बा.स., सचिव मस्के, सुरेश मापारी अध्यक्ष शिवसेना उबाठा, जनार्दन भोयर, तर प्रमुख मार्गदर्शक गोपाळराव आटोटे डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त, कीसनराव मस्के माजी सभापती, लक्ष्मणराव मुसळे, परम



मुसळे, आणि प्रमुख उपस्थिती म्हणून दौलतराव हिवराळे अध्यक्ष पिरीपा, बालरोग तज्ज्ञ डॉ.तुषार गायकवाड, विजय नप्ते, गजानन भोयर संभाजी ब्रिगेड, ज्योतीताई इंगळे अध्यक्ष वन.ब.आ.प्रफुल्ल देवळे,, डॉ.योगीराज गायकवाड, राधीका जाधव, पांडुरंग पांढरे, गजानन गोटे, बबनराव खिल्लारे सामाजिक कार्यकर्ते , सोनाजी इंगळे वंचीत ब.आ., बळीराम मोहीरे, नवनाथ वाबळे, चेतन इंगळे, गोविंद राठोड, शरद गोध्रा, देवानंद गुठे, धनंजय मुसळे , सरकार इंगोले, विठ्ठल चव्हाण, प्रफुल्ल इंगोले, केशवराव वाबळे, पांडूरंग अंभोरे, कीरण पडघान, भुषण मोरे, अनिल कांबळे, भीमराव इंगोले, राजेश इंगोले, मधुकर पठाडे, तर प्रमुख पाहुणे गजानन जाधव, राजकुमार पडघान अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटना, प्रल्हाद इंगोले, आत्माराम भगत, देवा इंगोले, सुरेश राठोड, सिद्धार्थ पट्टेबहादूर, अरविंद पडघन ग्रामपंचायत अधिकारी, विजय नवघरे, खंडेराव मुसळे, कैलास मुसळे, शुभम मुसळे, हरिभाऊ मुसळे पुंजाजी कुटे, यांचेसह अन्य मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.तर कार्यक्रमाचे आयोजक संतोष इंगळे सदस्य ग्रामपंचायत ब्रम्हा यांचेसह अनेकांची उपस्थिती लाभणार आहे. म्हणून ब्रम्हा येथील होणाऱ्या दि १७ एप्रिल रोजी जनतेनी उपस्थित राहावे.असे आवाहन आयोजक संतोष इंगळे व आयोजन समितीचे वतीने करण्यात येत आहे.

# महात्मा फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षणाचा प्रसार करणे ही काळाची गरज - डॉ. जयाप्रभा भगत



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथिल संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा द्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये दि. ११ एप्रिल रोजी राष्ट्रीय सेवा योजना (न्एए) विभागाच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी प्रा. बापूराव डोंगरे यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यानंतर वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या विचारांचे प्रभावी मांडणी केली. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. जयाप्रभा भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# समता सैनिक दल महिला शाखेची कार्यकारिणी गठीत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील अढळनगर परिसरात समता सैनिक दल महिला शाखेची कार्यकारिणी उत्साहपूर्ण वातावरणात गठीत करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच त्रिशरण व पंचशील ग्रहण करून करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे जिल्हा पदाधिकारी जेष्ठ अभिमन्य पंडित, डिव्हिजन ऑफिसर मेजर जनरल अश्विन खिल्लारे,



रनपाल सावळे (पूर्व सैनिक), तालुका अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा वाशीम, बौद्धाचार्य धम्मपाल कांबळे, कोषाध्यक्ष वाशीम तसेच केंद्रीय शिक्षक मुंबई येथील माधव हिवाळे यांच्या हस्ते फित कापून शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना समता सैनिक दलाची स्थापना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ मध्ये केली असून समाज संघटन व समतेच्या चळवळीत या संघटनेचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन केले. नवीन कार्यकारिणीत शाखाध्यक्षपदी बबली राजू अंभोरे, महासचिवपदी मनिषा किशोर नवघरे तर उपाध्यक्षपदी वैशाली सतीश अवचार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यक्रमास गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू अंभोरे, विजय सावळे, किशोर नवघरे, राहुल पडघाण, दिपक भगत, पंकज अंभोरे, पवन ताजने व संतोष बोरकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रतिभाताई अंभोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मायाताई अंभोरे यांनी मानले.

# कारंजा आगरातील वाहकाचा प्रामाणिकपणा; हरविलेले सोन्याचे दागिने सुखरूप परत



■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा आगरातील एसटी बसमधील एका वाहकाच्या प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण नुकतेच समोर आले आहे. अकोला ते बोरगाव प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाची सोन्याचे दागिने असलेली पर्स बसमध्येच विसरली गेली होती. ही घटना ९ एप्रिल रोजी घडली. सदर महिला बोरगाव येथे उतरल्यावर तिला पर्स हरवल्याचे लक्षात आले. यानंतर बोरगाव येथील एसटी कर्मचारी मनीष तिवारी यांनी तात्काळ कारंजा आगरातील वाहक कमल चव्हाण यांच्याशी संपर्क साधला.


## जाहिरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार स्वतः श्रीमती इंदुबाई दिनेश चव्हाण रा.मंगरुळपीर ता.. मंगरुळपीर जि. वाशिम यांनी विनंती केल्यानुसार अर्जदार कु. नंदिनी दिनेश चव्हाण मुलगी स्वता आई वडील/मुलगा/मुलगी/पत्नी/बहीन/भाऊ/आजोबा/आजी/नातु यांचा जन्म/मुत्यू राहते घरी ठिकाण रामगड दिनांक ३/१२/२००७ रोजी झाला परंतु त्यांनी जन्म/मृत्यू नोंद त्यावेळी ग्रा.पं. रामगड जन्मामुत्यू दप्तरला केली नाही. करीता सदर नोंद करण्यासाठी ग्रा.पं.रामगड ला आदेश देणे बाबत विनंती केली आहे. वरील नोंदीबाबत कोणास काही हरकत/आक्षेप घ्यावयाचे असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे १५ दिवसाच्या आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून ) या न्यायालयात हरकत आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात दाखल करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकत/आक्षेप अर्ज विचारात घेतला जाणार नाही अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे जन्म / मुत्यू च्या नोंदी बाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- मंगरुळपीर
दिनांक : ०६/०९/२०२४

स्वा.
नायब तहसिलदार
मंगरुळपीर

## जाहिरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकारणात अर्जदार इंदुभाई दिनेश चव्हाण रा. रामगड ता. मंगरुळपीर जि.वाशिम यांनी विनंती केल्यानुसार अर्जदार यांचा मुलगा मुकेश दिनेश चव्हाण जन्माचे ठिकाण रामगड जन्म दिनांक १६/८/२००४ राहते घरी रामगड येथे झाला. परंतु त्यांनी जन्म नोंद त्यावेळी सचिव ग्राम पंचायत रामगड दप्तरला केली नाही. करीता सदर नोंद करण्यासाठी सचिव ग्राम पंचायत रामगड ला आदेश देणे बाबत विनंती केली आहे.

वरील नोंदीबाबत कोणास काही हरकत / आक्षेप घ्यावयाचे असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे १५ दिवसाच्या आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळुन ) या न्यायालयात हरकत/ आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात दाखल करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकत/ आक्षेप अर्ज विचारात घेतला जाणार नाही अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे जन्म / मुत्यू च्या नोंदी बाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- मंगरुळपीर
दिनांक :- २०/८/२०२४

नायब तहसिलदार
मंगरुळपीर


# युवकांनी सद्गुण अंगी बाळगून स्पर्धा परीक्षा करून मोठे अधिकारी व्हावे - श्रीदेवी पाटील

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त वाशिम येथून जवळील असलेल्या ग्राम अडोळी येथे दि ११ एप्रिल रोजी सकाळी १० वा.भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सविता इढोळे होत्या.हा उपक्रम फुले शाहू आंबेडकर ब्लड डोनर व रुग्ण सेवा ग्रुप, महाराष्ट्र तसेच समता सैनिक दल, जयंती उत्सव समिती अडोळी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील प्रमुख उपस्थित होत्या. तसेच अडोळी येथील सरपंच सौ. सविता इडोळी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघण, फुले शाहू आंबेडकर ब्लड डोनर व केकतउमरा वाशिम जिल्हा संस्थापक अध्यक्ष प्रदिप पट्टेबहादूर, जिल्हा रक्तपेढी




विभागाचे संचिन दंडे, मुख्यमंत्री वैद्यकीय पथकाचे जिल्हाध्यक्ष भागवत सावके, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद इडोळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार पडघण आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याचे आणि रक्तदानासारख्या उपक्रमांद्वारे मानवतेचा संदेश देण्याचे आवाहन केले.






# आज श्री संत रविदास फाउंडेशनचा कार्यारंभ सोहळा

**कारंजा :** सामाजिक कार्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या श्री संत रविदास फाउंडेशन या रजिस्टर्ड धर्मादायी संस्थेचा उद्घाटन व प्रथम कार्यारंभ म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा कारंजा येथे मंगळवार १४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील अलका बिल्डिंग जवळच्या नूतन सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागपूर येथील मॉरिश कॉलेजचे माजी संचालक प्रा.डॉ.भाऊ दायदार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके ह्या उद्घाटक म्हणून उपस्थित असतील तर प्रमुख अतिथी म्हणून गुरु रविदास चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे व गुरु रविदास विश्व महापीठचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव धाडवे उपस्थित राहणार आहेत.




paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३७ ■ मंगळवार १४ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या पुलामुळे भाविकांना सुविधा होईल - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**यवतमाळ व वर्धा जिल्हा जोडणाऱ्या मोठ्या पुलाचे भूमीपूजन**

**यवतमाळ आजनसरा दरम्यान २० किमीचे अंतर कमी होणार**

**जिल्ह्यात ४०० कोटीचे कामे मंजूर**

**वर्धा जनमाध्यम** : यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांना थेट जोडणारा आजनसरा येथील वर्धा नदीवरील प्रस्तावित पूल हा भाविकांसाठी तसेच नागरिकांसाठी 'जीवनदुवा' ठरणार असून, यामुळे प्रवासाचे अंतर कमी होऊन वेळ, इंधन व श्रमांची मोठी बचत होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

केंद्रीय रस्ते निधी योजनेतून सुमारे ३८ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या २७५ मीटर लांबीच्या या पुलाचे भूमिपूजन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मंत्री संजय राठोड, अशोक वुईके, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे, आमदार समीर कुणावार, राजेश बकाने यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. आजनसरा येथे असलेल्या संत भोजाजी महाराज देवस्थानाला विदर्भातील विविध जिल्ह्यांतून भाविक मोठ्या संख्येने भेट देतात. सध्या या ठिकाणी पोहोचण्यासाठी मोठा वळसा घ्यावा लागत असल्याने भाविकांना अडचणींचा



सामना करावा लागतो. नव्या पुलामुळे पोहणा मार्गे येणाऱ्यांचे सुमारे २० किलोमीटर, तर शिरसगाव मार्गे येणाऱ्यांचे सुमारे ३० किलोमीटर अंतर कमी होणार आहे. यामुळे प्रवास अधिक सुलभ होऊन भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

गडकरी यांनी सांगितले की, २०१४ पासून जिल्ह्यात रस्ते, पूल आणि अपघात प्रवण स्थळांच्या दुरुस्तीसाठी सुमारे १० हजार कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत. याचबरोबर मागील वर्षात ४०० कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. या कामांमुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले असून, व्यापार आणि वाहतूक व्यवस्थेलाही चालना मिळाली आहे.

स्वर्गीय भगवानजी आंबटकर यांनी या परिसराच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याने या पुलाला त्यांचे नाव देण्याचा प्रस्तावही गडकरी यांनी मांडला. तसेच संत भोजाजी महाराज देवस्थान येथे येणाऱ्या भाविकांसाठी निवास व अन्नछत्र सुविधा सुरू करण्यासाठी दत्ता मेघे फाऊंडेशनशी चर्चा सुरू असून, लवकरच त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.


यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल साधने आणि पूरक व्यवसायांच्या मदतीने शेती अधिक फायदेशीर बनविता येईल, असे त्यांनी नमूद केले. जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याची पातळी वाढवून बारमाही शेती शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

या पुलामुळे वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावे थेट जोडली जाणार असून, धार्मिक पर्यटनासह स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रानडुकरामुळे भीषण अपघात

## कार पलटी, चौघे जखमी

**सेलू जनमाध्यम-** वर्धा-नागपूर मार्गावर केळझर नजिक सामाजिक वनीकरण रोपवाटिकेजवळ रविवारी (ता. १२) मध्यरात्री अडीचच्या सुमारास भीषण अपघात घडला. रस्त्यावर अचानक रानडुक्कर आडवे आल्याने कारचालकाचे नियंत्रण सुटून कार दुभाजकावर आदळली आणि पलटी झाली. या अपघातात कारमधील चौघे जखमी झाले असून, त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ३२ वाय ४२४२ क्रमांकाची कार नागपूरहून वर्धेकडे येत होती. केळझर परिसरातील सामाजिक वनीकरण नर्सरीजवळ अचानक रानडुक्कर रस्त्यावर आल्याने चालक गोंधळला. वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकावर चढली व विरुद्ध दिशेच्या मार्गावर गेली. त्याचवेळी समोरून नागपूरकडे जाणाऱ्या एमएच ४० सीडी ५२६४ क्रमांकाच्या ट्रकला कारची जोरदार धडक बसली. धडकेनंतर कारने पलटी घेतल्याने अपघाताची तीव्रता वाढली.

या अपघातात चालक इलाही खान (रा. पुलफैल, वर्धा) यांच्यासह तमन्ना योगेश विश्वकर्मा (वय २७, रा. समतानगर), कोमल धानोरकर (वय २९, रा. वर्धा) आणि अल्फिया प्रणय फुलझेले (वय २१, रा. वरूड, वर्धा) हे जखमी झाले. सर्व जखमींना किरकोळ ते मध्यम स्वरूपाच्या दुखापती झाल्याची माहिती आहे.

अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. कारमधील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. काही काळ या मार्गावर वाहतुकीचा खोळंबा झाला होता.

घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून जखमींना रुग्णवाहिकेद्वारे सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, किरण वरभे आणि सचिन उपाध्ये यांनी प्राथमिक तपास केला. या मार्गावर वन्य प्राण्यांची वर्दळ वाढल्याने अपघातांची शक्यता कायम असल्याचे नागरिकांनी सांगितले असून, संबंधित विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# वडनेर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे अनावरण उत्साहात

वर्धा जनमाध्यम : हिंगणघाट तालुक्यातील वडनेर येथे तक्षशिला बौद्ध विहार परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण उत्साहात पार पडले. सामाजिक कार्यकर्ते राहुल कांबळे यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विशाल रामटेके, डॉ. गणेश बहादे, देविदास भगत, मंदा कांबळे, प्रा. पंकज मुन, निलेश हाडके, बडू फुलमाळी, प्रमोद पानबुडे, पंकज लभाणे, अमित गजभिये यांची उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत सामाजिक समता, शिक्षण आणि संघटन यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या विचारांवर चालत समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन वडनेर येथील तक्षशिला बौद्ध विहार पंचकमेटीच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, कार्यकर्ते तसेच बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला



# सेवाग्रामच्या मेडिकल चौकातील अतिक्रमण हटवले

## राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे प्रशासन सतर्क; सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य

वर्धा जनमाध्यम : द्रौपदी मुर्मू यांच्या १६ एप्रिल रोजी प्रस्तावित वर्धा जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारीला वेग दिला असून, सेवाग्राम परिसरात व्यापक स्वच्छता व अतिक्रमण निर्मूलन मोहीम हाती घेण्यात आली आहे. याचाच भाग म्हणून सोमवारी सेवाग्राम येथील गजबजलेल्या मेडिकल चौकातील अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली.

सोमवार, १३ एप्रिल रोजी सकाळी प्रशासन, महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने ही मोहीम राबवली.

जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यालगत उभारण्यात आलेली तात्पुरती दुकाने, हातगाड्या व अन्य बांधकामे हटवण्यात आली. कारवाईपूर्वी संबंधित व्यावसायिकांना नोटीस देऊन अतिक्रमण स्वखर्चाने हटविण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र काहींनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने प्रशासनाने थेट कारवाईचा मार्ग अवलंबला. या कारवाईदरम्यान काही ठिकाणी किरकोळ विरोधही पाहायला मिळाला. अनेक लहान व्यावसायिकांनी आपल्या उपजीविकेवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली. तथापि, पोलिस बंदोबस्तात मोहीम शांततेत पूर्ण करण्यात आली.

राष्ट्रपती मुर्मू या सेवाग्राम येथील सेवाग्राम आश्रम येथे भेट देणार असून, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ च्या सहाव्या दीक्षांत समारंभालाही



उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात सुरक्षा यंत्रणा सज्ज झाली आहे. राष्ट्रपतींच्या मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता, प्रकाशयोजना तसेच वाहतूक नियंत्रण यावर विशेष भर दिला जात आहे.

जिल्हा प्रशासनाकडून विविध विभागांना स्वतंत्र जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या असून, प्रत्येक कामावर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देखरेख ठेवली जात आहे. पोलिस विभागाकडून कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त पोलिस दलाचीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईमुळे काही लहान व्यावसायिकांवर उपजीविकेचे संकट ओढावले असून, त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी पुढे येत आहे. प्रशासनाने मात्र ही कारवाई नियोजनबद्ध पद्धतीने व पूर्वसूचनेनुसार केल्याचे स्पष्ट केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात बेड रिडन रुग्णांची फरफट

## खुर्चीत बसवून ओढत नेल्याचा व्हिडिओ व्हायरल : प्रशासन झोपेतच

**वर्धा जनमाध्यम :** उपचारासाठी शेवटची आशा मानल्या जाणाऱ्या जिल्हा सामान्य रुग्णालयातच आता रुग्णांची अमानुष फरफट होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. 'बेड रिडन' रुग्णाला व्हीलचेअर किंवा स्ट्रेचरऐवजी चक्क प्लास्टिकच्या खुर्चीत बसवून ओढत नेल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, या घटनेमुळे प्रशासनाच्या बेफिकीरीचे धिंडवडे निघाले आहेत.

रुग्णालयातील एका विभाग प्रमुखाकडून अतिरिक्त शल्य चिकित्सकांना मारहाण, अल्पावधीत दोनदा लागलेल्या आगीच्या घटना आणि आता रुग्णांची अशी अमानुष वागणूक या सगळ्या प्रकारांनी जिल्हा



रुग्णालयाचा कारभार 'रामभरोसे' असल्याचे उघडपणे दिसून येत आहे. नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाईची मागणी होत आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये एक महिला रुग्ण ऑटोरिक्षातून उतरवल्यानंतर तिला योग्य सुविधा न देता थेट प्लास्टिकच्या खुर्चीत बसवले जाते. त्यानंतर तिला ओढत-ताणत जेष्ठ नागरिकांच्या आरोग्य सेवेच्या कक्षात नेले जाते. हे दृश्य पाहून कोणाच्याही अंगावर काटा येईल, इतकी ही बाब गंभीर आहे.

विशेष म्हणजे, अशा रुग्णांसाठी रुग्णालयात व्हीलचेअर आणि स्ट्रेचरची सुविधा उपलब्ध असल्याचा दावा प्रशासन करत असले, तरी प्रत्यक्षात त्याचा वापर होत नसल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. रुग्णांच्या सन्मानाची व सुरक्षिततेची पायमल्ली होत असताना अधिकारी मात्र कागदोपत्री व्यवस्था दाखवण्यातच गुंतले असल्याची टीका होत आहे.

जिल्हा रुग्णालयावर ग्रामीण भागातील हजारो रुग्णांचा विश्वास आहे. गरीब, गरजू आणि जेष्ठ नागरिक उपचारासाठी येथे धाव घेतात. मात्र अशा प्रकारच्या घटनांमुळे या विश्वासाला तडा जात असून, रुग्णालयातील व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

दरम्यान, या घटनेनंतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. रुग्णालयात उपचाराऐवजी अपमानच मिळणार असेल, तर सामान्य माणसाने न्याय कुणाकडे मागायचा असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# अभियंता महेश मलमे यांचे निधन




सेलू जनमाध्यम : पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील अभियंता महेश मलमे (वय ४०) यांचे सोमवारी (दि. १३) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मलमे हे सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे पंचायत समिती कार्यालयात हजर झाले होते. त्यानंतर कामाच्या पाहणीसाठी ते केळझर येथे गेले असता अचानक त्यांची प्रकृती बिघडली. तातडीने त्यांना सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

आज मंगळवार (दि. १४) सकाळी ११ वाजता बोरगाव मेघे येथील त्यांच्या राहत्या घरातून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.

# मिनाताई रमेशपंत सिंगरू यांचे निधन



हिंगणघाट : नगर परिषद कॉलनी येथील रहिवासी मिनाताई रमेशपंत सिंगरू (वय ८२) यांचो आजारपणाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर वणा मोक्षधाम, हिंगणघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

जनमाध्यम

paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

मंगळवार १४ एप्रिल २०२६

# विदर्भात ऊष्णतेची लाट तीव्र



- अकोल्यात पारा 43.1 अंशांवर
- देशातील सर्वाधिक तापमान
- हवामान खात्याचा सावधानतेचा इशारा

**नागपूर/प्रतिनिधी-** राज्यात ऊष्णतेची लाट तीव्र होत असून रविवारी विदर्भातील अकोला हे शहर देशातील सर्वाधिक ऊष्ण शहर ठरले. अकोला शहरात रविवारी ४३.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.

**विदर्भातील सर्वच शहरे तापलेली-** मधल्या काळात अवकाळी पाउस आणि ढगाळ हवामानामुळे वातावरणात बराच बदल झाला होता. मात्र, आता ढगाळ वातावरण दूर होताच तीन दिवसात विदर्भातील तापमानाचा पारा पाच अंश सेल्सिअसने वाढला. रविवारी अकोला जिल्ह्याचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले. त्यामुळे ते देशातील सर्वाधिक ऊष्ण शहर ठरले. अकोला पाठोपाठ अमरावती, वर्धा, वाशिम या शहरांतही पारा चांगलाच वाढला होता. ब्रम्हपुरी वगळता विदर्भातील सर्वच शहराने ४० अंश सेल्सिअस तापमान ओलांडले.

**तापमान वाढतेच राहणार-**हवामान खात्याने पुढील ८ ते १० दिवस वातावरण कोरडे व ऊष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे तापमानाचा पारा चढताच राहणार असून ऊन्हाच्या झळा बसणार आहेत. मार्च महिन्यातच ऊन्हाच्या झळा जाणवू लागल्या होत्या, पण अवकाळी पावसाने हा पारा खाली आला. मात्र, आता पुन्हा एकदा तापमानाने ऊसळी घेतली आहे. तापमानात झपाट्याने वाढ होत असून आता हवामान खात्यानेही ऊष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

**किमान तापमानातही वाढ-**अकोला शहरात शनिवारी देखील ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली होती. मागील तीन दिवसात तापमानात चार अंशांनी वाढ झाल्याने अकोल्यात ऊकाडा वाढला आहे. गुरुवारी ३८.७ अंशावर तापमान पोहोचले होते. पण शुक्रवारी या तापमानात वाढ



होउन ते ४०.१ अंशांवर पोहोचले. तर शनिवारी ४२ अंश तापमानाची नोंद करण्यात आली.अमरावती येथे रविवारी ४२.४ अंश तापमानासह दुस-या क्रमांकाची नोंद झाली आहे. किमान तापमानातही ब-याच प्रमाणात वाढ झाली आहे. किमान तापमान देखील २७ अंशावर पोहचले आहे.

**ऊकड्यामुळे नागरिक त्रस्त**-तीव्र ऊन्हामुळे अकोल्यातील दैनंदिन जीवनावर परिणाम दिसून येत आहे. दुपारच्या सुमारास रस्त्यांवरील वर्दळ कमी झाली असून नागरिक शक्यतो घरातच राहणे पसंत करत आहेत. जवळपास सर्वच शहरांमध्ये सारखी स्थिती आहे. ऊष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक प्रयत्न करताना दिसून येत आहे. ऊन्हामुळे चक्कर येणे, ऊलट्या होणे, डोकेदुखी आणि अंगात ताप येणे ही ऊष्माघाताची प्रमुख लक्षणे दिसून येत आहेत. अशी लक्षणे दिसल्यास संबंधित व्यक्तीला तातडीने सावलीत न्यावे.शरीर थंड ठेवावे आणि गरज भासल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नगर महामार्गावर भीषण अपघात; 11 ठार



अहिल्यानगर : प्रतिनिधी- कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर आज काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला आहे. एका ईको कार आणि सिमेंट मिक्सर ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली असून, या भीषण अपघातात ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात इतका भीषण होता की दोन्ही वाहनांच्या धडकेनंतर ईको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. सिमेंट मिक्सर आणि कारची समोरासमोर धडक झाल्याने कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीही मिळाली नाही. या भीषण धडकेत ११ जणांनी जागीच प्राण गमावले आहेत. अपघाताचा आवाज होताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक पोलीस प्रशासनही घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना आणि जखमीला बाहेर काढले. या अपघातातील एकमेव गंभीर जखमी व्यक्तीला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. मृतांची ओळख पटवण्याचे काम सध्या पोलिसांकडून सुरू आहे.या घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्तकेली जात आहे.कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरती एका पुलावरती हा भीषण अपघात झाला आहे. सिमेंट मिक्सर आणि ईको या कारमध्ये अपघात झाला. कल्याण ते मुरबाड अशी प्रवासी वाहतूक करणारी ही ईको कार होती. ईको कारने सिमेंट मिक्सरला जोरदार धडक दिल्याने या कारमधील ८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आणि त्यातील १ प्रवासी बचावला आहे, त्याच्यावरती उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी प्रवाशांना बाहेर काढलं, १ जण गंभीर जखमी झाला आहे त्याला उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.स्थानिक नागरिकांनी या अपघाताबाबत दिलेल्या माहितीनुसार, ईको कारमधून ११ प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले तर एक प्रवासी गंभीर जखमी झाला होता, त्याला खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनं हळहळ व्यक्त होत आहे.

# सोने 50000 तर चांदी 2 लाखांनी स्वस्त

**नागपूर/प्रतिनिधी-** या युद्धादरम्यान सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण झाली असून, सोने आपल्या ऊच्चांकी पातळीवरून जवळपास ५० हजार रुपयांनी खाली आले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून सोन्या-चांदीच्या किमतीत सातत्याने घसरण होताना दिसत आहे. सर्वसाधारणपणे जागतिक अस्थिरता अथवा युद्धाच्या काळात सोन्या-चांदीची मागणी आणि दरही वाढतात. मात्र, अमेरिका-इराण युद्धात भारतीय बाजारपेठेत एक वेगळीच स्थिती बघायला मिळत आहे. या युद्धादरम्यान सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण झाली असून, सोने आपल्या ऊच्चांकी पातळीवरून जवळपास ५० हजार रुपयांनी खाली आले आहे. युद्धकाळात सोन्याचांदीच्या दरात मोठी घसरण - युद्धाच्या गेल्या ४० दिवसांतील आकडेवारीचा विचार करता, २८ फेब्रुवारीला सोन्याचा दर १६४७३० रुपये प्रति १० ग्रॅम एवढा होता. जो १० एप्रिल रोजी १५०३०५ रुपयांवर



पोहोचला. अर्थात केवळ युद्धकाळातच सोनं १४ हजार रुपयांहून अधिक स्वस्त झाले आहे. चांदीचा विचार करता, २८ फेब्रुवारीला चांदी २५५००० रुपये प्रति किलो होती, जी १० एप्रिल रोजी २३९९३४ रुपये प्रति किलोवर आली आहे. चांदी आपल्या ऊच्चांकी दराचा विचार करता, १.९६ लाख रुपयांनी स्वस्त झाली आहे. एमसीएक्स (MCX) वर सोन्याने २.०२ लाख रुपये आणि चांदीने ४.३९ लाख रुपयांचा ऊच्चांकी टप्पा गाठला होता. गेल्या आठवड्यात दोन्ही देशांमध्ये 'सीझफायर'च्या चर्चेमुळे किमतीत किंचित वाढ झाली होती. मात्र आता दोन्ही देसांतील शांतता चर्चा फिस्कटली आहे. दोन्ही देशांत अटींवरून सहमती न झाल्याने आणि 'हॉर्मुझ' सामुद्रधुनीचा वाद कायम असल्याने युद्ध आणखी तीव्र होण्याचे संकेत आहेत. तेल आणि वायूच्या पुरवठा साखळीत अडथळे येण्याची शक्यता आहे. याच बरोबर सोन्या-चांदीच्या दरातही पुन्हा घसरण बघायला मिळू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे.

# यवतमाळमध्ये प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांचे मोठे रॅकेट उद्धवस्त; 20 लाखांचा मुद्देमाल जप्त

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अवैध बियाणे विक्री आणि वाहतुकीविरोधात कृषी विभाग व पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या अनधिकृत एचटीबीटी (प्लॅटिनम ५जी) कापूस बियाण्यांची चोरटी वाहतूक करणा-या टोळीचा पर्दाफाश करत सुमारे २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**गोपनीय माहितीवरून रचला सापळा-**१२ एप्रिल रोजी यवतमाळ शहरात एका किया सोनेट (जिजे-०९-५४८६) आणि अन्य एका चारचाकी वाहनातून प्रतिबंधित बियाण्यांची तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे कृषी विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या सापळा रचून ही वाहने अडवली.

**जप्त करण्यात आलेला मुद्देमाल-** झडती दरम्यान पथकाला मोठ्या प्रमाणात एचटीबीटी बियाण्याचा अवैध साठा मिळून आला. यामध्ये प्लॅटिनम ५जी नावाच्या प्रतिबंधित कापूस बियाण्यांची ४०० पाकिटे (एकूण ८ पोते) आहेत. जप्त केलेल्या बियाण्यांची बाजारभावानुसार किंमत ३ लाख ६० हजार रुपये इतकी आहे. या कारवाईत दोन चारचाकी वाहने आणि ३ मोबाईल



फोन (किंमत १६.४० लाख रुपये) असा एकूण २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

**तिघांविरुद्ध गुन्हा दाखल**-या प्रकरणी कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) प्रेमनाथ आडे यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी संतोष ठाकरे (रा. चांदूर रेल्वे, जि. अमरावती), निखिल लंगडे (रा. आर्वी, जि. वर्धा), सतीश ठाकरे (रा. अमरावती) या तिघांना अटक केली. आरोपींविरुद्ध बियाणे कायदा १९६६, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या विविध कलमान्वये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही कारवाई निविष्ठा व गुणनियंत्रक संचालक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे आणि कृषी विकास अधिकारी लहुदास आडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धीरज मोहेकर, प्रवीण जाधव व सहका-यांनी यशस्वीरित्या पार पाडली.


**प्रतिबंधित बियाण्यांमुळे जमिनीचे नुकसान-**शेतक-यांनी अनधिकृत आणि प्रतिबंधित बियाण्यांची खरेदी करू नये, कारण यामुळे जमिनीचे आणि पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होउ शकते. अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# ट्रकची धडक; सात ठार

**राजकोट / वृत्तसंस्था-**सुरेंद्रनगर-विरमगाम महामार्गावरील भास्कर पराना पाटिया जवळ एक भीषण अपघात घडलाय. या भयानक अपघातात सात जणांचा जागीच मृत्यू झालाय. एका ट्रक चालकाने १० जणांना धडक दिली, ज्यापैकी सात जणांचा मृत्यू झालाय. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचा ताफा आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी धावून आले; त्यांनी १०८ रुगणवाहिकेच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.राजकोट जिल्ह्यातील गढका गावातून भाविकांचा एक गट डेकावाडा येथील महादेवजी मंदिराकडे पायी जात होता. याच दरम्यान, भरधाव वेगाने येणा-या एका ट्रक चालकाने भास्कर पराना पाटिया जवळ या भाविकांना धडक दिली. या अपघातात पाच महिला आणि दोन पुरुषांचा मृत्यू झालाय. इतर तीन जणांची प्रकृती अद्यापही चिंताजनक आहे. तपासादरम्यान हे सर्वजण भरवाड समाजातील मुंढवा कुटुंबाशी संबंधित असल्याचे समोर आले असून, मृतांची ओळख पटवण्याचे काम आता सुरू करण्यात आलं. हा अपघात इतका भीषण होता की, मृतांचे मृतदेह महामार्गावर विखुरलेल्या अवस्थेत पडले होते. सध्या लखतर पोलिसांनी महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या टप्प्यावर सर्व मृतदेह सुरेंद्रनगर येथील लखतर सरकारी रुगणालयात हलवण्यात आले आहेत. जखमींना विरमगाम येथील सरकारी रुगणालयात दाखल करण्यात आले असून, पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

# इस्त्रायलचा महात्मा गांधी हॉस्पिटलवर हल्ला; सगळीकडे विध्वंस

**तेहरान -** इस्त्रायलनंइराणमधील महात्मा गांधी रुगणालयावर भीषण हल्ला केला आहे. या हल्ल्यात संपूर्ण हॉस्पिटल उद्धवस्त झालं आहे. मागील ४० दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धात अमेरिका-इस्त्रायलकडून नागरी वस्तीत केलेल्या हल्ल्याचे व्हिडिओ आणि फोटो जगाला दाखवण्याचं काम इराणकडून केले जात आहे. इस्त्रायलनं हॉस्पिटलवर केलेल्या हल्ल्यात प्रचंड नुकसान झाले. भारतातील इराणी दूतावासाने एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यात तेहरान येथील महात्मा गांधी रुगणालयातील नुकसान दाखवण्यात आले आहे. हे हॉस्पिटल लहान मुलांसाठी बनले होते. हवाई हल्ल्यानंतर हॉस्पिटलची दुरावस्था समोर आली आहे. या व्हिडिओत दाखवण्यात आले आहे की, इराणने युद्धात ११ देशांवर हल्ले केले परंतु त्यांनी कधीही हॉस्पिटल अथवा लहान मुलांना टार्गेट केले नाही. इराणमध्ये ६०० हून अधिक हॉस्पिटल आणि ६० पेक्षा जास्त शाळांवर अमेरिका-इस्त्रायलने मिसाइल हल्ले केल्याचा आरोप



आहे. २ मार्च रोजी इस्त्रायलने हवाई हल्ला करत उत्तर तेहरानमधील महात्मा गांधी रुगणालयाला टार्गेट केले. जागतिक आरोग्य संघटनेने याची पुष्टी केली. इस्त्रायलवर कायम हॉस्पिटलवर हल्ले करण्याचा आरोप लागला आहे. गाझावरील हल्ल्यातही इस्त्रायलने अनेक हॉस्पिटल टार्गेट केले. या हॉस्पिटलचा वापर दहशतवादी कृत्यांसाठी केला जायचा असा इस्त्रायलचा दावा आहे. मात्र इराणमधील गांधी रुगणालयावरील हल्ला अमेरिका-इस्त्रायलच्या संयुक्त हल्ल्यानंतर दुस-याच दिवशी करण्यात आला. इराणमधील विविध माध्यमांनी हॉस्पिटलच्या आतील व्हिडिओ फुटेज समोर आणले आहेत. ज्यात व्हिलचेअरजवळ मलबा विखुरलेल्या अवस्थेत दिसतो. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात हॉस्पिटलचे मोठे नुकसान झाले. या हल्ल्यानंतर तातडीने तिथल्या रुगणांना दुसरीकडे नेण्यात आले. हे हॉस्पिटल तेहरानच्या गांधी स्ट्रीटवर आहे. लहान मुलांचे हॉस्पिटल म्हणून ते ओळखले जाते. भारतासोबत विशेष नाते असल्याने या हॉस्पिटलचे नाव महात्मा गांधी ठेवण्यात आले होते. हे इराणमधील सर्वात मोठे खासगी रुगणालय आहे. दरम्यान, इराणमध्ये महात्मा गांधी यांच्या नावावर अनेक रस्ते आणि चौक आहेत. अत्याचाराविरोधात लढाई आणि मानवतेच्या दृष्टीने गांधींनी केलेला संघर्ष यासाठी सन्मान म्हणून इराणने ही नावे दिली आहेत. शांतता आणि अहिंसेच्या माध्यमातून साम्राज्यवादी शक्तींचा सामना महात्मा गांधी यांनी केला होता. त्यामुळे इराणमध्ये त्यांच्याविषयी आदर आहे. त्यातूनच इराणमध्ये २००८-०९ साली अत्याधुनिक आरोग्य केंद्राचे नाव गांधींच्या नावावर ठेवले होते. परंतु इस्त्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यात गांधी रुगणालय उद्धवस्त झालेली इमारत बनवून राहिलं आहे.

# जहाल नक्षल कमांडर 'रूपी' ठार

## छत्तीसगडच्या कांकेरमध्ये चकमक, जोरदार धुमश्चक्री

**गडचिरोली/प्रतिनिधी- :** छत्तीसगडमध्ये माओवादविरोधी अभियानाला मोठे यश मिळत असून पखांजूर भागातील माचपल्ली जंगलात १३ एप्रिल रोजी सकाळी झालेल्या भीषण चकमकीत सुरक्षा दलाने जहाल माओवादी आणि मेढकी एलओएस कमांडर रूपी हिला कंठस्नान घातले. रूपीच्या खात्म्यामुळे नक्षल्यांच्या नेटवर्कला मोठा हादरा बसला असून बड्या कॅडरचा प्रभाव आता ओसरू लागला आहे. छत्तीसगडच्या बस्तर मध्ये शेवटच्या सहा जहाल माओवादी कमांडरसाठी जवानांनी चक्रव्यूह रचले होते. काही माओवादी कांकेरमध्ये माचपल्ली भागात दडून बसल्याची सुरक्षा यंत्रणाला माहिती होती. त्यानुसार कांकेरचे पोलिस अधीक्षक



निखिल बारेचा यांच्या मार्गदर्शनात जवानांनी सर्च ऑपरेशन सुरू केले होते. या दरम्यान १३ एप्रिल रोजी सकाळी दबा धरून बसलेल्या नक्षल्यांनी गोळीबार सुरू केला. जवानांनी दिलेल्या चोख प्रत्युत्तरात जहाल नक्षली कमांडर रूपी ठार झाली. गेल्या अनेक दिवसांपासून जवान तिच्या शोधात होते. बस्तर भागात सक्रिय असलेल्या अनेक बड्या नेत्यांनी एकतर आत्मसमर्पण केले आहे किंवा ते चकमकीत मारले गेले आहेत. या भागातील रूपी ही शेवटची मोठी कमांडर मानली जात होती.

**अंगरक्षक रामकायने सोडली होती साथ-**जहाल कमांडर रुपी हिची अंगरक्षक म्हणून रामकाय मंडावी ही काम पाहायची. आठवडाभरापूर्वी रामकायने कांकेर येथे शस्त्रासह शरणागती पत्करली होती. बॉडीगार्डने साथ सोडल्यामुळे रुपी अन्य कॅडरसोबत कांकेरच्या माचपल्ली जंगलात दडून बसली होती. खात्मा झाला. तिच्यावर पाच लाखांचे बक्षीस होते.

# नेपाळ-भारत संबंध पुन्हा सुधारणार

## बालेन शाह घेणार पंतप्रधान मोदींची भेट परंपरा कायम ठेवत हितही साधणार

**काठमांड/वृत्तसंस्था- :** नेपाळमध्ये नवीन सरकार स्थापन झालं असून बालेन शाह पंतप्रधान बनले आहेत. नेपाळ सरकारचे नवे पंतप्रधान सर्वात आधी भारताचा दौरा करतात ही जुनी परंपरा आहे. बालेन शाहदेखील ही परंपरा कायम ठेवणार आहेत. परंतु ते जुन्या पंतप्रधानांप्रमाणे भारतीय पंतप्रधानांची केवळ औपचारिक भेट घेणार नाहीत तर त्यांनी भारतासमोर काही अटी ठेवल्या आहेत.

नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी याची पुष्टी करत म्हटले आहे की, भारत आणि नेपाळचे अधिकारी अशा मुद्यांवर काम करत आहेत ते अंतिम झाल्यानंतर बालेन शाह दिल्ली दौरा करतील. पंतप्रधान बालेन शाह यांना भारतीय पंतप्रधानांकडून भारतात येण्याचे आमंत्रण मिळाले आहे आणि त्यांनी ते स्वीकारले आहे. परंतु बालेन शाह पंतप्रधान मोदींना केवळ भेटणार नाहीत तर या भेटीतून काही फलित निघेल असा संवाद त्यांना साधायचा आहे. केपी शर्मा ओली यांच्या कार्यकाळात नेपाळ आणि भारताचे संबंध खूप बिघडले होते. परंतु आता नेपाळमधील नवे सरकार भारतासोबत



संबंध पुन्हा रुळावर आणण्याच्या तयारीत आहे. ओली यांच्या कारकि-र्दीत भारत आणि नेपाळ संबंध बिघडले होते. त्यातून ओली यांना चीनचा माणूस अशी प्रतिमा तयार झाली. ओली यांच्या आडकाठी भूमिकांमुळे हे संबंध ताणले गेले होते. आता पंतप्रधान बालेन शाह भारतासोबत अनेक मुद्यांवर चर्चा करण्यासाठी दौरा करत आहेत, जेणेकरून या भेटीतून काहीतरी साध्य होईल. भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंध सुधारण्याबाबत अनेक मुद्यांवर ते मोदींसोबत चर्चा साधतील असं नेपाळी परराष्ट्र मत्र्यांनी सांगितले.

**नेपाळसोबत संबंध का बिघडले?-**ओली यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात नेपाळमध्ये संविधानात दुरुस्ती करून नवीन नकाशा प्रसिद्ध केला होता. ज्यात कालापानी, लिम्पियाधुरा आणि लिपुलेख या भारतीय भागांचा समावेश नेपाळमध्ये केला होता. ओली यांनी नेपाळी लोकांना भारतीयांविरोधात भडकावले होते. भारताच्या राष्ट्रीय प्रतिकाचा अपमान ओली यांनी केला होता. प्रभू रामांचा जन्म भारतात नाही तर नेपाळमध्ये झाल्याचा दावाही त्यांनी केला. परंतु ओली आता इतिहासजमा झालेत. नेपाळच्या राजकारणात नवे लोक आलेत. त्यांना भारतासोबत संबंध कसे ठेवायचे आहेत हे ठरवायचे आहे.

**नेपाळला काय मिळणार?**

बालेन शाह यांच्या नेतृत्वात नेपाळमध्ये राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे सरकार बनले आहे. भारतासोबत त्यांना संबंध सुधारण्याची इच्छा आहे. ते भारताकडे एक अतिरिक्त हवाई मार्गाची मागणी करू शकतात. जेणेकरून नेपाळ जगातील इतर भागाशी सहज हवाई संपर्क ठेवेल. लिपुलेखच्या मार्गाने होणा-या व्यापारावरही चर्चा होईल. त्यामुळे बालेन शाह यांच्या दौ-यात नेपाळला काय मिळते हे पाहणे गरजेचे आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निवडणूक आणि राजकीय रंग

दिल्लीपासून गल्लीपर्यंत पश्चिम बंगालच्या निवडणुकीकडे लागलेली नजर व्यापक परिणामांची साक्ष देते. या निवडणुकीमध्ये केवळ विकास, रोजगार किंवा स्थानिक प्रश्न नाहीत,तर राष्ट्रीय सुरक्षा, सीमा व्यवस्थापन, स्थलांतर आणि सामाजिक संतुलन यासारखे व्यापक मुद्देही मध्यवर्ती ठरत आहेत. बांगलादेशच्या सीमेला लागून असलेले हे राज्य संवेदनशील मानले जाते आणि त्यामुळेच केंद्र विरुद्ध राज्य अशी राजकीय लढत अधिक तीव्र होते. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल हे केवळ प्रादेशिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेचेही केंद्र बनले आहे. सुमारे सात कोटी मतदार आणि विधानसभेच्या २९४ जागा असलेले पश्चिम बंगाल देशातील मोठ्या आणि प्रभावी राज्यांपैकी एक आहे.येथे मिळालेला विजय कोणत्याही पक्षासाठी राष्ट्रीय ताकद वाढवणारा ठरतो. म्हणूनच पश्चिम बंगाल जिंकणे म्हणजे फक्त एक राज्य जिंकणे नाही, तर देशाच्या राजकारणात आपली पकड अधिक भक्कम करणे होय.या निवडणुकीमध्ये मुख्य लढत तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातच केंद्रित झालेली दिसते. तृणमूल काँग्रेस गेली १५ वर्षे सत्तेत आहे आणि ममता बॅनर्जी चौथ्यांदा विजय मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपने या राज्यामध्ये जनाधार वाढवला असून यावेळी सत्तेवर येण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली आहे. भाजपला येथे विजय मिळणे केवळ राजकीय नव्हे तर प्रतीकात्मकदृष्ट्याही मोठे यश ठरेल. ही निवडणूक २०२९ च्या लोकसभा निवडणुकीआधीची महत्त्वाची लढत मानली जात आहे. येथे मिळणारा विजय किंवा पराभव पक्षांच्या आत्मविश्वासावर आणि आगामी रणनीतीवर मोठा प्रभाव टाकेल. त्यामुळेच प्रत्येक पक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. सीमा, घुसखोरी आणि सुरक्षा हे या निवडणुकीतील प्रमुख मुद्दे आहेत. भाजपकडून अवैध स्थलांतराचा मुद्दा जोरात मांडला जात आहे, तर सत्ताधारी पक्ष या आरोपांना राजकीय रंग देत आहे.याशिवाय,कोलकात्यातील आर.जी. कर वैद्यकीय महाविद्यालयातील बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाने राज्य सरकारच्या प्रतिमेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. हा मुद्दा शहरी आणि सुशिक्षित मतदारांमध्ये जास्त चर्चिला जात आहे.धर्म आणि राजकारण यांचे मिश्रणही या निवडणुकीत प्रकर्षाने दिसते. सुमारे ३० टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या राज्यात धार्मिक ध्रुवीकरण हा निर्णायक घटक ठरू शकतो.यासोबतच निवडणूक हिंसा हा पश्चिम बंगालच्या राजकारणातील जुना पण अजूनही जिवंत असलेला मुद्दा आहे. मतदानाच्या काळात हिंसाचाराच्या घटनांमुळे ही निवडणूक अधिक संवेदनशील बनते.पश्चिम बंगालमध्ये मतदान दोन टप्प्यांमध्ये म्हणजे २३ आणि २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये पश्चिम बंगालमध्ये सहा, सात, किंबहुना कधी आठ टप्प्यांमध्येही मतदान झाले आहे.त्या तुलनेत यंदाचा कार्यक्रम लहान आहे. संपूर्ण एक महिना चालणा-या प्रक्रियेऐवजी केवळ एका आठवड्यात निवडणूक पूर्ण होणार आहे. तरीही फक्त हेच एक कारण नाही, की पश्चिम बंगालचा निवडणुकीचा माहोल देशातील इतर भागांपेक्षा वेगळा दिसतो. सुमारे पन्नास वर्षांपासून या राज्यात प्रामुख्याने त्या पक्षांचे वर्चस्व राहिले आहे, ज्यांचे प्रमुख राजकीय प्रतिस्पर्धी दिल्लीतील सत्ताधारी पक्ष राहिले आहेत. यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांमधील संघर्ष हा पश्चिम बंगालच्या राजकारणात वारंवार दिसणारा घटक बनला आहे. सध्याच्या विधानसभा निवडणुकीकडे पाहता किमान पाच महत्त्वाचे घटक असे आहेत, जे या निवडणुकीला देशातील इतर निवडणुकांपासून वेगळे ठरवतात. पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीपूर्वी, निवडणुकीदरम्यान आणि निवडणुकीनंतर ज्या प्रमाणावर राजकीय हिंसा होते, त्याची तुलना देशातील इतर कोणत्याही राज्याशी करता येत नाही. राष्ट्रीय आकडेवारीनुसारही निवडणुकांदरम्यान राजकीय हिंसाचारात सर्वाधिक जीवित हानी पश्चिम बंगालमध्येच होते. यामागील एक रचनात्मक कारण म्हणजे राज्यात असलेली शेतीची मर्यादित जमीन आणि अतिशय जास्त लोकसंख्या घनता. कमी जमिनीवर अधिक लोकांमधील स्पर्धेमुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. याशिवाय, कोणताही पक्ष सत्तेत असो, 'जो जिंकतो तोच सर्वकाही मिळवतो' अशी मानसिकता येथे प्रभावी राहते. म्हणजे सत्ताधारी पक्ष समाजाच्या प्रत्येक स्तरावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे सत्ताधारी पक्षाचा प्रभाव गावापासून शहरांपर्यंत सर्वत्र दिसून येतो. कोलकाता शहराची प्रतिमा सुसंस्कृत आणि बुद्धिजीवी रहिवाशांमुळे बनली असली, तरी ग्रामीण पश्चिम बंगालमध्ये राजकीय हिंसा दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे. निवडणूक आयोगाने मतदार याद्या सुधारण्यासाठी 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया बिहार, उत्तर प्रदेश आणि केरळसारख्या राज्यांमध्ये सुरळीत पार पडली आहे किंवा सुरू आहे; पण पश्चिम बंगालमध्ये या प्रक्रियेवर अभूतपूर्व वाद, आंदोलन, न्यायालयीन खटले आणि अव्यवस्थेचे आरोप झाले. सर्वोच्च न्यायालयानेही प्रश्न उपस्थित केला की इतर राज्यांमध्ये काही समस्या नसताना पश्चिम बंगालमध्येच एवढे प्रश्न का निर्माण झाले?याचे उत्तर राज्याच्या सीमावर्ती बदलत्या परिस्थितीत आणि स्थलांतराच्या दीर्घ इतिहासात दडले आहे. १९४७ च्या फाळणीनंतर पश्चिम बंगालमध्ये शरणार्थी सतत येत राहिले. कालांतराने अवैध स्थलांतर हा मोठा राजकीय मुद्दा बनला. कोलकाता हे पूर्व आणि ईशान्य भारतातील मोठे औद्योगिक केंद्र असल्याने रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर लोक स्थायिक झाले. यातील अनेकांना 'मूळ रहिवासी' मानले गेले नाही. त्यामुळे नागरी हक्कांसाठी त्यांना संघर्ष करावा लागला. परिणामी, मतदार यादीत नाव असणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून ओळख आणि हक्कांचा प्रश्न बनला आहे. याच कारणामुळे ममता बॅनर्जी यांनी हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर नेला, आंदोलन केले आणि निवडणूक प्रचाराचा मुख्य मुद्दा बनवला. निवडणूक आयोगाच्या अंमलबजावणीतील त्रुटींमुळे लोकांचा रोष अधिक वाढला आहे. त्यावरून सर्वत्र वातावरण ढवळून निघाले.

# 'आप'चा जखमी शिलेदार

**ज्या वेगाने तरुण, कार्यक्षम, बुद्धिमान व पक्षाचा 'थिंक टँक' म्हणून ओळखले जाणारे राघव चड्ढा यांचा आलेख आम आदमी पक्षात उंचावला गेला, त्याच वेगाने पक्षाने त्यांची आता कोंडी सुरू केली आहे. पक्षाने केलेल्या कारवाईनंतर चड्ढा कमालीचे अस्वस्थ झाले. आपले काहीही चुकले नाही, आपण सर्वसामान्य जनतेचे प्रश्न संसदेत मांडत होतो, त्यामुळे पक्षाचे काय नुकसान झाले, असा प्रश्न ते विचारत आहेत.**





पक्षाचा अजेंडा राबवायचा की विमानतळावरील सामोसे आणि मोबाईल रिचार्ज करण्याचे दर महागडे का, असा प्रश्न विचारायचा, यावरून आम आदमी पक्षाचे बॉसेस आणि राज्यसभेतील पक्षाचे उपनेते राघव चड्ढा यांच्यात मोठे शीतयुद्ध सुरू आहे. पक्षाचे सर्वोच्च नेते दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा अटक झाल्यानंतर राघव चड्ढा रस्त्यावर उतरले नाहीत, पक्षाने केलेल्या निदर्शनात सामील झाले नाहीत, त्यांनी केंद्राचा साधा निषेधही नोंदवला नाही. मग, त्यांना उपनेतेपदावर ठेवायचे कशाला? या मुद्द्यावरून पक्षात खदखद वाढत गेली व त्याची परिणती चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून अचानक हटविण्यात आले. एवढेच नव्हे, तर राज्यसभेतील चर्चेमध्ये पक्षाच्या वतीने त्यांना भाषणाची संधी देण्यात येऊ नये, असेही पक्षाने राज्यसभा सचिवालयाला कळवून टाकले.

ज्या वेगाने तरुण, कार्यक्षम, बुद्धिमान व पक्षाचा 'थिंक टँक' म्हणून ओळखले जाणारे राघव चड्ढा यांचा आलेख आम आदमी पक्षात उंचावला गेला, त्याच वेगाने पक्षाने त्यांची आता कोंडी सुरू केली आहे. पक्षाने केलेल्या कारवाईनंतर चड्ढा कमालीचे अस्वस्थ झाले. आपले काहीही चुकले नाही, आपण सर्वसामान्य जनतेचे प्रश्न संसदेत मांडत होतो. त्यामुळे पक्षाचे काय नुकसान झाले, असा प्रश्न ते विचारत आहेत. पक्षातील ज्यांनी मला पदावरून हटविण्याचे कारस्थान रचले, त्यांना मी एवढेच सांगू इच्छितो, 'मेरी खामोशी को मेरी हार मत समझ लेना, में वो दरिया हूं, जो वक्त आने पर सैलाब बन जाता हैं, खामोश कराया, हारा नहीं हूं मै.' राघव चड्ढा यांनी आपल्या साईटवर अमेरिकन लेखक रॉबर्ट ग्रीन याच्या पुस्तकातील एका प्रकरणातील पानाचा संदर्भ दिला आहे. लेखकाने म्हटले आहे, आपले मालक किंवा बॉस यांच्यापेक्षा आपण कोणी मोठे आहोत, असे समजून चमकोगिरी करू नका. आपल्या वरिष्ठांना नेहमीच ते आपल्यापेक्षा उत्तम व श्रेष्ठ आहेत, असे वाटले पाहिजे. असे जर आपण वागाल, तरच आपण प्रगती करू शकाल. चड्ढा यांनी हे पुस्तक वाचतानाचा फोटो व्हायरल केला आहे. त्यांच्या टीकेचा रोख थेट त्यांचे सुप्रीम बॉस केजरीवाल यांच्यावरच आहे.

राघव चड्ढा म्हणतात, विमानतळावर खाद्यपदार्थांच्या किमती खूपच आहेत. झोमॅटो किंवा ब्लिंकीटच्या डिलिव्हरी रायडर्सचा मुद्दाही संवेदनशील आहे, बँकांकडून अतिरिक्त दर आकारणी होते आहे, मध्यमवर्गीयांवर करांचे ओझे सतत वाढत आहे, आरोग्य विम्यावरील जीएसटी, पॅटर्निटी लिव्ह (पितृत्व रजा), बँक खात्यात किमान रक्कम ठेवण्याचे निर्बंध, टेलिकॉम कंपन्या बारा महिन्यांत तेरा वेळा रिचार्ज करायला लावतात हे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आपण संसदेत मांडले, तर आम आदमी पक्षाचे काय नुकसान झाले? चड्ढा यांना हटवून पक्षाचे दुसरे खासदार अशोक मित्तल यांची नेमणूक उपनेतेपदावर करण्यात आली आहे. 'आप'ने दिल्लीतील सत्ता गमावली, संसदेत आप विरोधी पक्षात आहे. आपचे चार बडे नेते दोन-दोन वर्षे जेलची हवा खाऊन बाहेर आले आहेत. दिल्ली विधानसभेत दिल्लीकरांनी भाजपला जनादेश दिला आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा संपलेला नाही. असे असताना आम आदमी पक्षात सारे काही अलबेल नाही, हेच राघव चड्ढा यांच्यावर झालेल्या कारवाईनंतर स्पष्ट झाले आहे. पक्षाच्या दहा खासदारांपैकी एक खासदार म्हणून यापुढे चड्ढा यांना राज्यसभेत बसावे लागणार आहे.

चड्ढा यांच्यावर कारवाई होण्यामागे पक्षांतर्गत नाराजी हेच प्रमुख कारण आहे. दिल्ली सरकारचे मद्य धोरण व मद्य घोटाळा यामुळे अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजय सिंह आदी नेत्यांना जेलमध्ये जावे लागले. त्यांची व 'आप'ची चार वर्षे मोठी बदनामी झाली. पक्षाला दिल्लीतील सत्ता गमवावी लागली. या सर्वांची निर्दोष मुक्तता झाल्यावर पक्षाने मोठा जल्लोष केला; पण राघव चड्ढा यांनी साधी प्रतिक्रिया दिली नाही किंवा आनंदोत्सवात सहभागी झाले नाहीत. स्वाती मलिवाल या पक्षावर आरोपांच्या फैरी झाडत असतानाही चड्ढा हे नामानिराळे राहिले होते. पक्षाच्या अजेंड्यापेक्षा चड्ढा हे वैयक्तिक पीआर (जनसंपर्क) आणि ब्रॉडकास्टिंगवर जास्त लक्ष देतात व स्वत:च्या प्रसिद्धीत अधिक मग्न असतात.

आपल्यावरील आरोप चुकीचे असल्याचे चड्ढा सांगत आहेत. ते म्हणतात, मी संसदेत गोंधळ घालण्यासाठी, आरडाओरड करण्यासाठी, शिवीगाळ करण्यासाठी वा माईक तोडण्यासाठी आलेलो नाही. मी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी खासदार झालो आहे. आयकरापासून ते जीएसटीपर्यंत, पंजाबच्या पाण्यापासून ते दिल्लीतील प्रदूषित हवेपर्यंत मी प्रश्न मांडले आहेत. सरकारी शाळांच्या दुरावस्थेपासून ते रेल्वेतील प्रवाशांच्या समस्यांना वाचा फोडली आहे. संसदेतील माझ्या कामाचे मूल्यमापन करावे, माझ्या संसदीय कामामुळे पक्षाचे कोणते नुकसान झाले आहे? राधव चड्ढा यांनी थेट पक्ष नेतृत्वालाच आव्हान दिल्यानंतर माजी मुख्यमंत्री आतिशी मार्लेना, राष्ट्रीय प्रवक्ते अनुराग ढांडा, माजी मंत्री सौरभ भारद्वाज, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान यांनी चड्ढांवर प्रश्नांचा भडिमार केला.

केजरीवाल यांना पुन्हा अटक झाल्यावर आपच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीत निषेध केला, तेव्हा पोलिसांना लाठीमार केला; पण त्यावेळी चड्ढा डोळ्याचे ऑपरेशन करायचे म्हणून लंडनला निघून गेले होते. संसदेत ते सरकारला किंवा पंतप्रधानांना थेट प्रश्न विचारत नाहीत. राष्ट्रीय मुद्द्यांऐवजी ते सामोसे किती महाग आहेत, असे प्रश्न उपस्थित करतात. तृणमूल काँग्रेसने निवडणूक आयोगावर दिलेल्या अविश्वास ठरावावर त्यांनी स्वाक्षरीच केली नाही, संसदेत विरोधी पक्ष सभात्याग करतात, तेव्हा ते सभागृहात बसून राहतात, ते पंजाबमधून राज्यसभेवर निवडून गेले आहेत; पण पंजाबचा ग्रामीण विकासाचा साडेआठ हजार पाचशे कोटींचा निधी केंद्राने रोखला तेव्हा त्यांनी सरकारला जाब विचारला नाही. जीएसटीमुळे पंजाबचे ६० हजार कोटींचे नुकसान झाले, त्याविषयी संसदेत ब्र काढला नाही. पंजाबमधे पूर आला तेव्हाही ते दिसले नाहीत. अतिशी म्हणतात, चड्ढा संसदेत पंतप्रधान व भाजपाला घाबरतात. त्यांना प्रश्नच विचारत नाहीत. केजरीवाल यांना अटक झाली तेव्हा ते लंडनला पळून गेले.

राघव चड्ढा हे चार्टर्ड अकौन्टंट आहेत. लंडन स्कूल ऑफ इकॉनमिक्समधे त्यांचे उच्च शिक्षण झाले आहे. २०११-१२ मध्ये अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात ते सामील झाले होते. २०१५ मधे दिल्लीत आपचे सरकार असताना त्यांनी अर्थमंत्र्यांचे सल्लागार म्हणून काम केले. २०२० मध्ये दिल्लीतून ते आमदार झाले. २०२२ मध्ये पंजाब विधानसभा निवडणुकीत ते सहप्रभारी होते. राघव चड्ढा हे २०२२ मध्ये पंजाबमधून राज्यसभेवर आले. त्यांच्या खासदारकीची मुदत २०२८ पर्यंत आहे. अभिनेत्री परिणिती चोपडा या त्यांच्या पत्नी आहेत. चड्ढा यांनी 'धुरंधर' चित्रपटातील 'घायल हूं, इसलिए घातक हूँ' असा इशारा आम आदमी पक्षाला दिला आहे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

# आखाती देशांची समस्या!



आखातातील बहारीन, सौदी अरेबिया,युएई (युनायटेड अरब एमिरेट्स ) कतार आणि कुवैत या देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर इराणने ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने हल्ले केल्यानंतर या देशांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.या देशांच्या संरक्षणाची हमी अमेरिकेने घेतल्यानंतरही इराणकडून होणारे हल्ले त्यांना सहन करावे लागले आहेत, त्यामुळे हे देश संत्रस्त झाले असून,आपल्या सुरक्षिततेसाठी त्यांनी अमेरिकेशिवाय आणखी काही सुरक्षा भागिदार शोधण्यास सुरुवात केली आहे.अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणबरोबर छेडलेल्या युद्धामुळे आखाती देशांची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे.या देशांत अमेरिकेचे लष्करी तळ असल्याने इराणकडून त्यांना असणारा धोका कायम रहाणार आहे.या लष्करी तळांना इराणकडून सतत टार्गेट केले गेले. अमेरिका आणि इस्त्रायल यांच्याकडून इराणवर केल्या गेलेल्या हल्ल्यांचा बदला म्हणून, इराणकडून या देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले केले गेले.

थोडक्यात अमेरिकेचे लष्करी तळ हे या देशांसाठी डोकेदुखी होऊन बसेल आहेत.महत्वाची गोष्ट अशी आहे की,होर्मुझची सामुद्रधुनी इराणने बंद केल्यामुळे या देशांचे सर्वात मोठे नुकसान होत आहे.कारण या देशांचा व्यापार, प्रामुख्याने या सामुद्रधुनीमार्गे होतो.इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविराम झाल्यानंतर इराणने एक गोष्ट स्पष्ट केली होती,ती म्हणजे होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील त्याचा ताबा (नियंत्रण) कायम राहील.होर्मुझच्या सामुद्रधुनी वरील नियंत्रणामुळे अमेरिकेला वेठीस धरणे,इराणला शक्य होणार आहे.इराण बरोबर भविष्यात कसे संबंध असावेत,याबाबत,आखाती देशांमध्ये एकमत दिसून आलेले नाही.युनायटेड अरब एमिरेट्स आणि बहारीन यांनी या बाबतीत कडक भूमिका घेतली आहे.मात्र आखातातील इतर देशांनी इराण बरोबर शांतता राखण्याची भूमिका घेतली आहे.इराणला असा संशय आहे की,युद्धविरामाची घोषणा होण्याअगोदर काही तास,इराणमधील लावान आयलंड येथील ऑईल रिफायनरीवर जो हल्ला झाला होता,त्याच्या पाठीमागे युएईचा हात असावा.त्यानंतर लगेचच इराणने त्याचा बदला घेतला.आखाती देशांतील एखाद्या देशाकडून इराणवर झालेला तो एकमेव हल्ला असावा.दरम्यान सौदी अरेबिया आणि इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी एकमेकांशी संपर्क साधून मिडल इस्ट मधील तणाव कमी कसा करता येईल याबाबत चर्चा केली.

तुर्कस्तान आणि पाकिस्तान या देशांकडे मोठे लष्करी सामर्थ्य आहे.या देशांबरोबर आखाती देशांनी संरक्षण विषयक भागिदारी करावी असे आखाती देशांतील तज्ञांचे मत आहे.त्यामुळे संरक्षणासाठी एकट्या अमेरिकेवर त्यांना अवलंबून रहावे लागणार नाही.त्या दृष्टीने त्यांच्या हालचाली सुरु असल्याचे बोलले जात आहे.काही महिन्यांपूर्वी पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात संरक्षणविषयक करार झाला होता.त्यानुसार या दोन्ही देशांपैकी कुणाही एकावर तिसऱ्या देशाने हल्ला केल्यास त्यांनी एकमेकांच्या मदतीला धावून जायचे,असे करारात नमूद करण्यात आले होते.युएईने भारताबरोबर डिफेन्स पार्टनरशीप जाहीर केली आहे.अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू असताना, सौदी अरेबिया, युएई आणि कतार यांनी घाईघाईने युक्रेनबरोबर डिफेन्स ?ग्रिमेंट साईन केली होती.या करारानुसार इराणकडून होणाऱ्या ड्रोन हल्ल्यांचा प्रतिकार युक्रेनकडून केला जाणार होता.

मार्च २०२६ मध्ये सौदी अरेबिया, तुर्कस्तान, इजिप्त आणि पाकिस्तान यांची युती झाली होती.मात्र या देशांमधील अंतर्गत मतभेदांमुळे ती फलद्रूप होऊ शकली नाही.तुर्कस्तान आणि पाकिस्तान यांची सीमा इराणला लागून असल्याने, त्यांना इराण बरोबर संघर्ष नको होता.युएईला इस्त्रायल बरोबर संबंध ठेवण्यात कोणतीही अडचण नव्हती.इराण-अमेरिका युद्धात सर्वात जास्त नुकसान युएईचे झाले.इराणने ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने सर्वात जास्त हल्ले (आखाती देशांचा विचार करता) युएईवर केले.युएई हा (आखाती देशांतील) इराणचा सर्वात मोठा शत्रू राहिला आहे.आखातातील देशांना इराण विरुद्धचा धोका कमी करायचा असेल तर त्यांनी मिसाईल्स आणि ड्रोन्सच्या हल्ल्यांपासून संरक्षण करणाऱ्या यंत्रणेत जास्त गुंतवणूक करायला हवी.अमेरिके बरोबर आखातातील देशांची संरक्षण विषयक भागिदारी असली तरी ती फारशी भरवशाची नसल्याचे, अमेरिका -इराण युध्दात सिद्ध झाले आहे,तसेच आखाती देशांचे संरक्षण करण्यासाठी, अमेरिकेकडून जे प्रचंड शुल्क आकारले जाते ते फारच खर्चिक आहे,आणि इतका मोठा खर्च करूनही इराणकडून असणारा धोका कायमच रहाणार आहे.अमेरिकेचे आखातातील लष्करी तळ, तेथे रहाणारच आहेत.मात्र त्यांचा आखातातील देशांना फायदा कमी आणि नुकसान जास्त अशी परिस्थिती, अमेरिका - इराण युद्धात पहायला मिळाल्याने हे देश त्यांच्या संरक्षणासाठी आणखी भागिदार शोधत आहेत.

**अभय गोखले**

## टीकाकारांची अवस्था

देशातील विरोधी पक्ष आणि प्रामुख्याने डाव्या विचारसरणीचे विचारवंत सध्याच्या आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे अत्यंत पूर्वग्रहदूषित नजरेतून पाहत असल्याचे दिसून येत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षात पाकिस्तानने 'युद्धविरामासाठी' प्रयत्न केले आणि त्यांच्या या प्रस्तावाला दोन्ही पक्षांनी होकार दिला, अशा बातम्या आल्यापासून या मंडळींना जणू रान मोकळे झाले होते. भारत सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि भारताच्या परराष्ट्र धोरणावर टीका करण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. 'भारताने मध्यस्थीची मोठी संधी गमावली' आणि 'पंतप्रधान कसे चुकले' इथपर्यंत त्यांच्या टीकेची पातळी पोहोचली होती.परंतू टीका करणाऱ्या या सर्वांनी हे समजून घ्यायला हवे होते की,मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानची जागतिक विश्वासार्हता नेमकी किती आहे? सद्यस्थिती मात्र या टीकाकारांच्या कल्पनेपेक्षा पूर्णपणे वेगळी आणि त्यांच्यासाठी एक मोठी चपराक ठरणारी आहे. ताज्या घडामोडींनुसार, पाकिस्तानने मध्यस्थीचा कितीही डांगोरा पिटला असला तरी जमिनीवरील परिस्थिती काही वेगळीच सांगते. इस्त्रायलने कोणत्याही तथाकथित युद्धबंदीला जुमानले नाही. उलट, त्यांनी लेबनॉनवर भीषण हल्ले चढवून आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. एकाच दिवशी शेकडो लोकांचा मृत्यू आणि पायाभूत सुविधांचे झालेले नुकसान यावरून हे स्पष्ट होते की, कागदी प्रस्तावांना प्रत्यक्षात काहीही किंमत नाही.

आंतरराष्ट्रीय राजकारण हे केवळ 'इव्हेंट' किंवा प्रसिद्धीसाठी केलेल्या मध्यस्थीवर चालत नाही, तर ते संबंधित राष्ट्राच्या लष्करी, आर्थिक आणि नैतिक ताकदीवर अवलंबून असते. भारताचे परराष्ट्र धोरण हे उथळ प्रसिद्धीवर नव्हे, तर 'राष्ट्रीय हित' या केंद्रबिंदूवर आधारित आहे. केवळ राजकीय द्वेषापोटी भारताच्या धोरणावर चिखलफेक करणाऱ्या आणि पाकिस्तानच्या तथाकथित यशाचे गोडवे गाणाऱ्या भारतीय माध्यमांची आणि काही विशिष्ट विचारवंतांची परिस्थिती आज अत्यंत हास्यास्पद ठरली आहे, हे मात्र निश्चित.

**अविनाश देशपांडे**

# संवाद

## 'एक घर एक भांडे'

निसर्गाने प्रत्येक सजीवाला एक भूमिका दिली आहे. या अन्नसाखळीत चिमणीसारख्या पक्ष्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. जर चिमणी नाहीशी झाली, तर कीटकांची संख्या प्रचंड वाढू शकते, शेतीचे नुकसान होऊ शकते आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडू शकते.याचे ज्वलंत उदाहरण इतिहासात दिसून येतं. चीनमध्ये एक काळ असा आला की,चिमण्या अन्नधान्य खातात म्हणून त्यांना शत्रू मानून त्यांचा नायनाट करण्यात आला. पण त्यानंतर कीटकांची संख्या प्रचंड वाढली आणि शेतीचे नुकसान झाले. त्यामुळे शेवटी निसर्गचक्राचा समतोल बिघडल्याचे स्पष्ट झाले.आज शहरीकरण, प्रदूषण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे.आता उन्हाळ्याच्या दिवसांत या छोट्याशा जीवासाठी आपण थोडी काळजी घेऊया.घराच्या खिडकीत, माडीवर किंवा अंगणात पाण्याचे छोटे भांडे ठेवूया, थोडे धान्य टाकूया. आपल्या या छोट्याशा प्रयत्नामुळे अनेक चिमणीचे प्राण वाचवुया.

**रमा देशमुख**

# यवतमाळात प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांवर धाड

## २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ : जिल्ह्यात अवैध बियाणे विक्री व वाहतुकीविरोधात कृषी विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत मोठा पर्दाफाश केला आहे. भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या एचटीबीटी (प्लॅटिनम 5G) कापूस बियाण्यांची चोरटी वाहतूक करणाऱ्या टोळीचा भांडाफोड करून सुमारे २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १२ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ शहरात दोन चारचाकी वाहनांतून प्रतिबंधित बियाण्यांची तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार कृषी विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्त सापळा रचून 'किया सोनेट' (GJ-09-5486)सह दोन वाहने अडवून झडती घेतली. या कारवाईदरम्यान 'प्लॅटिनम 5G' नावाच्या प्रतिबंधित कापूस बियाण्यांची तब्बल ४०० पाकिटे (८ पोते) जप्त करण्यात आली. जप्त बियाण्यांची बाजारभावानुसार किंमत सुमारे ३.६० लाख रुपये आहे. याशिवाय दोन चारचाकी वाहने व तीन मोबाईल फोन असा एकूण १६.४० लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. एकूण मुद्देमालाची किंमत २० लाख ४०० रुपये इतकी आहे.या प्रकरणी कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) प्रेमनाथ आडे यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेत असलेल्या आरोपींमध्ये संतोष ठाकरे (रा. चांदूर रेल्वे, जि. अमरावती), निखिल लंगडे (रा. आर्वी, जि. वर्धा) आणि सतीश ठाकरे (रा. अमरावती) यांचा समावेश आहे. आरोपींविरुद्ध बियाणे कायदा १९६६, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. दरम्यान, शेतकऱ्यांनी अनधिकृत व प्रतिबंधित बियाण्यांची खरेदी टाळावी, अन्यथा जमिनीची सुपीकता व पर्यावरणाला धोका निर्माण होऊ शकतो, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# उपवर्गीकरणातून मागासवर्गीय समाजात फूट पाडण्याचा सरकारचा डाव : ज. वी. पवार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : अनुसूचित जातीतील आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या हालचालीमागे सरकारचा उद्देश मागासवर्गीय समाजात अंतर्गत फूट पाडण्याचा असल्याचा गंभीर आरोप ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत ज. वी. पवार यांनी केला. समता पर्वानिमित्त यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पवार यांनी सांगितले की, शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी स्थापन केलेली एकल सदस्यीय अनंत बदर समिती ही मुळातच असंवैधानिक असून तिची रचना कायदेशीर निकषांनुसार करण्यात आलेली नाही. समितीत अनुसूचित जातीतील ५९ पैकी कोणत्याही जातीचे प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. तसेच १ एप्रिल २०२६ रोजी सादर करण्यात आलेला समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसल्याने त्यावर आक्षेप कसे नोंदवायचे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शासनाने १५ एप्रिल २०२६ पर्यंत सूचना व आक्षेप मागवून १७ व १८ एप्रिल रोजी सुनावणी निश्चित केली आहे. मात्र सुनावणीची वेळ व ठिकाण जाहीर न करता अत्यल्प कालावधीत प्रक्रिया राबविणे ही बेजबाबदार पद्धत असल्याची टीका त्यांनी केली. अनुसूचित जाती हा संविधानाच्या अनुच्छेद ३४१ नुसार एकजिनसी वर्ग असून उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षण कमी करण्याचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी केला. सदर अहवालात कोणते निकष, सांख्यिकीय माहिती किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेतला आहे, याबाबत पारदर्शकता नसल्याने संपूर्ण प्रक्रिया संशयास्पद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अनंत बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करावा किंवा तो सार्वजनिक करून किमान एक महिन्याची मुदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास मागासवर्गीय समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशाराही पवार यांनी दिला. यावेळी विविध सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# पोफाळी येथे कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा व शेतकरी मेळावा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - स्व. माणिकराव नानाजी शिरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पोफाळी येथे विज्ञान संत श्री. अंकुश पाटील कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा व अनुभव कथन शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आधुनिक शेतीत उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि गुणवत्तापूर्ण पीक व्यवस्थापन यासाठी ही कार्यशाळा शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

ही कार्यशाळा शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संत श्री गजानन महाराज मंदिर, पोफाळी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन विज्ञानसंत मा. श्री. अंकुश पाटील (सांगली) करणार असून, शेतीतील नव्या प्रयोगांची प्रत्यक्ष माहिती आणि अनुभवकथन यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. कार्यशाळेत घरच्या घरी वॉटर सोल्युबल खते तयार करण्याचे प्रशिक्षण, विविध वेळापत्रकानुसार त्यांचा वापर, तसेच कृषी संजीवके, कीटकनाशके आणि बुरशीनाशके तयार करण्याच्या पद्धतींवर सविस्तर मार्गदर्शन दिले जाणार आहे. यामध्ये ह्युमिक ॲसिड, फुल्विक ॲसिड, अमिनो ॲसिड, ऑर्थोसिलिक ॲसिड, लाईम सल्फर, सिलिकॉन स्टिकर, बायोझाईड, ऑर्गेनिक कार्बन, मिलीबग नियंत्रणासाठी औषधे तसेच सर्व मायक्रो न्यूट्रिएंट्स याबाबत उपयुक्त माहिती दिली जाणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. अभय कुमार वडकुते (तालुका कृषी अधिकारी, उमरखेड) यांच्या हस्ते होणार आहे. या उपक्रमाचे आयोजन राजेंद्र शिरसागर, सेवा निवृत्त उपविभागीय अभियंता यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी वह्या व पेन सोबत आणून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, दारव्हा जि. यवतमाळ**
**विभाग प्रस्तुतकार - २**
E-mail : tahsildar.darwha@gmail.com Phone No. 07238 254152
क्रमांक/म.स/प्रस्तु-२/कावि/६४/२०२६ दिनांक ०२.०३.२०२६

## जाहीर प्रगटन

सर्वत्र जनतेस सुचित करण्यात येते की, प्रकरणात जन्म/मृत्यु नोंदणी निबंधक मौजा बोरी खु. यांनी पुरुषोत्तम पुजाराम मेश्राम यांचे जन्माची नोंद ग्राम पंचायत/नगर परीषद बोरी खु. ता. दारव्हा जि. यवतमाळ येथील जन्म/मृत्यु नोंदणी रजीस्टरला नसल्यामुळे अर्जदार पुरुषोत्तम पुजाराम मेश्राम यांनी स्वताच्या जन्माची नेंद ग्रा.प./नं.प. बोरी खु. येथे करण्याकरीता जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम, २०२३ शासन निर्णय क्रमांक २५२५/(ई.आ.९९११८१/प्र.क्र.२२ कु.कु दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये विलंबाने करावयाच्या नोंदीबाबत आदेश मिळण्याकरीता प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावात अर्जदार यांची जन्माची दिनांक ०१.०४.१९७७ ही असल्याचे नमुद केले आहे.

तेव्हा याबाबत सदरहू प्रकरणात हितसंबंध असणार अथवा इतर कुणाचे काही हरकत/आक्षेप असल्यास त्या बाबतच्या हरकती/आक्षेप या कार्यालयास दिनांक २९.०४.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रत्येक्ष हजर राहुन सादर कराव्यात ऊशीरा येणारे आक्षेप/हरकत्ती स्वीकारण्यात येणार नाही किंवा त्यांचा कोणताही विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा**

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, दारव्हा जि. यवतमाळ**
**विभाग प्रस्तुतकार - २**
E-mail : tahsildar.darwha@gmail.com Phone No. 07238 254152
क्रमांक/म.स/प्रस्तु-२/कावि/६३/२०२६ दिनांक ०२.०३.२०२६

## जाहीर प्रगटन

सर्वत्र जनतेस सुचित करण्यात येते की, प्रकरणात जन्म/मृत्यु नोंदणी निबंधक मौजा बोरी खु. यांनी संजय पुजाराम मेश्राम यांचे जन्माची नोंद ग्राम पंचायत/नगर परीषद बोरी खु. ता. दारव्हा जि. यवतमाळ येथील जन्म/मृत्यु नोंदणी रजीस्टरला नसल्यामुळे अर्जदार संजय पुजाराम मेश्राम यांनी स्वताच्या जन्माची नेंद ग्रा.प./नं.प. बोरी खु. येथे करण्याकरीता जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम, २०२३ शासन निर्णय क्रमांक २५२५/(ई.आ.९९११८१/प्र.क्र.२२ कु.कु दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये विलंबाने करावयाच्या नोंदीबाबत आदेश मिळण्याकरीता प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावात अर्जदार यांची जन्माची दिनांक ०३.१२.१९७९ ही असल्याचे नमुद केले आहे.

तेव्हा याबाबत सदरहू प्रकरणात हितसंबंध असणार अथवा इतर कुणाचे काही हरकत/आक्षेप असल्यास त्या बाबतच्या हरकती/आक्षेप या कार्यालयास दिनांक २९.०४.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रत्येक्ष हजर राहुन सादर कराव्यात ऊशीरा येणारे आक्षेप/हरकत्ती स्वीकारण्यात येणार नाही किंवा त्यांचा कोणताही विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी दारव्हा**

# पिंपळखुटी ते यवतमाळ १०० किमी पायी लाँग मार्च! शेतकरी-कामगारांचा संताप उफाळला

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - देशातील सर्वाधिक आत्महत्याग्रस्त जिल्हा अशी ओळख पुसट होत नसताना प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात शेतकरी, कामगार व भूमिहीन कष्टकऱ्यांचा संताप आता रस्त्यावर उतरला आहे. अखिल भारतीय किसान सभा, सिटू आशा कर्मचारी युनियन, स्त्री परिचर संघटना (CITU) व आदिवासी अधिकार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान पिंपळखुटी (तेलंगणा सीमेवरून) ते यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय असा सुमारे १०० किमीचा पायी लाँग मार्च काढण्यात येणार आहे.

वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर, योजना कर्मचारी हालअपेष्टांना तोंड देत आहेत, तर भूमिहीन आदिवासी जमीनहक्कापासून वंचित राहत असल्याचा आरोप आयोजकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर तीव्र उन्हात काढला जाणारा हा लाँग मार्च म्हणजे प्रशासनाला दिलेला इशाराच मानला जात आहे.या मोर्चात कर्जमाफीचा मुद्दा आघाडीवर असून, कोणत्याही अटींशिवाय सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याची मागणी आहे.

यासोबतच पीकदर दुप्पट करणे, अतिवृष्टीग्रस्तांना तातडीची मदत व धान्य, वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी जंगलाला कुंपण, सर्व शेतकऱ्यांना सौरऊर्जा योजना, वनजमिनीचे पट्टे देणे अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. आशा कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन, सर्वेक्षणाचा मोबदला, कोरोनाकाळातील प्रोत्साहन निधी, ग्रॅज्युएटी अंमलबजावणी आणि स्त्री परिचरांचे थकित वेतनही या आंदोलनाचा केंद्रबिंदू आहे. किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली हा लाँग मार्च पार पडणार असून, हजारोंच्या संख्येने शेतकरी, कामगार व कर्मचारी सहभागी होणार आहेत. "हक्कांसाठीचा हा लढा निर्णायक ठरेल," असा इशारा देत आयोजकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# नागरिकांनो, उत्सव साजरा करा पण कायद्याचे भान ठेवा!

## पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांचे आवाहन; सुरक्षेसाठी यवतमाळ शहर पोलीस सज्ज

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने यवतमाळ शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. "नागरिकांनी कोणत्याही चिंतेशिवाय उत्सव साजरा करावा, मात्र कायद्याचे भान राखावे," असे आवाहन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी केले आहे..

जयंती उत्सवासाठी पोलिसांनी जय्यत तयारी केली असून, सध्या शहरात १२ अधिकारी आणि १०४ पोलीस अंमलदारांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून आणि जिल्ह्याबाहेरून अतिरिक्त कुमक मागवण्यात आली असून, ती देखील ठिकठिकाणी तैनात केली जाणार आहे. शहरातील प्रत्येक मिरवणूक मार्ग, महापुरुषांचे पुतळे आणि बुद्धविहार परिसरात चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईवर भर दिला आहे. यवतमाळ शहर हद्दीतील एकूण ३६ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना उद्यासाठी शहरातून बाहेर घालवून लावण्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडून (SDO) प्राप्त झाले आहेत. यामुळे हुल्लडबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### हायटेक यंत्रणा सज्ज

केवळ मनुष्यबळच नव्हे, तर तांत्रिक मदतीनेही पोलीस लक्ष ठेवणार आहेत. यासाठी अग्निशमन दल, रुग्णवाहिका, दंडाधिकारी यांच्यासह झूमर व्हॅन (लाईट व्हॅन) आणि सर्व्हिलन्स व्हॅन (देखरेख गाडी) तैनात करण्यात आली आहे. मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही आणि ड्रोनच्या माध्यमातूनही देखरेख केली जाणार आहे.

"प्रशासनाने जयंती उत्सवाची पूर्ण तयारी केली आहे. नागरिकांनी उत्साहात आणि शांततेत जयंती साजरी करावी. काहीही अडचण किंवा संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. आम्ही तुमच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर आहोत." - रामकृष्ण जाधव, पोलीस निरीक्षक, यवतमाळ शहर

# समता, कायक-दासोहातूनच समाजपरिवर्तन शक्य - डॉ. राजशेखर सोलापूरे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - येथील महात्मा बसवेश्वर सांस्कृतिक भवनात वीरशैव हितसंवर्धक मंडळाच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ख्यातनाम अभ्यासक डॉ. राजशेखर सोलापूरे यांनी महात्मा बसवण्णांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित करत समाजपरिवर्तनासाठी समता, कायक-दासोह आणि नैतिकता या मूल्यांचा स्वीकार आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी डॉ. अशोक मेनकुदळे, डॉ. जयेश हातगांवकर, गिरीष गाढवे, डॉ. किशोर मांडगावकर, बाळासाहेब दिवे, प्रांजली कोचे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात सचिव निलेश शेटे यांनी मंडळाच्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. सोलापूरे यांनी आपल्या व्याख्यानात समाजातील वाढती आर्थिक विषमता व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या अधोरेखित केल्या.

"अतिरिक्त साठवणूक टाळून दासोहाच्या भावनेने संपत्तीचे वाटप झाले पाहिजे," असे सांगत त्यांनी सामाजिक न्यायाची गरज व्यक्त केली. कायक तत्त्वज्ञान स्पष्ट करताना त्यांनी प्रामाणिक श्रम व स्वावलंबन हाच खरा धर्म असल्याचे नमूद केले. यावेळी त्यांनी राजकीय व सामाजिक नैतिकतेवर भाष्य करत सत्ता व संपत्तीचा उपयोग लोककल्याणासाठीच झाला पाहिजे, असे सांगितले. जात-पात व भेदभावाला विरोध करत समतावादी समाज उभारण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सीमा शेटे-नवलाखे यांनी केले, तर आभार गिरीष गाढवे यांनी मानले. उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत बसवण्णांचे विचार आचरणात आणण्याचा संकल्प व्यक्त केला.

# वर्ण व्यवस्थेतील जातीय विषमता लोकशाहीतही सक्रिय : डॉ. कोमल

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारलेली लोकशाही असली तरी वर्णव्यवस्थेतील जातीय विषमता आजही समाजात सक्रिय असल्याचे प्रतिपादन जे.एन.यू.च्या स्कॉलर डॉ. कोमल यांनी केले. त्या समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

डॉ. कोमल म्हणाल्या की, आधुनिक शैक्षणिक प्रवाहातही जात विचारण्याची प्रवृत्ती वाढत असून बोलण्यातून, राहणीमानातून किंवा आडनावावरून जात जाणून घेण्याचा नवा प्रघात रूढ होत आहे, ही चिंताजनक बाब आहे. हरियाणातील वाल्मिकी समाजातून जे.एन.यू.पर्यंतचा आपला प्रवास अत्यंत विदारक अनुभवांनी भरलेला असल्याचे त्यांनी सांगितले. "रामायण लिहिणाऱ्या वाल्मिकी समाजातील लोक आजही साफसफाईची कामे करतात आणि लोकशाहीतही त्यांना सन्मानजनक स्थान मिळत नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही," असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात आंबेडकरी लेखिका डॉ. प्रतिभा अहिरे यांनीही मनोगत व्यक्त करत, अशा कार्यक्रमांतून चळवळीचे सिंहावलोकन होऊन पुढील लढ्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. यावेळी आंबेडकरी विचारवंत डॉ. लीला ताई भेले यांचा अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करून जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमास जोहरा कांबळे, नीता होले, नरेंद्र फुलझेले, प्रज्ञा फुलझेले, नारायण थूल, डॉ. सुमेध देवतळे, उमेश मेश्राम, राजू चांदेकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन डॉ. चंद्रकांत सरदार व सहकाऱ्यांनी केले, तर आभार स्नेहा डोंगरे यांनी मानले.

वाघापूर येथील महिलांनी लेझीमच्या तालावर पाहुण्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. सुमारे २०० भगिनींनी पुष्पगुच्छ देत डॉ. लीला ताई भेले यांना मानवंदना दिली, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

# महात्मा ज्योतीबा फुले द्विशताब्दी जयंती उत्सव उत्साहात साजरा

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले यांचा द्विशताब्दी जयंती उत्सव मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल जाधव, तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त प्राजक्ता इंगळे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मंगला मून उपस्थित होत्या.

पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या नावाने सुरु असलेल्या राज्य शासनाच्या उपक्रम व विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. विशेषतः महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेत सुधारणा करून २३९९ आजारांवर उपचाराचा लाभ देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल जाधव यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा उपस्थितांकडून करून घेतली. कार्यक्रमात प्रा. प्रवीण देशमुख व अडसूळ यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना व पालकांना महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मंगला मून यांनी केले. त्यांनी समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देत महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांच्या आधारे योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच परराज्य शिष्यवृत्ती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना आदींचे लाभ वितरित करण्यात आले. यासोबतच, समाजभूषण व्यक्तींचा सन्मान संविधानाची उद्देशिका देऊन करण्यात आला. अनुसूचित जातीतील बचत गटांना मिनी ट्रॅक्टर योजनेअंतर्गत साधनांचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्योत्स्ना तिजारे यांनी केले, तर सूत्रसंचालन रुपेश वानखेडे यांनी केले. शेवटी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी राऊत व त्यांचा चमू तसेच प्रकल्प अधिकारी राहुल कराळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय आदिवासी स्वायत्त परिषद भारत जिल्हा व तालुका कार्यकारणी गठीत



**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव : राष्ट्रीय आदिवासी स्वायत्त परिषद भारत जिल्हा व तालुका कार्यकारणी 9 एप्रिल 2026 रोज गुरुवारला रामचंद्र मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली असून जिल्हाध्यक्षपदी रजनीकांत परचाके, तर उपाजिल्हा ध्यक्षपदी मनोज पेंदोर, तर सचिव पदी मनोहर कुडमते, यांची निवड करण्यात आली तसेच तालुकाध्यक्षपदी दिलीप किन्नाके, यांची एकमताने निवड करण्यात आली. ही निवड प्रक्रिया अरविंद केराम यांच्या कार्यालयात पार पडली असून या निवड प्रक्रियेत सहध्यक्ष रमेश पेंदाम, कोषाध्यक्ष मधुकर पावले, संघटक रामचंद्र मेश्राम, संपर्क प्रमुख संतोष गेडाम, प्रमुख सल्लागार अंकुश कुमरे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या वेळी शंकर तोडासे, यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

उपस्थित सदस्य बबन चिडाम, नितेश मडावी, गजानन तुमराम, मारोती उईके, विशाल आत्राम हे होते.

# पळसखेड शिवारात बिबट्याचा धुमाकूळ

## सततच्या हल्ल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे सावट

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मौजा पळसखेड येथे बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिक आणि शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. १२ एप्रिलच्या रात्रीच्या सुमारास घडलेल्या घटनेत बिबट्याने शेतात घुसून एका वासरावर हल्ला करत त्याला ठार केले. ही बाब आज दि. १३ एप्रिल रोजी सकाळी शेतकरी बाबराव पवार यांच्या निदर्शनास आली.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबराव पवार यांचे शेत गावाच्या हद्दीत असून रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत बिबट्याने गोठ्याजवळ प्रवेश केला. त्यानंतर त्याने वासरावर हल्ला करत त्याचा जीव घेतला. सकाळी शेतात गेल्यावर वासराचा मृतदेह आढळून आला, तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, याच परिसरात मागील महिन्यातही अशाच प्रकारची घटना घडली होती. डॉ. ईश्वरकर यांच्या शेतातील वासरूही बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाले होते. त्यामुळे बिबट्याचा वावर सातत्याने वाढत असल्याचे स्पष्ट होत असून ग्रामस्थांमध्ये तीव्र चिंता व्यक्त



केली जात आहे.

सततच्या हल्ल्यांमुळे शेतकरी संतप्त झाले असून त्यांनी वनविभागाकडे तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बिबट्याला पकडण्यासाठी त्वरित पिंजरा लावावा, गस्त वाढवावी आणि गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, ज्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे त्यांना तातडीने भरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, गावातील नागरिकांनीही रात्रीच्या वेळी बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, लहान मुलांना आणि जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. बिबट्याच्या वाढत्या हालचालींमुळे पळसखेड परिसरात दहशतीचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करणे अत्यावश्यक बनले आहे.



# पाण्याचे स्त्रोत आटले : कृत्रिम पाणवठे तयार करा

## वन्यप्राण्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

तापमान दिवसेंदिवस वाढत चालले आहे. छोटे मोठे पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. यासाठी वनविभागाकडून कृत्रिम पाणवठे बनवण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

आसेगावपूर्णासह परिसरातून वाहणारी जीवनवाहिनी पूर्णानदीसह लघु तलावही कोरडा पडला आहे. परिसरात प्राणी व पक्ष्यांना पाण्याची सुविधा नाही. सध्या पाण्याच्या शोधात भटकंती करताना वाहनांच्या धडकेने प्राणी दगावत आहे. परिसरात मोर, ससे, लांडगे, कोल्हे, माकडं, हरिण, रानडुकरांसह नीलगाय आदींची मोठी संख्या आहे. पाणीसाठे खोल गेल्याने या प्राण्यांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे.

■ आसेगाव परिसरात वन्यप्राण्यांची पाण्यासाठी होत असलेली भटकंती अत्यंत चिंताजनक आहे. पाण्याअभावी प्राण्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावर यावे लागत आहे, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. वनविभागाने तातडीने लक्ष देऊन जंगल परिसरात कृत्रिम पाणवठे उभारणे गरजेचे आहे. तसेच गावकऱ्यांनीही आपल्या स्तरावर पाण्याची छोटी-छोटी सोय केल्यास अनेक जीव वाचू शकतात.

**अनिकेत जावरकर,**
विरूळ पूर्णा पशुप्रेमी

■ आसेगाव परिसरातील वन्यजीवांच्या पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर झाला असून प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष देणे आवश्यक आहे. वनविभागाने नियोजनबद्ध पद्धतीने कृत्रिम पाणवठे तयार करून नियमित पाणीपुरवठा करावा. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नासाठी पुढाकार घेऊन शासनाकडे निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आमची मागणी आहे.

**आशिष मेहेत्रे,**
सामाजिक कार्यकर्ता आसेगाव पूर्णा

शिवाय जंगलात पाणी नसल्यामुळे माकडांच्या अनेक टोळ्यांनी गावांना लक्ष्य केले आहे. त्यामुळे गावातील नागरिकही माकडांच्या उपद्रवाला वैतागले आहेत. यासाठी वन्यजीवांची पाण्यासाठी होणारी ही परवड थांबावी म्हणून वनविभागाने ठिकठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करावे, अशी मागणी पशु प्रेमी कडून केली जात आहे.

### अचलपूर कृउबा समितीत

# सभापती ठाकरे यांच्या संकल्पनेतून ३ स्वच्छता गृहाची निर्मिती

**अचलपूर/वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षांपासून अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नव्हती, त्यामुळे शेतकऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. आणि महिलांची सुद्धा सर्वाधिक कुचंबणा होत होती. मात्र सभापती प्रतिभा ठाकरे यांनी पदाची सूत्र हाती घेतल्यानंतर अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात तीन ठिकाणी सुलभ शौचालये उभारली आहेत. यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोयही थांबली आहे.

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्य विक्रीसाठी जिल्ह्यातून नव्हे तर मध्य प्रदेशासह बाहेर गावाहून आलेले शेतकरी आणि कामगारांची स्वच्छतागृहा अभावी गैरसोय होत

शेतकऱ्यांसह महिलांची होणारी कुचंबना दूर करण्यासाठी सर्वप्रथम नवीन स्वच्छतागृह बांधण्याला प्राधान्य देत बाजार समितीच्या आवारात तीन स्वच्छतागृहे बांधण्यात आले आहेत. हे स्वच्छतागृह शेतकऱ्यांसाठी खुले करण्यात आले आहे .

**सभापती प्रतिभा ठाकरे,अचलपूर**



होती. यामध्ये महिलांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत होती.याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावरही होत असल्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे अचलपूर कृउबा समितीकडून शेतकऱ्यांसाठी उत्तम दर्जाचे स्वच्छतागृह उभारण्याची मागणी करण्यात येत होती. याची दखल घेत अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती ठाकरे यांनी सर्वप्रथम बाजार समितीच्या आवारात स्वच्छतागृह बांधण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयानुसार आज बाजार समितीच्या आवारात तीन ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेची सभा

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेची सर्वसाधारण सभा सोलापूर येथे यशस्वीरीत्या पार पडली.सभा सुरु करण्यापूर्वी दिवंगत लिपिक नेते विवेक लिंगराज यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सभेची कार्यवाही सुरु करण्यात आली.सभेला राज्याध्यक्ष सागर बाबर, राज्य कार्याध्यक्ष मा. श्री पंकजजी गुल्हाने, राज्य कोषाध्यक्ष उमाकांतजी सूर्यवंशी तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सभेमध्ये लिपिक संवर्गाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये लिपिकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करणे, पदोन्नतीच्या स्तरांमध्ये कपात करणे, स्पर्धा परीक्षेसाठी असलेली ७ वर्षांची अट शिथिल करून ती ३ वर्षे करण्याबाबत मागणी, दरवर्षी राज्य संमेलन आयोजित करणे, अपघात विम्याची मर्यादा १५ लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढविणे, तसेच लिपिक संवर्गातून वर्ग-२ पदासाठी पदोन्नतीचा कोटा १५ टक्क्यांवरून ४० टक्के करण्याबाबत चर्चा करण्यात आली.तसेच सांगली येथे होणाऱ्या राज्य अधिवेशनाच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली असून संघटना अधिक बळकट करण्यासाठी लढा निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

सभेदरम्यान विविध जिल्ह्यांतील लिपिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी राज्याध्यक्ष, कार्याध्यक्ष व कोषाध्यक्ष यांनी कर्मचाऱ्यांच्या शंकांचे समाधान करून त्यांचे प्रबोधन केले. सभेस अमरावती जिल्ह्यातून पंकज गुल्हाने (राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष),हेमंत कुमार यावले (राज्य प्रसिद्धी प्रमुख),संजय राठी (जिल्हा सचिव) तसेच विजय कोठाळे (जिल्हा सहसचिव) उपस्थित होते.

## संक्षिप्त

### हव्याप्र मंडळाला जिल्हाधिका-यांची सदिच्छा भेट



**अमरावती-**श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला जिल्हाधिकारी आशिषजी येरेकर यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी जिल्हाधिकारी यांचे स्वागत करीत मंडळाच्या क्रीडाविषयक वाटचाली बाबत माहिती दिली. प्रामुख्याने जिल्हाधिकारी भेटी दरम्यान सर्व प्रकारच्या खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विविध खेळांमधील लहान विद्यार्थ्यांनी सादर केलेले चित्तथरारक कवायती पाहून जिल्हाधिकारी येरेकर थक्क झालेत. सुरुवातीला मल्लखांब, कुस्ती, शूटिंग, जिम्नॅस्टिक, जलतरण, व्यायामशाळा, बॅटमिंटन सह सर्व विभागाला भेट देत तेथील क्रीडाविषयक माहिती घेतली. एकूणच मंडळाची क्रीडा, सामाजिक आणि शैक्षणिक माहिती घेता मंडळाच्या विकासासाठी प्रशासकीय स्तरावर आपले सहकार्य राहणार अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, डॉ. माधुरी चेंडके, प्रा. प्रणव चेंडके यांनी जिल्हाधिकारी आशिषजी येरेकर यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले. यावेळी डॉ. संजय तिरथकर, प्रा. आशिष हटेकर, डॉ. लालची शर्मा यांचेसह पदाधिकारी व क्रीडा प्रशिक्षक उपस्थित होते.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन



**अमरावती-**शिक्षणमहर्षी, विज्ञानवादी विचारवंत, स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादनानिमित्त डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत रुग्णालय परिसरातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अर्धाकृती पुतळयास पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाला वैद्यकीय अधिक्षक, विभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, नर्सिंग स्टाफ, व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

### शैक्षणिक साहित्य वाटप



**अमरावती-**क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत आहे.त्याचाच एक भाग म्हणून शहरातील सनलाइट इंग्लिश स्कूल व सनशाइन प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी पत्रकार कैलास इंगळे होते, तर सनलाइट इंग्लिश स्कूलमध्ये प्रभात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वि. दा. पवार यांनी अध्यक्षस्थान भूषविले. सावता परिषदेचे शहराध्यक्ष उमेश कांडलकर यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर, दर्यापूर तालुका अध्यक्ष विजयराव हरणे पाटील, सामाजिक कार्यकर्ते ज्योतिष मोहोड, मुख्याध्यापिका माधुरी नेरकर तसेच मुख्याध्यापक एल. के. पवार यांची उपस्थिती लाभली.प्रास्ताविकात वि.दा.पवार यांनी समता सप्ताहाचे महत्त्व अधोरेखित करताना शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक बदल घडविण्याची गरज व्यक्त केली.मुख्याध्यापिका माधुरी नेरकर यांनी संस्थेमार्फत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.संचालन वैशाली कांडलकर आभार सुवर्णा ढोले यांनी मानले. कार्यक्रमास वर्षा मावदे, हर्षा गायकवाड, पूजा गुल्हाने, अमृता जुनघरे, हर्षदा अनासाने, उषाताई जैन, हरीम अकदसं, कशिफया यसदफ, अलिना खानम आदींसह मोठ्या संख्येने मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.


# ब्रिटिशकालीन चिखलदऱ्याची प्रभावी आणि वेगवान डाक साखळी

**अमरावती/प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा परिसर ब्रिटिशांच्या दृष्टीने केवळ निसर्गरम्य नव्हता,तर अनेक कारणांनी त्यांना आकर्षित करणारा होता. येथील थंड व आल्हाददायक हवामान त्यांना इंग्लंडमधील बीन किंवा स्कॉटलंडची आठवण करून देत असल्याने या भागाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. मध्य हिंदुस्तानातील स्थान लक्षात घेता प्रशासन सुलभ होईल या विचारातून कधीकधी येथे प्रशासकीय केंद्र उभारण्याची कल्पनाही पुढे आली. त्यानुसार मनोरंजन स्थळे, खेळाची मैदाने विकसित करण्यात आली; वरच्या पठारावर कॉफी लागवडीचे प्रयोग झाले तसेच स्ट्रॉबेरी, पीच यांसारख्या फळझाडांची लागवड सुरू करण्यात आली.अमझरी परिसरात बागायती आणि फळबागांचे नियोजन करण्यात आले, तर गवळी समाजाला दुग्धव्यवसायासाठी प्रोत्साहन देत त्यांना चराईसाठी जमीन उपलब्ध करून देण्यात आली.

या सर्व विकासकामांबरोबरच, प्रभावी प्रशासनासाठी जलद आणि विश्वासार्ह संप्रेषण अत्यावश्यक असल्याची जाणीव ब्रिटिशांना होती.त्यामुळे त्यांनी संपूर्ण हिंदुस्तानात महत्त्वाच्या ठिकाणी डाक बंगल्यांचे जाळे उभारले.हे बंगलो केवळ विश्रांतीगृह नसून डाक वाहतुकीच्या साखळीतील महत्त्वाचे नियंत्रण केंद्र होते, जिथून मार्गावरील समन्वय, सुरक्षितता आणि सातत्य राखले जात असे. या व्यवस्थेमुळे प्रशासन कार्यक्षम राहून योग्य वेळी योग्य निर्णय घेणे शक्य होत असे.

तथापि,सातपुडा पर्वतराजीतील चिखलदरा हा डोंगराळ आणि दुर्गम प्रदेश असल्याने या भागाला देशातील प्रमुख केंद्रांशी आणि पुढे इंग्लंडपर्यंत जोडणे हे मोठे आव्हान होते. अशा परिस्थितीत, ब्रिटिशांनी अत्यंत नियोजनपूर्वक 'हरकारा' (Dak Runner) प्रणाली विकसित करून या अडचणींवर मात केली आणि दुर्गम भागालाही प्रभावी संप्रेषण जाळ्याशी जोडले.डोंगराळ आणि दाट जंगलाने व्यापलेल्या या भागात टप्प्याटप्प्याने कार्यरत असलेली एक सुसूत्र डाक साखळी अस्तित्वात होती, [illegible] भौगोलिक रचना आणि स्थानिक परंपरा सूचित करतात.



चिखलदऱ्याच्या डोंगरमाथ्याला खालील मैदानी भागाशी जोडणारी ही दळणवळण व्यवस्था साधी असली तरी अत्यंत परिणामकारक होती ती म्हणजे हरकारे, म्हणजेच डाक धावकांची साखळी. रस्ते नसताना, आणि आधुनिक संप्रेषणाच्या खूप आधी, अधिकृत कागदपत्रे वाहून नेण्याची जबाबदारी या स्थानिक डाकियांच्या खांद्यावर होती. हे सामान्य संदेशवाहक नव्हते; त्यांची निवड त्यांच्या शारीरिक क्षमता, जंगलातील मार्गांची अचूक ओळख आणि कठीण परिस्थितीतही विश्वासार्हता यावर आधारित होत असे.

सुदृढ शरीरयष्टीचे हे हरकारे खांद्यावर सुरक्षित चामड्याची पिशवी वाहून नेत, ज्यात अधिकृत पत्रव्यवहार, प्रशासकीय अहवाल आणि वैयक्तिक पत्रे असत. त्यांच्या हातातील लांब बांबूचा भाला ही या व्यवस्थेची [illegible] वैशिष्ट्यपूर्ण खूण होती. त्याच्या [illegible] बांधलेल्या छोट्या घंट्यांचा नाद जंगलातील अरुंद वाटांवरून जाताना त्यांच्या उपस्थितीची सूचना देत असे, वन्यप्राण्यांपासून सावध राहण्यास मदत करत असे आणि एकाकी मार्गावर हालचालीचे सातत्य राखत असे.

चिखलदऱ्याच्या माथ्यावरून हरकारा टपाल घेऊन खाली उतरत असे. हा मार्ग आजच्या रस्त्यासारखा नव्हता, तर मोजरी पॉईंटजवळून खाली जाणारी एक अरुंद, उभी आणि दाट जंगलातून जाणारी पायवाट होती. घसरडी माती, तीव्र उतार आणि दाट झाडीमुळे हा प्रवास अत्यंत कठीण होता आणि तो फक्त अनुभवी धावकच पार करू शकत. ही धाव मोझरीपर्यंत येऊन संपत असे, जिथे संपूर्ण डाक व्यवस्थेतील एक निर्णायक टप्पा सुरू होत असे.

मोझरी हे केवळ विश्रांतीचे ठिकाण नव्हते; ते एक सुसज्ज रिले केंद्र होते, जिथे घोड्यांचे तबेले (horse stable) अस्तित्वात होते. याच ठिकाणी डाक वाहतुकीचे स्वरूप पूर्णपणे बदलत असे.जंगल संपून सपाट मैदान सुरू होत असे आणि मानवी श्रम घोड्यांच्या वेगात परिवर्तित होत. मोजरी येथे हरकाराकडून येणारी डाक आणि घोड स्वाराकडून आलेली डाक यांचे आदान-प्रदान केले जाई.हरकारी कडून येणारी डाक घेऊन चिखलदऱ्याकडे रवाना होत असे तर आलेली डाक तेथील घोडेस्वार डाकिया घोड्यांच्या तबेल्यांमुळे त्वरित पुढील प्रवासासाठी सज्ज असे. त्यामुळे मोझरी हा केवळ थांबा नव्हता, तर पायथ्यावरील एक नियोजित आणि कार्यक्षम वाहतूक केंद्र होता.

मोझरी पासून पुढे डाक घोड्यावरून परतवाड्याकडे नेली जाई.अंदाजे २० किलोमीटरचे हे अंतर जरी कमी असले तरी अत्यंत महत्त्वाचे होते,कारण ते चिखलदऱ्याला प्रशासकीय यंत्रणेशी जोडत असे.एक सक्षम घोडा आणि अनुभवी स्वार हे अंतर एका सलग धावीत पार करू शकत आणि मधल्या टप्प्याची गरज भासत नसे. मैदानावरून, विकसित होत असलेल्या मार्गांमधून डाक वेगाने परतवाड्याकडे पोहोचत असे, जिथे ती पुढे वर्गीकरण कार्यालये, नियोजित टपाल व्यवस्था आणि रेल्वे नेटवर्कमध्ये प्रवेश करत असे.

ही संपूर्ण व्यवस्था एक महत्त्वाचा सिद्धांत स्पष्ट करते.ब्रिटिशांची दळणवळण व्यवस्था भूभागानुसार बदलणारी होती; ती एकसारखी लादलेली नव्हती. डोंगराळ भागात हरकारे वापरले जात, तर सपाट मैदानात घोडेस्वार; आणि या दोन भिन्न पद्धतींमधील संक्रमण बिंदू म्हणून मोझरीचे महत्त्व अधोरेखित होते.मोझरी आणि परतवाड्याच्या मधील हा छोटा टप्पा प्रत्यक्षात एका मोठ्या परिवर्तनाचे प्रतीक ठरतो. एकाकीपणातून जोडणीकडे, श्रमातून गतीकडे आणि स्थानिक वाहतुकीतून साम्राज्याच्या व्यापक संप्रेषण प्रणालीकडे. चिखलदऱ्यावरून निघालेले एक पत्र काही दिवसांत रेल्वे आणि समुद्रमार्गे लंडनपर्यंत पोहोचू शकत असे; परंतु त्याची सुरुवात नेहमी अशीच होत असे. जंगलातून धाव आणि मैदानावरून घोड्याची दौड.

या सुयोजित व्यवस्थेमुळे चिखलदरा ते परतवाडा हा टपालाचा महत्त्वाचा टप्पा अवघ्या एका तासात पार केला जाई. हीच त्या काळातील प्रशासनाच्या कार्यक्षमतेची खरी किल्ली होती. ही सर्व माहिती ब्रिटिशांच्या लंडन येथील ग्रंथालयातून आमचे निसर्ग संशोधक मित्र कै. ज्ञानेश्वर दमाहे यांनी जवळपास दहा वर्षांपूर्वी मिळवली होती,असे ज्येष्ठ संशोधक डॉ विजय इंगोले यांनी सांगितले.





**'भारतरत्न', 'घटनाकार' आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते.**

# बाबासाहेबांचे संविधान म्हणजे... एकसंघ भारताची पोलादी चौकट

**१४** एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे.या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. 'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार' आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे.त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या,न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

### राष्ट्र प्रथम-बाबासाहेबांचा दृष्टिकोन

बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती.संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, 'राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर.' स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल.आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना 'जुलूमाविरुद्ध उगारलेली वज्राची मुठ' असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

### भारताच्या अखंडतेची शाश्वती

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंघ राहील का याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.जगातील अनेक नेत्यांनी हा खंडप्राय देश एकत्र राहणार नाही,असे भाकीत केले होते.पाकिस्तानच्या फाळणीनंतर पश्चिम आशिया खंडात धर्माच्या नावावर झालेली अमानुष मानवी कत्तल जगाच्या पुढे होती. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक,धर्मावरून झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरून होते.मात्र बाबासाहेबांनी अभ्यासाअंती यावर रामबाण उपाय शोधून काढला. ते म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते,स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही.राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल.त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे.भारतीय संविधान सामाजिक आर्थिक, राजकीय,समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ दर्जाचे दस्तावैज आहे.

### संविधानातील कलम;एकात्मतेचा कणा

आपण बघतो, भाषा, प्रांत,जाती,अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात.संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा, प्रांत, जाती, अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते. मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते.विधिमंडळ,कार्यपालिका, न्यायपालिका,माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे.त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते.'भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन (checks and balances) ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची,कार्यवाहनाची,जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे.त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट केले, 'हा देश हा अस्मितेवर नव्हे,भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.'

शोषित,वंचित,गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे हे बाबासाहेबांना माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले.या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

### समानतेचा अधिकार (कलम १४ ते १८)

बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांमध्ये १४ ते १८ या कलमांमध्ये

सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील,जात, धर्म, वंश,लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई,अस्पृश्यता अमान्य,आणि नियुक्तीची समान संधी,तसेच देशाप्रतीची बांधीलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले आहे.

### स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२)

ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. राज्यघटनेतील कलम १९ प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते.भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करू शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे.जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण,शिक्षणाचा हक्क,न्यायालयात दाद मागण्याचा हक्क,विनाकारण स्थानबद्ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

### शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम २३-२४)

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ आणि २४ मध्ये शोषणाविरुद्ध संरक्षण दिले आहे.या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करुन घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरुन काम करुन घेणे, बळजबरीची मजुरी करुन घेणे, १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करुन घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली.ही फार मोठी क्रांती होती आणि याचा कायदा बनल्यामुळे हजारो सालाच्या गुलामगिरीतून मागासवर्गीयांची, शोषितांची मुक्तता झाली.

### धर्मस्वातंत्र्य (कलम २५ ते २८)

धार्मिक चालीरीती व रुढीपरंपरांच्या नावावर शतकानुशतके चाललेल्या शोषणाला घटना लागू झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीने कायमचा पायबंद बसला. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्याला घातक नसेल अशा वर्तनाची हमी कायद्याने घेण्यात आली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले.धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जातीधर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा,धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करून बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच त्यांनी कलम २९,३० अन्वये अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार दिला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातला कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी कलम ३२ अन्वये हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

### सर्वांसाठी न्याय – व्यापक दृष्टी

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली.अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

### संविधान सभेला दिलेले तीन इशारे

संविधान सभेच्या निर्मितीत अनेक महान नेत्यांचे, मान्यवरांचा हातभार होता. मात्र तरीही बाबासाहेबांनाच घटनेचे शिल्पकार संबोधले जाते. कारण, त्यांनी घटनेच्या अंमलबजावणीची दिशा आणि सूत्रे स्पष्टपणे अधोरेखित केली.त्यांची संविधान सभेतील भाषणेही तेवढी बोलकी आहेत. भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम अशी घटना आहे मात्र या घटनेचा वापर कोण करणार ? कसा करणार ? आणि किती प्रामाणिकपणे करणार ? यावरच घटनेच्या अंमलबजावणीचे फलित अवलंबून असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी घटना निर्माण करणाऱ्या संविधान सभेपुढे बोलताना तीन महत्त्वाचे इशारे दिले होते. ते म्हणाले होते,देशातील सामाजिक असमानता दूर होणे आवश्यक आहे.आम्ही सर्वप्रथम भारतीय होणे आवश्यक आहे.त्यांनी परस्पर बंधुतेवर भर दिला.बंधुता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये बंधूभाव आणि एकतेची भावना निर्माण करणे होय. त्यांनी दुसरा इशारा दिला होता आर्थिक विषमतेचा. देशातील सर्व नागरिकांचा समतोल आर्थिक विकास होणे आवश्यक आहे, कारण आर्थिक विषमता श्रीमंत-गरीब दरी वाढवते. ही दरी वाढली तर असंतोष वाढेल. त्यांचा तिसरा इशारा होता.सांप्रदायिकता वाढायला नको. सांप्रदायिकता म्हणजे विशिष्ट धर्माला अधिक महत्त्व देणे. भारत हा विविध धर्मांचा देश आहे.कोणत्याही धर्माचा द्वेष, वाढायला नको. धर्माधारित द्वेष राष्ट्राच्या एकात्मतेला तडा देईल. हे इशारे आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.

### घटना निर्मिती – राष्ट्रनिर्मितीचा पाया

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त?यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले.यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

### संविधान टिकले तर लोकशाही टिकेल

महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत.या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे.संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे.आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे.बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे,जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे.

१४ एप्रिलच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करुया...संविधानाचा सन्मान करुया, समानतेचे,बंधुत्वाचे मूल्य जपूया सर्वप्रथम एक भारतीय बनूया आणि एकसंघ भारत अधिक मजबूत करुया... हीच महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती
कार्यालय, कोल्हापूर
मो.९७०२८५८७७७

# सामाजिक क्रांतीकार्य



**१४** एप्रिल हा दिवस भारतीय समाजजीवनात एक विशेष तेज घेऊन उगवतो. हा दिवस केवळ एका महामानवाचा जन्मदिन नसून, तो अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, समतेच्या ध्यासाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा स्मरणदिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समजून घेतले तर हे प्रकर्षाने जाणवते की त्यांनी भारतीय समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर त्या विचारांना कृतीत उतरवून एक नवा सामाजिक इतिहास घडवला.

बाबासाहेबांच्या सामाजिक कार्याचा पाया म्हणजे शिक्षण होय. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही उच्च शिक्षण प्राप्त केले. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही शिक्षण घेतले आणि आपल्या ज्ञानाच्या बळावर समाजातील विषमतेला आव्हान दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, ते व्यक्तीच्या विचारशक्तीला विकसित करणारे आणि समाजपरिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश हा केवळ घोषवाक्य नसून, तो सामाजिक क्रांतीचा मूलमंत्र आहे. महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा त्यांच्या सामाजिक आंदोलनातील एक ऐतिहासिक टप्पा होता. हा केवळ पाण्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर तो मानवी समानतेचा आणि स्वाभिमानाचा लढा होता. या सत्याग्रहाने संपूर्ण देशाचे लक्ष अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे वेधले. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, 'आम्हाला पाणी नको, आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क हवा आहे.' या आंदोलनामुळे वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्यास सुरुवात केली. याचप्रमाणे नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले.

बाबासाहेबांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढी यांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाला विरोध केला. त्यांच्या मते, कोणतीही सामाजिक व्यवस्था ही मानवी कल्याणासाठी असावी. जर ती मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर ती बदलली पाहिजे. त्यांनी मनुस्मृतीतील विषमतावादी विचारांना विरोध करून सामाजिक क्रांतीची दिशा दिली.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या काळात महिलांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात होते. त्यांना शिक्षणाचा, संपत्तीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता. कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्यही उल्लेखनीय आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अत्यंत कठीण परिस्थितीत काम करावे लागत होते. बाबासाहेबांनी कामगारांसाठी योग्य वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मर्यादित कामाचे तास यासाठी संघर्ष केला. आठ तासांचा कामाचा दिवस ही संकल्पना त्यांनी प्रभावीपणे मांडली. यामुळे कामगारांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली.

बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते,तर त्यांनी राजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावली. या राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळवून दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारत एक लोकशाहीवादी आणि समताधिष्ठित राष्ट्र म्हणून उभा राहिला.

बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक सुधारणांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी भारतीय राष्ट्राच्या घडणीमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंध, न्याय्य आणि लोकशाहीवादी चौकट प्रदान करणे. बाबासाहेबांनी या जबाबदारीचे ओझे अत्यंत सक्षमपणे उचलले. त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले.राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची तरतूद ही त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्पष्ट कायदेशीर बंदी घातली. ही केवळ कायद्याची तरतूद नव्हती, तर ती शतकानुशतकांच्या अन्यायाविरुद्धची ठाम भूमिका होती. याचबरोबर त्यांनी अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था निर्माण केली, ज्यामुळे वंचित घटकांना शिक्षण आणि नोकरीत संधी मिळाली.

बाबासाहेबांचे आर्थिक विचारही अत्यंत प्रगत आणि दूरदर्शी होते. त्यांनी अर्थव्यवस्थेकडे केवळ उत्पादन आणि वितरणाच्या दृष्टीने पाहिले नाही, तर त्याला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांच्या मते, आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे त्यांनी संपत्तीचे न्याय्य वितरण, कामगारांचे हक्क आणि शेतकऱ्यांचे कल्याण यावर भर दिला. त्यांनी औद्योगिकीकरणाचे समर्थन केले, परंतु त्याचवेळी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यावरही जोर दिला.

धर्माच्या बाबतीत बाबासाहेबांनी अत्यंत स्वतंत्र आणि तर्कशुद्ध दृष्टिकोन मांडला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा. जर धर्म मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर तो स्वीकारार्ह नाही. याच विचारातून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. बौद्ध धर्मात समता, करुणा आणि बंधुता या मूल्यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारून सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू केला. बौद्ध धर्म स्वीकारणे हे केवळ धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रतीक होते. बाबासाहेबांचे लेखनही त्यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून समाजातील विषमतेचे विश्लेषण केले आणि त्यावर उपाय सुचवले. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता, स्पष्टता आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली.

बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळींचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजच्या आधुनिक भारतातही प्रकर्षाने जाणवतो.त्यांनी उभारलेली समतेची चळवळ ही भारतीय समाजाच्या परिवर्तनाची पायाभूत शक्ती ठरली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे समाजात मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली. जरी आजही काही प्रमाणात भेदभाव अस्तित्वात असला, तरी त्याविरुद्ध लढण्याची ताकद आणि जाणीव समाजात निर्माण झाली आहे, हे त्यांच्या कार्याचेच फलित आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेला भर हा आजच्या भारताच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. आज समाजातील विविध घटक उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. यामागे बाबासाहेबांनी निर्माण केलेली शैक्षणिक जागृती ही मोठी कारणीभूत आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन न मानता, ते सामाजिक परिवर्तनाचे माध्यम मानले. आजच्या काळातही शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही बाब त्यांच्या विचारांचीच साक्ष देते.

युवा पिढीसाठी बाबासाहेबांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आहेत. आजचा युवक तंत्रज्ञान, विज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात जगत असला, तरी त्याच्यासमोर अनेक सामाजिक आणि नैतिक आव्हाने आहेत. बेरोजगारी, स्पर्धा, सामाजिक ताणतणाव आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या आजच्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश युवकांना दिशा देणारा आहे. त्यांनी दिलेला आत्मसन्मानाचा आणि स्वावलंबनाचा विचार युवकांना सशक्त बनवतो.

शेवटी, असे ठामपणे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नाही, तर ते वर्तमान आणि भविष्याचा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या मार्गाला उजळून टाकतो आणि आपल्याला योग्य दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकच संकल्प करूया. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देऊन, एक न्याय्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

## बाबासाहेब...



सर्वगुण संपन्न तू
सकल क्षेत्री व्याप्ती
सुसक्षम बौद्धधर्मीय
तथागताची रे शक्ती

जाळले मनूस्मृतीला
अंधत्व श्रध्दा मुक्ती
हाडाचे शिक्षक करी
अखंडित ज्ञानप्राप्ती

भाकरी परी पुस्तका
अजब तुमची भक्ती
अर्थशास्त्रीय गणिती
सार्थ ठरविली उक्ती

महिला सबलीकरणा
बनवी कायद्या सक्ती
बळीराजा सुखी हवा
आपली तीव्र आसक्ती

आपणासम राजकर्ते
सदैव बसवावे तख्ती
ध्येय धोरणे आखली
समस्त कामगारांप्रति

आंदोलना दिशा देती
जनसेवा उसळे रक्ती
संविधान खास ठेवा
दिला अतुल्य संपत्ती

निळा सूर्य आठवावा
कधीही येता आपत्ती
दुजा कुणी ना जगती
बाबा रमा बाई दंपत्ती

**- हेमंत मुसरीफ,** पुणे
मो.९७३०३०६९९६

# सांस्कृतिक कार्य विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'भीमगर्जना' या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे महामानवाला संगीतमय मानवंदना देण्यात आली. प्रमिलाताई ओक सभागृहात आज सायंकाळी हा कार्यक्रम झाला. शब्द–सूरांची ही सुरेल मैफल महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याला अभिवादन व समतेच्या विचारांचा जागर करणारी ठरली.

## महामानवाला संगीतमय मानवंदना



कार्यक्रमाचा शुभारंभ सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे वसंत खडसे, पियूष गायधने, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.मधु जाधव, विष्णू निंबाळकर , समन्वयक सचिन गिरी, सहसमन्वयक अक्षय पिंपळकर यांच्या उपस्थितीत झाला. प्रारंभी प्रसिद्ध गायक पद्मविभूषण आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. गायक कुणाल भास्कर वाकोडे, किरण कुणाल वाकोडे यांनी एकाहून एक सुरेल गीते सादर करून उपस्थितांना जिंकून घेतले. प्रारंभी किरण वाकोडे यांनी बुद्ध वंदना सादर केली. कुणाल व किरण यांनी ' साजरी भीमजयंती करू, 'भीमा तुज प्रणाम कोटी कोटी ', माझ्या भीमाची पुण्याई, नऊ कोटी लेकरांची माय पाहिली, लई बळ आलं माझ्या दुबळ्या पोरात अशी एकाहून एक सरस भीमगीते सादर केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या सामाजिक परिवर्तनातील योगदानाचा आढावा संगीत आणि सादरीकरणाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आला. कार्यक्रमात कुणाल भास्कर वाकोडे, सौ. किरण कुणाल वाकोडे तसेच सचिन जाधव (गिटार), जानराव बहाले (बासरी व क्लॅरिनेट), जयकुमार गुरु (कीबोर्ड), विशाल इंगळे (ढोलक), कार्तिक चंडाले (ढोल), नितीन गुरु (ऑक्टोपॅड), अनिकेत अंबुसकर (तबला) यांचा सहभाग होता. माणिकराव वानखडे यांनी सूत्रसंचालन केले. आकाश वानखडे व प्रतीक आंबेकर यांनी कोरस कलाकार म्हणून सहभाग घेतला.हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली साकार झाला.कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# अकोला क्रीडा प्रबोधिनीला जुनिअर राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत ३ पदके

■ प्रतिनिधी | अकोला ■



### गोपाल गणेशे सुवर्ण पदकासह भारतीय संघात निवड. उजबेकिस्तान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

आमदार निवास, नागपूर येथे दि. ५ ते ११ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ७ वी ळ-१७ जुनिअर मुले/मुली राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी, अकोला येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ३ पदकांची कमाई केली. या यशामुळे अकोल्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्पर्धेत गोपाल गणेशे याने ५०-५२ किलो वजनगटात अप्रतिम कौशल्य, आत्मविश्वास आणि चिकाटीचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या उल्लेखनीय यशाच्या जोरावर त्याची उजबेकिस्तान येथे होण्याऱ्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड निश्चित झाली आहे त्याच्या या कामगिरीमुळे तो भविष्यात देशासाठी मोठी कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

याशिवाय प्रबोधिनीच्या इतर खेळाडूंनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संस्कार आत्राम ४४-४६ किलो वजनगटात रौप्य पदक आणि युगाल खोटे ६३- ६६ किलो वजनगटात कांस्य पदक जिंकले. सर्व खेळाडूंनी अत्यंत कठीण प्रतिस्पर्ध्यांना सामोरे जात आपल्या कौशल्याची छाप पाडली.

# रक्तदान शिबिराला युवकांचा प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा समाजकल्याण कार्यालयातर्फे सामाजिक समता सप्ताहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी अनेक युवकांनी उपस्थित राहून रक्तदान करून सामाजिक बांधीलकीचा प्रत्यय दिला.

जिल्हयामध्ये सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,अकोला यांच्यावतीने समाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे निमित्ताने जिल्हयात आरोग्य अधिकारी डॉ. अक्षता प्रधान, डॉ. मयुरेश वैराळे , शिल्पा तायडे , मयुरी गायगोले यांच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालय व महाविद्यालय,अकोला येथे रक्तदान शिबीरामध्ये इच्छुक व्यक्तीनी रक्तदान करुन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,निमवाडी अकोला येथे सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण विभाग यांचे विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबददल महिला मेळावा साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता म्हणुन श्रीमती. सपना लांडे मॅडम व्याख्याता(समाज सेवीका) यांनी महिला विषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले व शाहु,फुले,आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांनी महिलासाठी केलेल्या कार्याबददल उपस्थितांना माहिती दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांचे प्रतिमापूजन व हारअर्पण करून सदर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली, कार्यक्राचे अध्यक्ष- श्री.अमोल यावलीकर,उपायुक्त(जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,अकोला) हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.अभिजीत काळे साहेब प्रभारी संचालक,(इतर मागास बहुजन कल्याण विभाग) व श्री.मारोती वाठ साहेब,सहाय्यक आयुक्त, (समाज कल्याण,अकोला) व प्रास्तावाना श्री.गोपाल वाघमारे सर ,वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक हे उपस्थित होते.

# 'कृषी अवजार बँक' : बचत गटांनी २५ एप्रिलपूर्वी अर्ज करावा

**अकोला :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत जिल्ह्यातील महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेतून गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्क्यांपर्यंत, कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद, माविम पुरस्कृत व इतरमहिला बचत गट तसेच महिलांचे गाव संघ पात्र राहतील.


## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५४०/२०२६ — प्रोसेस नं.४९३८/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. वसुंधरा सुरेश देवकर २. राहुल सुरेश देवकर दोन्ही रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला. मो. नं. ९९२१६३७७२४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुरेश भिमराव देवकर
**पत्ता :-** रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेश भिमराव देवकर यांचे दि. ३०/१२/२०२५ रोजी राहते घरी, डोंगरगाव, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४९४/२०२६ — प्रोसेस नं.४३३६/२०२६
चौ.ता. १४/०५/२०२६ — दिनांक : ०१/०४/२०२६

**अर्जदार :** १. बापूराव रामकृष्ण कडू रा. आपातापा (आपोती), अकोला. ता. जि. अकोला. २. बाबुराव रामकृष्ण कडू रा. शिक्षक कॉलनी, वार्ड नं. ५, मेहकर, ता. मेहकर जि. बुलढाणा. ३. अंबादास रामकृष्ण कडू रा. व्ही.एच.बी. कॉलनी, विजय नगर, तारफैल, अकोला. ता. जि. अकोला. ४. रमेश रामकृष्ण कडू रा. पवनपुत्र नगर, हनुमान मंदिरा जवळ, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा. ५. कमला दादाराव वडाळे रा. चोहोट्टा बाजार, ता. अकोट जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामकृष्ण झाबुजी कडू २. लक्ष्मीबाई रामकृष्ण कडू
**पत्ता :-** रा. दोघेही रा. तारफैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामकृष्ण झाबुजी कडू यांचे दि. २०/०४/२०१६ रोजी व तसेच मयत लक्ष्मीबाई रामकृष्ण कडू यांचे दि. २८/०१/२०११ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

old passport no K17485521 have change my from **SYED NAYYAR ALI SYED ASGAR ALI** -TO- **SAYYED NAYYAR SAYYED AJGAR** My Residential Address isWARD NO 01 JAVED KHAN SCHOOL MANGRULPIR ROAD MAHAN SUB DISTRICT BARSHITAKLIDIST AKOLA 444405

## Change In Name

I Have Change My Name in My Documents After Widower From **DIPALI VARUN INDANI** -TO- **DEEPALI RAMESHLAL SHAHU** My DOB is -(01/01/1986)My Residential Address is - Trikoni Maidan 189,Ashirwad Nagar P No 562, Hudkeshwar Road Nagpur Maharashtra 440024.

## Change In Name

I Have Change My Name in My Passport No is (N0546117) From **RAVI CHAVHAN** -TO- **RAVI RAMDAS CHAUHAN** My Residential Address is - At Post. Lakhpuri Taluka Murtizapur Akola Maharashtra 444107

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५५५/२०२६ — प्रोसेस नं.४९४०/२०२६
चौ.ता. ०७/०५/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. वेणूबाई समाधान खंडारे २. सौ. संगीता रामदास इंगळे रा. मु. बाभुळगाव, पो. पाडी आसरा, जि. वाशिम. ३. सुरेश समाधान खंडारे अर्जदार क. १ व ३ दोघे रा. बुद्ध विहार जवळ, सिंधी कॅम्प, खदान, ता. जि. अकोला. मो. नं. ९८८१४८३१०२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : समाधान कोळशीराम खंडारे
**पत्ता :-** रा. बुद्ध विहार जवळ, सिंधी कॅम्प, खदान, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत समाधान कोळशीराम खंडारे यांचे दि. ०६/११/२०१९ रोजी राहते घरी, अकोला येथे निधन झाले. आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५५५/२०२६ — प्रोसेस नं.४९४०/२०२६
चौ.ता. ०७/०५/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. वेणूबाई समाधान खंडारे २. सौ. संगीता रामदास इंगळे रा. मु. बाभुळगाव, पो. पाडी आसरा, जि. वाशिम. ३. सुरेश समाधान खंडारे अर्जदार क. १ व ३ दोघे रा. बुद्ध विहार जवळ, सिंधी कॅम्प, खदान, ता. जि. अकोला. मो. नं. ९८८१४८३१०२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : समाधान कोळशीराम खंडारे
**पत्ता :-** रा. बुद्ध विहार जवळ, सिंधी कॅम्प, खदान, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत समाधान कोळशीराम खंडारे यांचे दि. ०६/११/२०१९ रोजी राहते घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५१०/२०२६ — प्रोसेस नं.४५७९/२०२६
चौ.ता. ०५/०५/२०२६ — दिनांक : ०६/०४/२०२६

**अर्जदार :** १. नंदू नत्थुराम अहीर (देहलीवाले) रा. सरस्वती नगर, तुकाराम चौक, अकोला. ता. जि. अकोला. २. हरिचरण नत्थुराम देहलीवाले (मयत) २अ. उमाबाई हरिचरण देहलीवाले २ब. विशाल हरिचरण देहलीवाले २क. दिनेश हरिचरण देहलीवाले दोन्ही रा. आझाद पार्क किल्ला, अहिरवाडी, राजराजेश्वर मंदिर रोड, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला. २ड. संगिता सुभाष नंदवंशी रा. गटमलपुरा नवाब मार्केट च्या मागे, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. ३. रामचरण नत्थुराम देहलीवाले (मयत) ३अ. भुरीबाई रामचरण देहलीवाले ३ब. घनशाम रामचरण देहलीवाले ३क. मंगेश रामचरण देहलीवाले दोन्ही रा. आझाद पार्क किल्ला, अहिरवाडी राजराजेश्वर मंदिर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला, ३ड. सरिता पृथ्वीराज काबलीये रा. बस स्टॅड जवळ, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नत्थुराम मिठुराम देहलीवाले
**पत्ता :-** रा. आझाद पार्क किल्ला, अहिरवाडी, राजराजेश्वर मंदिर रोड,जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नत्थुराम मिठुराम देहलीवाले यांचे दि. ०८/०२/१९८७ रोजी आझाद पार्क किल्ला, अहिरवाडी राजराजेश्वर मंदिर रोड, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/९२/२०२६
महानंदा गजानन गावंडे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : ०८-०५-२०२६

**अर्जदार :** १. सौ. महानंदा गजानन गावंडे वय अं६० वर्ष धंदा घरकाम २. लोकेश गजानन गावंडे वय अं३० वर्ष धंदा शेती ३. संकेत गजानन गावंडे वय अं२८वर्ष धंदा नोकरी अर्जदार क १ ते ३ रा. गायगांव ता.बाळापूर जि. अकोला .

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत गजानन राजाराम गावंडे हे दिनांक १७.१२.२०२५ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल अकोला ता. जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत गजानन राजाराम गावंडे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०८.०५.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २७.०३.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का — **आदेशानुसार** सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय क. स्तर, बाळापुर

## जाहिर सुचना

सर्व जनतेस व वित्तिय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. संतोष सदाशिव गायकवाड आणि सुनीता संतोष गायकवाड रा खडकी बु., अकोला ता. जि. अकोला यांनी आधार हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला येथे खालील वर्णनाचि मालमत्ता गहाण ठेवून कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे.

फ्लॅट/हाऊस नं ८अ ज्याचा बिल्ट अप एरिया ३७२ चौ फूट, सुपर बिल्ट अप एरिया ४५० चौ फूट अविभाजित हिश्या ज्याचा सर्वे नं २०/१/२०/२/२३, लेआऊट प्लॉट नं २३, वॉर्ड नं डी ११, दक्षिण झोन नं ४ मौजे खडकी बु. चे क्षेत्रफळ २०३३.४७ चौ फूट ता. जि अकोला '.

ची मुळ नोंदणीकृत खरेदी खत २७३१/२०१७ दि. ११.०७.२०१७, ज्यात लि घेणार :- अजयसिंग प्रतापसिंग परमार आणि काजल किशोर नन्नावरे व लिहून देणार ;- दामोदर वामनराव जणूनकार हे आहेत ज्याची मुळ प्रत दिनांक ३१.०३.२०२६रोजी नीता अशोक गायकवाड यांच्याद्वारे गहाळ झाली आहे ज्याचा रिपोर्ट खदान पोलीस स्टेशन अकोला येथे ता ११.०४.२०२६ ला दिला आहे.

ज्या अर्थी वरील मालमत्ते वर कोणाचे काही कर्ज, हक्क, बोजा, गहाण, अधिकार, ताबा, आक्षेप असेल त्यांनी सदर सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्र पुराव्यासह आक्षेप नोंद्वावा अन्यथा कोणाचाही कसलाही स्वरूपाचा आक्षेप नाही असे समजुन आधार हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला हे वरिल मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाचि रक्कम वितरीत करतील त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत वा उजर चालनार नाही, याचि नोंद घ्यावी.

अकोला
दि ११.०४.२०२६

**अधिवक्ता**
**विरेंद्र सुरेशकुमार नान्दे**
राः- रामधन प्लौट, रामदासपेठ, अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५७०/२०२६ — प्रोसेस नं.४९३५/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. शुभम गणेश राऊत २. युगाली गणेश राऊत ३. गणेश रामकृष्ण राऊत सर्व रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वंदना गणेश राउत
**पत्ता :-** रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जुने खेतान नगर, कौलखेड,ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वंदना गणेश राउत यांचे दि. २१/०१/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५२४/२०२६ — प्रोसेस नं.४८१९/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ — दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुमन राजाराम इंगळे २. जितेंद्र राजाराम इंगळे ३. राकेश राजाराम इंगळे सर्व रा. मोती नगर, सरनाईक गार्डन जवळ, पुसद, जि. यवतमाळ.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजाराम राघोजी इंगळे
**पत्ता :-** रा. व्दारा सुनिता राजेश डवरे रा. राम नगर, श्रीकृष्ण मंदिरच्या बाजुला, डॉ. भारती हॉस्पीटल ला लागून, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजाराम राघोजी इंगळे यांचे दि. ०८/०१/२०१३ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की माझे पक्षकाराने अशोक मालुरामजी पालडीवाल रा. लेडी हार्डींग हॉस्पीटल, अकोला ता. जि. अकोला यांचेशी त्यांच्या मालकीचा खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

भुमापन क ६४, नझुल प्लॉट क्र. ११ / १+१२/१, शिट क. ६४ए, ज्याचे एकूण क्षेत्रफळ २५९.३४ चौ. मिटर (२७९१.५ चौ. फुट ) दुर्गा चौक अकोला येथे बांधण्यात आलेल्या कमर्शियल दुकान त्यमधील दुकान क. ८ ज्याचे एकुण क्षेत्रफळ ९ x १६ फुट ज्याचे एकुण क्षेत्रफळ १४४ चौ फुट त्यास चतु:सिमा :- पूर्वेस - सिडी पश्चिमेस - दुकान क. ७ उत्तरेस - चांडक यांची मालमत्ता दक्षिणेस- रस्ता.

येणेप्रमाणे वरील मिळकतीत संपुर्ण अधिकारासह खरेदी करण्याचा माझे पक्षकाराने सौदा कायम केला असुन वरील स्थावर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क बोजा गहाण, ताबा व ईसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार, न्यायालयीन संलग्न मालमत्ता असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसांचे आंत माझेकडे लेखी कागदपत्रांसह हरकत नोंदवावी जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत आली नाही तर माझे पक्षकार वरील दुकानाचे खरेदीखत नोंदवून घेतील व त्यांनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर किंवा कुठल्याही प्रकारचा वाद चालणार नाही. याची सर्व संबंधितांना नोंद घ्यावी.

अकोला
दि. ११/०४/२०२६

**पक्षकाराकरीता अधिवक्ता**
**(ॲड. विजय अनुपकुमार जेतवानी)**
गायत्री भवन जवळ, आदर्श कॉलनी,
अकोला ता. जि. अकोला मो. नं. ८८८८६८८३२६

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५११/२०२६ — प्रोसेस नं.४५३०/२०२६
चौ.ता. ११/०६/२०२६ — दिनांक : ०४/०४/२०२६

**अर्जदार :** १. बेबी सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. २. मंगेश सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. ३. सुदर्शन सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. ४. नागसेन सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष लखुजी मोहोड
**पत्ता :-** रा. धातोर्डी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभाष लखुजी मोहोड यांचे दि. ०४/०७/२०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०६/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५१५/२०२६ — प्रोसेस नं.४५८३/२०२६
चौ.ता. ०८/०६/२०२६ — दिनांक : ०६/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुनिता नंदकिशोर रायलकर २. सचिन नंदकिशोर रायलकर ३. धनंजय नंदकिशोर रायलकर तिन्ही रा. गल्ली नं. ७, गजानन नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. पुनम संतोष इंगळे रा. संग्रामपूर, जि. बुलढाणा. ५. मनीषा संतोष बोरसे रा. तेलिपुरा, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. ६. अर्चना संतोष सोमानी रा. केशव नगर, वाशिम, जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नंदकिशोर गणपतराव रायलकर
**पत्ता :-** रा. गल्ली नं. ७, गजानन नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला.ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नंदकिशोर गणपतराव रायलकर यांचे दि. १५/०४/२०२५ रोजी गल्ली नं. ७, गजानन नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८५/२०२६ — प्रोसेस नं.१५८६/२०२६
चौ.ता. १५/०४/२०२६ — दिनांक : ०५/०२/२०२६

**अर्जदार :** १. प्रकाश प्रल्हाद उन्होने २. शांताबाई प्रल्हाद उन्होने क १ व २ रा. उगवा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नागो संपत महल्ले
**पत्ता :-** रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नागो संपत महल्ले यांचे दि. ०१/१०/२०१५ रोजी मौजे उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# डॉ.बाबासाहेबांची लेखणी आजही जिवंत

## परिवर्तनवादी पत्रकारितेचा दीप विझलेला नाही

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा येथे आयोजित परिसंवादात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेच्या विचारांची आजही असलेली प्रासंगिकता अधोरेखित करण्यात आली. परिवर्तनवादी पत्रकारितेची पायाभरणी बाबासाहेबांनीच केली असून, त्यांच्या विचारांची दिशा आजच्या माध्यमविश्वासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचा सूर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली पत्रकारिता' या विषयावर परिसंवादाचे आयोजन १२ एप्रिल रोजी सायंकाळी सिव्हील लाईन परिसरातील आंबेडकर पुतळा येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रशांत देशमुख होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निलेश पिंजरकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश खडसे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रसिद्धी प्रमुख महेंद्र मुनेश्वर यांनी सादर केले. समितीच्या महासचिव शारदा झांबरे, मुख्य संयोजक विशाल रामटेके, जनसंपर्क प्रमुख प्रमोद पाणबूडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात प्रशांत देशमुख यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेचा वेध घेताना सांगितले की, त्या काळातील वृत्तपत्रे केवळ माहिती, मनोरंजन व मार्गदर्शनापुरती मर्यादित होती. समाजातील दलित, वंचित घटकांचे वास्तव त्यात प्रतिबिंबित होत नव्हते. ही पोकळी भरून काढण्यासाठी बाबासाहेबांनी



**समतेचा आवाजच खरी पत्रकारिता : परिसंवादात ठाम संदेश**

मूकनायक या नियतकालिकाची स्थापना केली.

त्यानंतर बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत या माध्यमांतून त्यांनी सामाजिक प्रबोधनाची चळवळ उभी केली.सत्य मांडणे, तटस्थता राखणे आणि समाजपरिवर्तन घडवणे हीच खरी पत्रकारिता, असे सांगत कोणत्याही एका वर्गाची बाजू न घेता सर्वांना न्याय देणे हेच बाबासाहेबांचे तत्त्व होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी निलेश पिंजरकर यांनीही आजच्या माध्यमविश्वावर भाष्य करताना बाबासाहेबांच्या पत्रकारितेची दिशा आज अधिक आवश्यक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.परिसंवादानंतर नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. चार दिवसीय भीम जयंती महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी विजय आगलावे, राजीव वानखेडे, अनिल इंगळे, प्रशांत भगत, प्रवीण बनसोड, बंडू फुलमाळी, सुमेध बनसोड, विशाल फुलझेले, विनोद लोखंडे, पंकज लभाणे, संदीप काळपांडे, राजू थुल, ताराचंद भगत, दिनेश थूल, वसंत भगत, चिंतामण बुरबुरे, अमित नाईक, रिंकू घोडेस्वार, मंगला ढाले आदींनी परिश्रम घेतले.

# रुग्णवाहिका नसल्याने 'मुक्या जीवाचा' अंत

## झुंज दिली, पण व्यवस्था हरली संवेदनशीलतेची परीक्षा अपयशी

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

तालुक्यातील एका गाईच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सकाळी प्रसूतीदरम्यान अत्यंत गंभीर अवस्थेत असलेल्या या गाईने दिवसभर मृत्यूशी झुंज दिली, मात्र अखेर रुग्णवाहिकेच्या अभावामुळे तिची लढाई अपूर्णच राहिली.

सकाळी गाईची प्रसूती झाली, पण दुर्दैवाने तिच्यासोबत संपूर्ण गर्भाशय बाहेर आले. ही जीवघेणी परिस्थिती ओळखून जीवरक्षक फाउंडेशनची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. स्वप्नील वाळके, ओम कापसे, ओम चाफले, चेतन गावंडे, भाविक कोपरकर, विराज कुंभारे, स्वरांश खापणे यांच्यासह परिसरातील सादिक शेख व पंकज काकडे यांनी जीव तोडून प्रयत्न सुरू केले.औषधोपचार करून गर्भाशय पुन्हा आत टाकण्यात आले, पण काही तासांतच तीच अवस्था पुन्हा निर्माण झाली. दिवस भर हीच झुंज सुरू राहिली. कडक उन्हात ती गाय वेदनांनी तडफडत होती, आणि मदत करणारे सर्वजण हतबल होऊन तिच्यासाठी झटत होते.

मात्र या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठा अडथळा ठरला तो म्हणजे रुग्णवाहिकेचा अभाव. सुमारे ५०० किलो वजनाच्या गाईला योग्य प्रकारे हलवणे अशक्य ठरत होते. जर पशुवैद्यकीय रुग्णवाहिका उपलब्ध असती, तर वेळेवर योग्य उपचार होऊन तिचा जीव वाचू शकला असता, अशी खंत व्यक्त केली जात आहे.रात्र झाली, घड्याळाने बारा वाजवले थकलेल्या टीमला अखेर माघार घ्यावी लागली. त्या गाईला तिथेच सोडून जावे लागले आणि काही वेळातच तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.ही घटना केवळ एका गाईच्या मृत्यूची नाही, तर व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे. रस्त्यावरच्या मुक्या प्राण्यांसाठी झटणाऱ्या संस्थांकडे मूलभूत सुविधा नसणे ही गंभीर बाब आहे.शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन अशा संस्थांना रुग्णवाहिका, वैद्यकीय साधने आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. अन्यथा अशा निरपराध जीवांचा बळी पुढेही जात राहील.ही फक्त एका गाईची कहाणी नाही ही आपल्या माणुसकीच्या संवेदनशीलतेची कठोर परीक्षा आहे,आणि आपण त्यात नापास ठरलो आहोत,

## संक्षिप्त

### दुचाकीच्या धडकेत पादचारी जखमी

**देवळी-** येथे भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत पादचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. विजय तेलंग (रा. देवळी) हे आठवडी बाजारातून खरेदी करून घरी परतत असताना ही घटना घडली. अचानक आलेल्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला. रस्त्यावर गंभीर अवस्थेत पडलेल्या विजय तेलंग यांना त्यांच्या मुलाने तातडीने सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी ममता विजय तेलंग (५०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून देवळी पोलिसांनी पियुष वाघमारे (रा. टाकळी खोडे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू असून आरोपीचा शोध घेतला जात आहे.

### ट्रेलरच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू; चालक फरार

**कारंजा-** अमरावती-नागपूर महामार्गावर ठाणेगाव येथील बसस्थानकाजवळ भरधाव ट्रेलरच्या धडकेत एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. धनराज चिंधुजी राक्षे (६८, रा. ठाणेगाव) हे दुचाकीवरून रस्ता पार करत होते. त्यावेळी अमरावतीकडून येणाऱ्या ट्रेलरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना कारंजा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीदरम्यान मृत घोषित केले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी कारंजा (घाडगे) पोलिसांनी अज्ञात ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### शेतातील बंड्यातून ७४ हजारांची चोरी

**हिंगणघाट-** तालुक्यातील घाटसावली परिसरात शेतातील बंड्याचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली. मनोज भेदुरकर यांनी शेतातील बंड्यात लोखंडी पेटीत मजुरांच्या मजुरीसाठी ७४ हजार रुपये ठेवले होते. दरम्यान, शेजाऱ्याने बंड्याचे कुलूप तुटले असल्याची माहिती दिल्यानंतर त्यांनी पाहणी केली असता पेटीतील रक्कम चोरीस गेल्याचे आढळले. या प्रकारामुळे शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला आहे. याप्रकरणी वडनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### शिवार्पण नगरातून दुचाकी चोरी

**वर्धा -** नालवाडी येथील शिवार्पण नगर परिसरातून अज्ञात चोरट्याने घरासमोर उभी असलेली दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली. प्रफुल्ल वाघमारे यांनी आपली एमएच ३२ एपी ०५५८ क्रमांकाची दुचाकी घरासमोर उभी ठेवली होती. सकाळी पाहणी केली असता दुचाकी चोरीस गेल्याचे लक्षात आले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# रुग्णांच्या नशिबी 'अंधार' आणि प्रशासनाची 'मजा'

## सेलू ग्रामीण रुग्णालयाचा रामभरोसे कारभार, पर्यायी यंत्रणा निष्क्रिय; प्रशासनाच्या तयारीवर प्रश्नचिन्ह

**सेलू/ जनमाध्यम**

सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात ११ एप्रिलच्या रात्री अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने उपचार घेत असलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. उष्णतेच्या तीव्र लाटेच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घटनेमुळे रुग्णांची रात्र अक्षरशः हालअपेष्टांत गेल्याचे समोर आले आहे.

माहितीनुसार, शनिवारी रात्री उशिरा रुग्णालयाचा वीजपुरवठा अचानक खंडित झाला. परिणामी काही वॉर्डमध्ये पूर्ण अंधार पसरला. उकाडा, घुसमटणारी हवा आणि डासांचा वाढलेला प्रादुर्भाव यामुळे रुग्णांची अवस्था अधिकच बिकट झाली. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि गंभीर आजारांवरील उपचार घेत असलेल्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागला.

रुग्णांच्या नातेवाईकांनी तातडीने पर्यायी व्यवस्थेची मागणी केली होती; मात्र ती वेळेवर उपलब्ध झाली नसल्याचे आरोप करण्यात येत आहेत. काही नातेवाईकांनी डॉक्टरांच्या कक्षात



वीजपुरवठा सुरू असल्याचेही सांगितले. त्यामुळे रुग्णसेवेतील प्राधान्यक्रमाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने या संदर्भात स्पष्टीकरण देताना वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर काही रुग्णांना दुसऱ्या वॉर्डमध्ये हलविण्यात आल्याचे सांगितले. तथापि, प्रत्यक्षात अनेक रुग्णांना रात्रभर अडचणींचा सामना करावा लागल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे.या घटनेनंतर रुग्णालयातील आपत्कालीन व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जनरेटर किंवा इन्व्हर्टर यांसारखी पर्यायी साधने उपलब्ध असतानाही ती तातडीने कार्यान्वित का करण्यात आली नाही, याबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. तसेच, वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी सकाळपर्यंत प्रतीक्षा का करावी लागली आणि दुरुस्तीकरिता खासगी तंत्रज्ञाला बोलावण्याची वेळ का आली, याचाही शोध घेण्याची मागणी होत आहे. आरोग्यसेवेसारख्या संवेदनशील क्षेत्रात अशा प्रकारच्या त्रुटी गंभीर मानल्या जातात. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# दानशूर हात थांबले, पण माणुसकीचा दीप अजूनही तेवत आहे

## दत्ताजी मेघे यांना अश्रुपूर्ण श्रद्धांजली

**वर्धा/ जनमाध्यम**

विदर्भाच्या मातीतून उभा राहिलेला एक दानशूर, कर्तृत्ववान आणि




समाजासाठी आयुष्य अर्पण करणारा चेहरा हरपल्याची जाणीव वर्ध्यातील श्रद्धांजली सभेत प्रकर्षाने उमटली. ज्येष्ठ समाजसेवक व उद्योजक स्वर्गीय दत्ताजी मेघे यांच्या स्मरणार्थ वर्धा सोशल फोरमच्या वतीने स्वाध्याय मंदिर येथे आयोजित सभेत सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी पवनार आश्रमचे संचालक गौतमजी बजाज होते. त्यांनी आपल्या भाषणात मेघे यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांनी जगलेले जीवन हे समाजासाठी एक मार्गदर्शक दीप आहे, असे सांगितले. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात यासाठी वर्धा शहरात भव्य स्मारक उभारण्याची मागणी यावेळी व्यक्त करण्यात आली.सभेची सुरुवात शंकरप्रसाद अग्निहोत्री यांनी मेघे यांच्याशी असलेल्या जिव्हाळ्याच्या आठवणींनी केली. राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मनोज चांदुरकर, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे यांसह अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून श्रद्धांजली अर्पण केली.मेघे साहेबांसारखा गरिबांचा खरा कैवारी पुन्हा होणे कठीण, अशा शब्दांत अनेकांनी भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले, तर अभ्युदय मेघे व मनिषा मेघे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/ जनमाध्यम**

महसूल विभागांतर्गत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसुली विषयक तक्रारींचे तात्काळ निराकरण व्हावे तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा एक अंतर्गत आष्टी तालुक्यातील तळेगाव (शा.पं.) येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव (शा.पं.) येथे जिल्हाधिकारी वान्मथी सी व उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या नेतृत्वात शिबिर आयोजित करण्यात आले.

याशिबिरात नागरिकांची प्रत्यक्ष गृह चौकशी करून जात प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तसेच रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, भूमिहीन दाखले, उत्पन्न दाखले, घरकुल मंजुरी प्रमाणपत्र, पुरवठा विभागाचे ई-राशन कार्ड, संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, भूमिहीन प्रमाणपत्र, आरोग्य विभागाचे आयुष्यमान भारत कार्ड आदी विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. यासोबतच कलम १५५ अंतर्गत आदेश व कलम ८५ अंतर्गत आपसी वाटणीचे आदेशही देण्यात आले.या शिबिरात एकूण १०९ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच अभियानाच्या प्रारंभापासून दि. १८ फेब्रुवारी ते १० एप्रिल या कालावधीत एकूण १ हजार ७३४ सेवा प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आल्याची माहिती तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी दिली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# एकुर्ली शिवारात जनावरांची चोरी; शेतकऱ्याचे नुकसान

**मोझरी-** अल्लीपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकुर्ली येथील शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली. बंडू शंकरराव गिरडकर (४५) यांच्या शेतातील बंड्यात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी प्रवेश करून ७० ते ८० कोंबड्या व १२ शेळ्या चोरून नेल्या. गिरडकर यांनी आपल्या शेतात कोंबड्या व शेळ्यांचे संगोपन केले होते. चोरीमुळे सुमारे १ लाख ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सकाळी घटना लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. माहिती मिळताच गिरडकर यांनी अल्लीपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

# संत गजानन महाराज मंदिर उभारणीस प्रारंभ

**सेलू-** हिंगणी येथील सुभेदार वाडीत संत गजानन महाराजांच्या



भव्य मंदिर उभारणीसाठी महाशांती पूजेद्वारे शुभारंभ करण्यात आला. रविवारी पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यास गावातील व परिसरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मंदिरासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेवर विधिवत पूजा, महायज्ञ आणि मंत्रोच्चार करण्यात आले. सकाळपासूनच सुभेदार वाडी परिसरात भक्तांची मोठी गर्दी होती. 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात वातावरण भक्तिमय झाले होते. गुरुजींच्या उपस्थितीत पार पडलेल्या विधींमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. या मंदिराच्या बांधकामाला लवकरच सुरुवात होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.हिंगणी परिसराला संत गजानन महाराजांच्या वास्तव्याचा ऐतिहासिक वारसा लाभल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. सुभेदार वाडीत त्यांनी वास्तव्यास राहून सुभेदार गणेश यादव यांना आशीर्वाद दिल्याचा उल्लेख 'श्री गजानन विजय' ग्रंथात असल्याचेही सांगण्यात आले.या पार्श्वभूमीवर उभारण्यात येणारे मंदिर भाविकांसाठी श्रद्धास्थान ठरणार असून, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# जन्मवेळच अनिश्चित; मग कुंडलीचा आधार काय-गजेंद्र सुरकार

## अंधश्रद्धेविरोधी संदेश; विद्यार्थ्यांसमोर भोंदूगिरीचे प्रात्यक्षिक

**वर्धा/ जनमाध्यम**

बाळाच्या जन्माची अचूक वेळच निश्चित करता येत नसेल, तर त्या आधारे तयार होणारी कुंडली ही वैज्ञानिकदृष्ट्या ग्राह्य धरता येत नाही, असा ठाम मतप्रदर्शन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले. अंधश्रद्धा व अवैज्ञानिक समजुतींवर प्रहार करत त्यांनी विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार करण्याचे आवाहन केले.

समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव येथील कस्तुरबा नर्सिंग कॉलेजमध्ये सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. बार्टीच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात रजनी सुरकार, ज्ञानेश्वर बडोले, ज्योत्स्ना जांभुळकर आणि रंजना मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.सुरकार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजात आजही अनेक धार्मिक विधी व परंपरा प्रचलित आहेत; मात्र त्यामागील वैज्ञानिक आधार स्पष्ट होत नाही.

विशेषतः बाळाच्या जन्मानंतर कुंडली काढण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर रूढ झाली आहे. परंतु जन्मवेळ नेमकी कोणती मानायची गर्भधारणा, गर्भाची वाढ, बाळाचे



डोके बाहेर येणे की पहिला श्वास याबाबतच एकमत नसल्याने कुंडलीचा पाया कमकुवत ठरतो.१९८४ मध्ये सातारा येथे झालेल्या अखिल भारतीय ज्योतिष परिषदेतही या मुद्द्यावर एकमत न झाल्याचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, अनिश्चित निकषांवर आधारित भविष्यकथनाला वैज्ञानिक मान्यता देता येत नाही.

त्यामुळे ज्योतिष, हस्तरेषा किंवा फेसरीडिंगद्वारे भविष्य सांगण्याचे दावे फोल ठरतात, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांनी कालसर्प योग, नारायण नागबळी, विविध पूजाविधी यांच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक लुबाडणूक होत असल्याचा आरोप केला.

काही ठिकाणी भोंदूगिरीच्या माध्यमातून महिलांचे शोषणही होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा प्रकारांपासून सावध राहून विवेकाने निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमात विविध 'चमत्कार' सादर करून बुवा-बाबा लोकांची कशी दिशाभूल करतात, याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योत्स्ना जांभुळकर यांनी केले, सूत्रसंचालन रंजना मस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर बडोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोनल सोनटक्के, स्वाती कांबळे, आरती डंभारे, तेजस दाते, शुभम वैद्य, चेतन पिसे व विक्की घुसे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# माजी मंत्री बच्चू कडू यांना अटकपूर्व जामीन

## -अचलपूर अतिरिक्त न्यायालयाचा दिलासा



**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी आमदार बच्चू कडू यांना अचलपूर अतिरिक्त न्यायालयाचे न्यायाधीश सागर पाटील यांनी मोठा दिलासा दिला आहे.आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत भाऊ अभिजीत तायडे यांना रस्ता अपघातात मारण्याचे षडयंत्र करण्याचे आरोप त्यांच्यावर लावण्यात आले होते. या प्रकरणात न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. यामुळे कडू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माहितीनुसार काही दिवसापूर्वी आमदार प्रवीण तायडे यांनी चांदूरबाजार पोलीस ठाण्यात बच्चू कडू यांच्या विरोधात एक ऑडिओ क्लिप देऊन मारण्याचे षडयंत्र करण्याचे आरोप लावण्यात आले होते. या क्लिपमध्ये माजी मंत्री बच्चू कडू आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांचा आवाज होता. कडू यांच्या कुरळपूर्णा येथील निवासस्थानावर झालेल्या बैठकीचा हा ऑडिओ होता. यामध्ये आमदार तायडे यांचे चुलत भाऊ अभिजीत तायडे यांना रस्ता अपघातात ठार मारण्याची योजना बनविण्यात आली असल्याचे सांगण्यात आले होते. यवतमाळच्या टिप्पर गँगचा यामध्ये उल्लेख होता. या ऑडिओमुळे राजकीय वातावरण तापले होते. यानंतर आमदार तायडे यांनी पत्रकार परिषद घेऊनही बच्चू कडू यांच्यावर आरोप लावले होते. बच्चू कडू यांनी या प्रकरणावर एव्हरेस्ट बेस्ट कॅम्प मधून परत आल्यावर आपली प्रतिक्रिया देणार आणि लावलेल्या आरोप षडयंत्र असल्याचे सांगितले होते. यादरम्यान त्यांनी आपले वकील एड. महेश देशमुख यांच्या माध्यमातून अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अचलपूर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय मध्ये याचिका दाखल केली होती. न्यायाधीश सागर पाटील यांच्या समक्ष सोमवारी झालेल्या सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने बच्चू कडू यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. यामुळे त्यांना दिलासा मिळाला.

# एका युवकाचे सहा तरुणीसोबत अश्लील व्हिडिओ व्हायरल

## भाजपसह हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

**अमरावती/प्रतिनिधीः-** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाची शाई वाळते न वाळते तोच, जिल्ह्यातील परतवाडा येथे एका १९ वर्षीय तरुणाचे सहा वेगवेगळ्या तरुणींसोबतचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, जिल्हा पोलीस प्रशासनाने तातडीने तपास चक्र फिरवत संशयितांना कारवाईच्या टप्प्यात आणले आहे. या धक्कादायक प्रकारानंतर भाजप सह हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. हा प्रकार लव्ह जिहादचा असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला असून, अमरावती ग्रामीण पोलिसांनी तातडीने गुन्हे दाखल करून संबंधित नराधमाला अटक करावी, अशी मागणी केली आहे. ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या १९ वर्षीय तरुणाची आणि हे व्हिडिओ टेलिग्रामवर व्हायरल करणाऱ्या त्याच्या मित्राची ओळख पटवली आहे. हे दोन्ही आरोपी सध्या पोलिसांच्या नजरेच्या टप्प्यात असून कुण्या पीडिता वा तिच्या कुटुंबातील कुण्या सदस्याने तक्रार दिल्यास त्यांना लवकरच बेड्या ठोकल्या जातील, असे संकेत मिळत आहेत. व्हिडिओ मधील तरुणी अल्पवयीन असण्याची शक्यता आहे. पीडितांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी न घाबरता तक्रारीसाठी पुढे यावे. तक्रारदार आणि पीडितांची नावे पूर्णपणे गोपनीय ठेवली जातील, असे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सांगितले. व्हिडिओ व्हायरल करणारा तरुण हा मुख्य आरोपीचा मित्र असल्याचे सांगण्यात येत आहे. अशी माहिती आहे की,या तरुणाने परिसरात राहणाऱ्या १०० पेक्षा जास्त तरुणींना आपल्या जाळ्यात ओढले आहे. त्यांचे अश्लिल फोटो आणि व्हिडिओ काढून त्यांना ब्लॅकमेल केले जात आहे. तरुणींना जाळ्यात फसवण्यासाठी पूर्ण रॅकेट सक्रिय असल्याचा आरोपही हिंदुत्ववादी संघटनांनी केलेला आहे. यामुळे मोठी खडबड परतवाडा-अचलपूर मध्ये उडाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना लवकरात लवकर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. पुढील तपास पोलीस करत आहे. तक्रारदार समोर आल्यावर आरोपींना अटक केली जाणार आहे. हे प्रकरण समोर आल्या पासून आरोपी आणि त्याचे कुटुंबीय फरार झाले आहे.

**खासदार बोंडे यांनी घेतली एसपींची भेट**-प्रकरणाचे गांभीर्य पाहून खासदार डॉ.अनिल बोंडे हे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना भेटले. त्यांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागागी केली



## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.११.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **रिय्याज हुसेन फैय्याज हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **०१.०५.१९८४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ता जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.११.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अलताफ हुसेन फैय्याज हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.०२.१९८६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ता जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्वाभाविक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.११.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शबाना बानो फैय्याज हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **०१.०८.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ता जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्वाभाविक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.११.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **रुबिना अंजुम फैय्याज हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.१०.१९८८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ता जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्वाभाविक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी**

## जाहीर नोटीस

### विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.१८२/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
१. रविंद्र अंबादास जवंजाळ, वय ६५ धंदा - शेती
रा.४७, शांती हाऊसिंग सोसायटी, मांगल्य नगरीजवळ, बेसा नागपूर,
२. नलू सुरेश ठाकरे, वय ६२ धंदा - घरकाम
रा.बोडणा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. सरलाताई प्रकाश चोरे, वय ५९ धंदा - घरकाम
रा.धामणगांव, पो.कारला ता.अकोट, जि.अकोला
४. संजय अंबादास जवंजाळ, वय ५६ वर्षे, व्यवसाय - नोरकी
रा.कसईखेडा, पो.बैरागड, धारणी, ता.धारणी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अंबादास आकारामजी जवंजाळ** यांचा मृत्यू दिनांक **०९.०१.२०११** रोजी बोडणा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. ते कायमचे रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. तसेच **मृतक सुभद्रा अंबादास जवंजाळ** हिचा दि.**१७.१२.१९७७** रोजी रा.पनज, ता.अकोट, जि.अकोला येथे मरण पावली. तसेच **मृतक मंजुराबाई आकाराम जवंजाळ** यांचा मृत्यू दिनांक **१४.०६.१९९८** रोजी रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१८२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१३.०४.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५२१/२०२६
**श्रीमती कांता अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kanta Bhaskarrao Raut, Age 70 Yrs. Occu.: HOusehold
R/o Wadnerkar Wadi, Akoli Road, Sai Nagar, Amravati-444607
2. Pravin Bhaskarrao Raut, Age 50 Yrs. Occu.: Service
R/o Plot No.34, Flat No.F-7, Maharudra Apartment, Tulja Nagari Wadgaon, Yavatmal-445001
3. Vikas Bhaskarrao Raut, Age 47 Yrs. Occu.: SErvice
R/o Wadnerkar Wadi, Akoli Road, Sai Nagar, Amravati-444607
4. Pratibha Anilrao Sabale, Age 44 Yrs. Occu.: Household
R/o At Po.Kural Purna, Tq.Chandur Bazar, Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भास्कर लक्ष्मणराव राऊत** हे दिनांक **०१.०१.२०२४** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कांता अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कांता अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

### जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती

**क्र.न.भू-१/अपील अर्ज नं.२६५९/२०२५** **अमरावती दि.०९.०४.२०२६**

**प्रति,**
**गंगाधर सिताराम मुरतकर तर्फे**
मुखत्यारपत्रधारक रितेश गंगाधर मुरतकर
रा.वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती ... **अपिलार्थी**

**-- विरुध्द --**

**१) उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली**
**२) लता ईश्वराव राठी**
**३) विशाल ईश्वरदास राठी**
**४) सौ.आभा अमित मेहता**
**५) शिल्पा ईश्वरदास राठी**
**नं.२ ते ५ रा.द्वारा श्रीकांत राठी**
**वाठोडा शुक्लेश्वर, ता.भातकुली, जि.अमरावती** ... **उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे वाठोडा शु., ता.भातकुली, जि.अमरावती येथील शिट नं.१, प्लॉट नं.१०७ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.२ ते ५ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २०.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ०९.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**स्वाक्षरी/-
(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख अमरावती**

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६५०/२०२६
**श्रीमती किकीबाई -वि- निरंक**
पुढील ता.०४.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kikibai Rahadamal @ Rahandomal Sawlani
Age 73 Yrs. Occu.: HOusehold
R/o Near Anand Bekary, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रहदामल बखतमल सावलानी** हे दिनांक **१५.०७.१९७७**रोजी **मुंबई** येथे मयत झाले. अर्जदार **किकीबाई विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **किकीबाई विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी. क्र.७१/२०२६ ने.ता.१०.०६.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :** १. अरुण शंकरराव बाळापुरे
वय ७८ वर्षे, धंदा - मजुरी
रा.दिघी कोल्हे, पो.कवठा कडू, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **अरुण शंकरराव बाळापुरे** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **शंकरराव नारायण बाळापुरे** यांचा मृत्यू दिनांक **३०.११.१९८३** रोजी मौजा **दिघी कोल्हे,** पो.कवठा कडू, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. व **नामे लिलाबाई शंकर बाळापुरे** यांची मयतची नोंद ग्रामपंचायत दिघी कोल्हे, पो.कवठा कडू, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील रजिस्टरमध्ये नाही. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०८ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६१५/२०२६
**किरण अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kiran Shrichand Makhija, Age 58 Yrs. Occu.: HOusehold
R/o Near Shiv Mandir, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati.
2. Bharat Shrichand Makhija, Age 34 Yrs. Occu.: Business
3. Vijay Shrichand Makhija, Age 32 Yrs. Occu.: Business
R/o Appli.No.2 & 3 R/o House No.21-B, Shegaon-Rahatgaon Road, Near Tulja Bhawani Mangal Karyalaya, Shivshakti Nagar, V.M.V.Amravati
4. Palak Ajay Nagdeo, Age 37 Yrs. Occu.: Household
R/o Yavatmal Road, Behind Police Station, Sindhi Colony, Wani, Tq.Wani Dist.Yavatmal-445304

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shrichand Murajmal Makhaja हे दिनांक **०६.१०.२०१९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kiran Shrichand Makhija + 3 **निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kiran Shrichand Makhija + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.१००/२०२६ ने.ता.०२.०५.२०२६

**अर्जदार :**
१. कृष्णा जगन्नाथ बलखंडे,
२. केशव जगन्नाथ बलखंडे,
दोन्ही रा.वार्ड नं.३ पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. गुणवंत जगन्नाथ बलखंडे,
रा.सी-८०९, व्रजभूमी कॉम्प्लेक्स जवळ, खाडीपूल, सुरत
४. राजेश जगन्नाथ बलखंडे,
रा.१०६, जय जलाराम नगर, खरवासा रोड, सुरत नगर, उधना सुरत

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत जगन्नाथ तुळशीराम बलखंडे आणि मयत रुख्माबाई जगन्नाथ बलखंडे** यांचा मृत्यू दि.**२२.१०.२०२४ आणि दि.२७.०७.२०१९** रोजी पापळ, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ते ४ ही मुले, मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

### मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.९९/२०२६ ने.ता.०४.०५.२०२६

**अर्जदार :**
१. दिलीप प्रल्हाद मुंदे
२. विठ्ठलराव प्रल्हादराव मुंदे
दोन्ही रा.बोपी, पो.हिवरा बु., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. चंद्रकलाबाई शिवदास ताठे, रा.पोहा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
४. भाग्यश्री निलेश मुरादे, रा.हिवरा मुरादे, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. रुपाली संतोष काठोळे, रा.वैभव नगर, वाघापूर रोड, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत कमलाबाई प्रल्हादराव मुंदे** यांचा मृत्यू दि.**१३.०६.२०२५** रोजी बोपनेमताबाद, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताचे पती नामे **मयत प्रल्हाद किसन मुंदे** यांचा मृत्यू दिनांक **१०.१०.२०२०** रोजी बोपनेमताबाद, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले, अ.नं.३ ही मुलगी आहे. तसेच अर्जदार नं.४ व ५ ह्या नात आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर







शुभेच्छुक
श्री. बाबुराव महादेवराव तिनतवरे
सरपंच , गट ग्रामपंचायत वडूरा दिघी ता. दर्यापूर

श्री. सुनिल महादेवराव गावंडे
ग्रामपंचायत अधिकारी
गट ग्रामपंचायत वडूरा दिघी ता. दर्यापूर





शुभेच्छुक
डॉ प्रदीप कुर्बानजी मोहोड
सचिव
विक्रमशिला तंत्रनिकेतन
बहुउद्देशीय शिक्षक व शिक्षकेतर संघटना



शुभेच्छुक
श्री अनिलभाऊ गवई
तालुकाध्यक्ष
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, दर्यापूर



श्री चंदूभाऊ भाऊसाहेब रायबोले
अध्यक्ष
वंचित बहुजन आघाडी, दर्यापूर

जाहिरात संकलन :-युवराज डोंगरे, दै. जनमाध्यम प्रतिनिधी, दर्यापूर मो. नं. ९९२३४२१४७६



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप यज्ञ

**अमरावती-** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे सुरू असलेल्या अखंड नामजप यज्ञात पुरुष, महिला, विद्यार्थी, मुले, मुली बसलेले आहेत. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या सप्ताहात सकाळी औदुंबर प्रदक्षिणा, यज्ञ मंडपातील रोजचे कर्म, भूपाळी आरती, श्री स्वामी महाराजांच्या मूर्तीचे षोडशोपचारे पूजन व अभिषेक, नैवेद्य आरती (मंत्र पुष्पांजली सह) दुर्गा सप्तशती व स्वामी सारामृताचे पारायण, प्रश्नोत्तरे, हस्तरेषा, जन्मकुंडली पाहणे, प्रश्न सोडवणे, वास्तुशास्त्रावर मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम ,गीताई मनाचे श्लोक वाचन, सायंकाळी औदुंबर प्रदक्षिणा, आरती, मार्गदर्शन, सायंकाळची नित्यसेवा, गीतेचा पंधरावा अध्याय, विष्णुसहस्त्रनाम रामरक्षा वाचन दररोज सुरू असून या कार्यक्रमात तसेच ग्रामीण भागातील महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या आहेत.

### आरोग्य निदान उपचार शिबीर

**शिराळा-** येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत निदान उपचार आरोग्य शिबीर १२ एप्रिलला सुभद्रा चॅरिटेबल ट्रस्ट शिराळा यांचे तर्फे आयोजित करण्यात आले आहे. डॉ. मोनाली ढोले स्त्री  रोग तज्ञ व प्रसुती तज्ञ, डॉ अंकिता जयस्वाल, अस्थीरोग तज्ञ, डॉ सुचिकेत स. चोपडे, बीडीएस, एमडीएस उपस्थित राहुण आरोग्य तपासणी करतील. तसेच कार्यक्रमाला सुभद्रा चॅरिटेबल ट्रस्ट विर्श्वस्त तथा जिप माजी समाजकल्याण सभापती मिंलिदभाऊ तायडे, विनय तायडे, अक्षय मिलिंद तायडे, माजी पंस सभापती संगिता  मिलिंद तायडे आदी उपस्थित राहणार आहेत.तरी शिराळा परिसरातील नागरिक उपस्थित राहुण आरोग्य शिबीराचा लाभ घेतला.



### शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

**चांदूर रेल्वे-** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका एस. बी. देशमुख, एस. डी. फुके आणि पवन देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापकांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आली.यावेळी सर्वांनी सामूहिकरित्या भाऊसाहेबांचे गौरवगीत गायले.यानंतर विद्यार्थ्यांनी भाऊसाहेबांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली.अध्यक्षीय भाषणात डॉ. अतुल ठाकरे यांनी भाऊसाहेबांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन इयत्ता आठवी 'ब'ची विद्यार्थिनी वैदही येवले हिने केले, तर आभार प्रदर्शन साक्षी मुधोळकर हिने केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### डॉ.बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

**अमरावती-** येथील महाजनपुरा येथे संघर्ष योद्धा बहुद्देशीय संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान झाले. 'शून्यातून विश्व निर्माण करणारे महामानव' या विषयावर आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्ष शुभम सावरकर आणि सचिव रुपेश नांदुरकर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी बाबासाहेबांचे विचार दिशादर्शक असल्याचे सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले असून, हर्षल आठवले यांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वी झाला.

# अप्पर वर्धा धरणातील जलस्तर निम्मा!

## लहान प्रकल्पांमध्ये पाण्याची असमान परिस्थिती, वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची पातळी घटली

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील ताज्या पाणीसाठ्याच्या परिस्थितीवरून मोठे, मध्यम आणि लहान प्रकल्पांमधील पाण्याच्या पातळीचे संमिश्र चित्र समोर आले आहे. सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धामध्ये सध्या ५२.५४ टक्के पाणीसाठा आहे, जो मध्यम मानला जातो. मध्यम प्रकल्पांमधील पाण्याची पातळी तुलनेने स्थिर आहे, मात्र काही प्रकल्पांमध्ये घट झाली आहे. दरम्यान, लहान प्रकल्पांमधील परिस्थिती असमान आहे. काही



ठिकाणी पाणीसाठा समाधानकारक आहे, तर इतर ठिकाणी पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. जिल्ह्यातील चंद्रभागा, पूर्णा, शहानूर, पेंच, गडगा आणि इतर प्रकल्पांमध्ये पाण्याची उपलब्धता वेगवेगळ्या टक्केवारीत नोंदवली गेली आहे. काही प्रकल्पांमध्ये ४० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे, तर इतर प्रकल्पांमधील पाणीसाठा अत्यंत कमी किंवा शून्याच्या जवळपास पोहोचला आहे. सध्या जिल्ह्याचा एकूण पाणीसाठा ५०.९६ टक्के आहे, जो सामान्य ते मध्यम मानला जातो. तथापि, वाढत्या उष्णतेमुळे आणि पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत पाऊस न पडल्यास पाणीटंचाई अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जिल्ह्यातील सध्याची पाणी परिस्थिती**

| प्रकल्प | संख्या | क्षमता | सध्याची परिस्थिती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मोठा | १ | ५६४.०५ | २९६.३३ | ५२.५४ |
| मध्यम | ७ | २५६.२४ | १२१.७१ | ४७.५० |
| लघू | ४८ | २२७.०१ | ११५.६३ | ५०.९४ |
| एकूण | ५६ | १०४७.३० | ५३३.६७ | ५०.९६ |

# दिव्यांग पाल्यास सहाय्यक शिक्षिकांकडून दिला दहावीचा पुस्तकाचा संच

## शिक्षकांनी जोपासली विद्यार्थिनी प्रती संवेदना

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

येथील सीताबाई संगई कन्या शाळेतील शिक्षिका यांनी एका गरीब विद्यार्थिनीला दहावीच्या पुस्तकाचा संच देऊन विद्यार्थ्याप्रती असलेल्या संवेदनाचा परिचय दिला. येथील सीताबाई संगई कन्या शाळेतील विद्यार्थिनी सोनल पुंजाराम राऊत ही दहाव्या वर्गात गेली. या मुलीच्या आई वडील जन्मताच दोन्ही डोळ्यांनी पूर्णतः दिव्यांग आहे. आई-वडिलांना अजिबात दिसत नाही. परिस्थिती सुद्धा अतिशय गरीबीची त्यांची सोनल नावाची मुलगी या शाळेत शिकत आहे. यंदा तिचे दहावीचे



वर्ष आहे. दहावीचे पुस्तकाच्या विवंचनेत ही मुलगी असताना तिच्या मनाची संवेदना ओळखून सीताबाई संगई कन्या शाळेतील सहाय्यक शिक्षिका शुभांगी गोतमारे यांनी दहाव्या वर्गाच्या पुस्तकाचा एक पूर्ण संच आणून सोनल राऊत या मुलीला भेट दिला. खऱ्या अर्थाने त्यांनी विद्यार्थ्याप्रती असलेल्या संवेदनाचा परिचय दिला.सदर मुलीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तसेच मुलीची आई वडील दोन्ही डोळ्यांनी जन्मताच दिव्यांग असल्याने या मुलीच्या शिक्षणाबाबतचे साहित्य, शाळेचा ड्रेस, मदती करिता आम्ही केव्हाही तयार असल्याचे सीताबाई संगई कन्या शाळेचे मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे यांनी सांगितले. वर्ग पाचवीपासून ही विद्यार्थिनी सीताबाई संगई कन्या शाळेत शिक्षण घेत आहे. सोनल पुंजाराम राऊत ह्या विद्यार्थिनीला शाळेतील सहायक शिक्षिका शुभांगी गोतमारे यांच्यातर्फे इयत्ता दहावीच्या पुस्तकांचा संच सीता संगई कन्या शाळेचे मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे यांच्या हस्ते भेट दिला. यावेळी मुरकुटे, गोतमारे, मालगे, गायगोले, देशपांडे, खोरगडे, सेवाने, देवलसी, पळसापुरे, बोराळकर व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# ग्रामीण युवकांसाठी सुवर्णसंधी

## नांदगाव खंडेश्वर येथे नोकरी महोत्सव



**नांदगाव खंडेश्वर -** आजच्या स्पर्धात्मक युगात बेरोजगारी हा गंभीर सामाजिक प्रश्न बनला असून विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षित युवकांना योग्य संधींचा अभाव जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर युवकांना थेट रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी द ग्रॅज्युएट फाउंडेशनच्या वतीने भव्य नोकरी महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील तरुणांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि दिशा देणारा टप्पा ठरणार आहे.

दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत योगिनी मंगल कार्यालय, नांदगाव खंडेश्वर येथे हा महोत्सव होणार आहे. संभाजीनगर व पुणे येथील विविध नामांकित कंपन्यांच्या सहभागातून ४०० हून अधिक पदांसाठी थेट भरती प्रक्रिया पार पडणार असून उमेदवारांना मुलाखतीनंतर त्वरित नियुक्तीपत्र मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या नोकरी महोत्सवात दहावी, बारावी, पदवीधर, आयटीआय व डिप्लोमा धारक उमेदवारांना सहभाग घेता येणार आहे. उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे बंधनकारक असून ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.हा उपक्रम केवळ नोकरी देणारा कार्यक्रम नसून ग्रामीण युवकांना आत्मनिर्भरतेकडे नेणारा, त्यांच्या करिअरला योग्य दिशा देणारा आणि त्यांच्या स्वप्नांना नवी उभारी देणारा एक प्रभावी प्रयत्न असल्याचे मत व्यक्त होत आहे.जास्तीत जास्त तरुणांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी पहिले पाऊल टाकावे, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक, सिनेट सदस्य तथा द ग्रॅज्युएट फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. नितीन टाले यांनी केले आहे.

# रात्री सिंगल फेज बंद, दिवसा तीन-फेज सक्ती; शेतकरी त्रस्त

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरात गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी सिंगल फेज विजपुरवठा बंद ठेवला जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून सातत्याने होत आहे. दरम्यान, दिवसा मात्र तीन-फेजचा पुरवठा सुरू ठेवून ओलीतासाठी सक्तीची वेळ लादली जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. उष्णतेची तीव्रता वाढलेली असताना पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीचा कालावधीच सर्वात सोयीचा ठरतो; मात्र रात्री फेज बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना मध्यरात्री पर्यंत जागून त्रास सहन करावा लागत आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, महावितरण अधिकाऱ्यांचा मनमानी आणि ढिसाळ कारभार यामागे कारणीभूत असून शेतकऱ्यांची कोणीही दखल घेत नाही. विजपुरवठा वेळापत्रकासाठी पूर्वसूचनाही दिली जात नाही, तसेच कनिष्ठ अभियंता किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस माहिती दिली जात नसल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. रात्री सिंगल फेज बंद केल्यामुळे विद्युतपंप सुरू न झाल्याने पिकांच्या ओलीतीवर परिणाम होत आहे. सध्या उभ्या पिकांना पाणी ही सर्वात मोठी गरज असून विजेअभावी खत देणे, फवारणी करणे अशा कृषी कामांवरही परिणाम होत आहे. दिवसा तीन फेज मिळाली तरी प्रचंड उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढत असल्याने पिकांना पुरेसे पाणी मिळत नाही, अशी व्यथा शेतकरी मांडत आहेत.स्थानिक शेतकऱ्यांनी या समस्येबाबत अनेक वेळा महावितरणकडे तक्रारी केल्या असल्या तरी कोणतीही ठोस दखल न घेतल्याचा आरोप केला जात आहे. काही ठिकाणी ट्रान्सफॉर्मर क्षमतेपेक्षा जास्त लोड, देखभाल दुरुस्ती अभावी लाईन ट्रिप, तसेच ग्रामीण भागातील दुर्लक्ष हीच या समस्यांची मुख्य कारणे असल्याचेही शेतकरी सांगतात. शेतकऱ्यांनी तातडीने रात्रीचा सिंगल फेज सुरू करून नियमित व निर्बंधविरहित विजपुरवठा द्यावा, तसेच दिवस-रात्र तीन-फेज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# स्त्री सक्षमीकरणाचे खरे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर-राम ईखार

## नांदगाव खंडेश्वर आयटीआयमध्ये व्याख्यान उत्साहात, निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

भारतीय समाजात स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला. महिलांना शिक्षण, संपत्तीवरील हक्क, समानता आणि स्वाभिमान मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कायदे व सामाजिक चळवळी आजही मार्गदर्शक ठरत आहेत. स्त्री सक्षमीकरणाचे खरे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे असे प्रतिपादन वक्ते राम ईखार यांनी केले. ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एकनाथराव रानडे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वर येथे आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे शिल्प निदेशक तुषार जैन होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संदीप तिरमारे उपस्थित होते. तरकार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून



राम ईखार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांसाठी केलेले अमूल्य कार्य या विषयावर प्रभावी मनोगत व्यक्त केले. यावेळी तुषार जैन, संदीप तिरमारे तसेच प्रशिक्षणार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात प्रास्ताविक प्रफुल्ल कचरे यांनी तर संचालन व आभार प्रदर्शन रुचिका डोरस यांनी केले. यावेळी राजकुमार धोटे, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे यांच्यासह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम प्राचार्य नंदनसिंह भुकवाल व प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

### माळी महासंघ अमरावती व्दारा प्रेरणा मेळावा व सत्कार समारंभ

# नवनियुक्त नगरसेवकांचा सत्कार

**अमरावती-** माळी महासंघ अमरावती व्दारा महानगर पालिका व जिल्हातील नगरपरीषद मध्ये निवडणूक आलेल्या नगरसेवक यांचा रविवार १२ एप्रिलला श्री गाडगे महाराज सभागृह,रंगोली लॉनच्या मागे, कठोरा नाका, अमरावती येथे प्रेरणा मेळावा व सत्कार समारंभझाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाशजी ठाकरे (राष्ट्रीय अध्यक्ष, माळी महासंघ) होत तर प्रमुख अतिथी खा.बळवंतजी वानखडे, आ.सुलभा खोडके, प्रमुख उपस्थीती अरुणभाऊ तिखे (अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश माळी महासंघ), निळकंठ यावलकर (जेष्ठ समाज सेवक व उद्योगपती), डॉ.मनोहररावजी आंडे, रविंद्रजी अंबाडकर (राष्ट्रीय सचिव माळी महासंघ), नानासाहेब कांडलकर (राष्ट्रीय कोषाध्यक्ष, माळी महासंघ), डॉ.





श्रीकृष्ण गोरडे (राज्य कोषाध्यक्ष), मुंकदपोटदुखे (विभागीय अध्यक्ष पूर्व विदर्भ),राजेशजी जावरकर (विभागीय अध्यक्ष पश्चिम विदर्भ),प्रशांतजी लांडे (विभागीय कार्याध्यक्ष), प्रदिपजी लांडे (अध्यक्ष विभागीय शिक्षक आघाडी),निळकंठ बोराडे (कोषाध्यक्ष विभागीय शिक्षक आघाडी) उपस्थित होते. महामानवांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.यावेळी अमरावती महानगर पालिका व नगर पालिका मध्ये निवडून आलेल्या नगर सेवक यांचा शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलिप भोयर यांनी तर सूत्रसंचालन नीळकंठ बोराडे आभार प्रदर्शन देविदास उमप यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्या करीता राजेशजी जावरकर, प्रशांत लांडे, राजा राजनकर,देविदास उमप, विनोद कुऱ्हेकर, राजेश सावरकर,विनोद बोबडे, दीपक धांडे, वनदेव देवघरे, नंदकिशोर दिंडोकार, अनिल वानखडे, संजय भडांगे, प्रकाश मते,रंजनी आमले, जयश्री कुबडे, सोनाली नवले, राधेशाम बहादुरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला मोठ्या संखेने माळी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य व समाज बांधव उपस्थित होते.

# परीक्षाकाळात शिक्षकांवर मतदारयाद्यांचा भार

## शेकडो शिक्षक बीएलओ कामासाठी नियुक्त

**अमरावती/का.प्र.**

एप्रिलमध्ये विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा होत असताना जिल्हा परिषदेच्या शाळेतील बीएलओ असलेल्या शिक्षकांना ऐन परीक्षेच्या काळात मतदार याद्या पुनर्निरिक्षणचे (एसआयआर) काम लागल्याने परीक्षा काळातच मतदार याद्या पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शेकडो शिक्षक बीएलओ कामासाठी नियुक्त केले आहेत.

सध्या, एप्रिल महिना परीक्षा तसेच वर्षभरातील कामाचा विद्यार्थ्यांचा लेखाजोखा मांडण्याचा महत्त्वाचा काळ असताना मार्च महिन्यात सुमारे दहा दिवस शिक्षकांना शाळेतून बीएलओ कामासाठी पूर्णवेळ



कार्यमुक्त करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा, दैनंदिन अध्यापन व दैनंदिन कामे, दाखलपात्र याद्या, निकाल पत्रक आदी कामे कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.एप्रिल महिन्यात प्रत्येक शाळांमध्ये ऐन परीक्षेच्या काळात पटपडताळणी होणार आहे. त्यामुळे मतदारयाद्यांच्या कामासह गैरहजर विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी शिक्षकांना दारोदारी फिरावे लागत आहे. शालेय कामाशिवाय इतर शाळाबाह्य कामांच्या अतिरिक्त बोजामुळे शिक्षक मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत.बीएलओ व इतर अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षक बीएलओ कामात व्यस्त असल्याने शालेय नियोजन कोलमडले असून विद्यार्थ्यांची उपस्थितीवर त्याचा विपरीत परीणाम झाला आहे.त्यामुळे विद्यार्थ्याच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.त्याला जबाबदार कोण असा प्रश्न पालक विचारत आहे.तसेच येत्या भर उन्हात ४थी व ७वीची शिष्यवृत्ती परीक्षा होणार आहे.संध्दा ११एप्रिल पासुन १ते९वर्गाच्या वार्षिक परीक्षा सुरु आहे.त्यात शिक्षकाकडे बिएलओ चे काम त्यामुळे शिक्षक त्रस्त झाले आहे.

### किचकट कामामुळे वैतागले शिक्षक

मतदार यादीतील नावांची जुळवणी म्हणजेच मॅपिंग २००२ च्या मतदार यादीतील नातेवाइकांच्या नावाशी जुळवणे, मॅपिंग करणे हे अतिशय किचकट, वेळखाऊ काम आहे. अनेक आदिवासी, अशिक्षित मतदारांना माहिती सांगता येत नसल्याने मॅपिंगची टक्केवारीत वाढ होत नसल्याचे चित्र आहे. ऐन परीक्षाकाळात शाळेचे कामकाज न करता मतदारयाद्यांचे काम करण्यासाठी शिक्षकांना पूर्ण वेळ द्यावा लागत आहे.

